




सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित | सदाफुलीसह

धाराशिव | बुधवार, ९ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १८० | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com












## विचारपुष्प

भारतीय जीवनदर्शनाची स्वतःची आर्थिक जीवनदृष्टी आहे. बाकीच्या देशांत स्वतःच्या समृद्धीसाठी काम करण्याची प्रेरणा मिळते. व्यक्तिगत समृद्धीसाठीच तेथे व्यावसायिक संघटन पाहावयास मिळते; परंतु भारतात वेगळ्याच प्रकारची आर्थिक जीवनदृष्टी पाहावयास मिळते. येथे जरी व्यवसायाच्या आधारावर जाती संघटित झाल्या आहेत तरी त्यांचे लक्ष्य समाजाच्या गरजा पूर्ण करण्याकडे असते.

**- भारतरत्न**
**स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# भारतामुळे जगाला आत्मविश्वास

## पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन; ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६ चे उद्घाटन

**मुंबई, ८ सप्टेंबर**

जागतिक पातळीवर आर्थिक अनिश्चितता, ऊर्जा आणि वस्तूंच्या पुरवठा साखळीवरील दबाव कायम असतानाही भारताने नोंदविलेला ७.८ टक्के आर्थिक विकासदर हा जगाच्या आपल्यावरील वाढत्या विश्वासाचे प्रतीक आहे. आपली अर्थव्यवस्था ज्या वेगाने पुढे जात आहे, त्याचा परिणाम केवळ देशापुरता मर्यादित राहत नाही. भारताचा विकासदर वाढला की जगाचा भारतावरील आत्मविश्वासही वाढतो, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी मुंबईत केले. बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये आयोजित ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

भारताच्या वाढत्या आर्थिक विश्वासार्हतेचे आणखी एक उदाहरण म्हणून मोदी यांनी अलिकडील सार्वभौम पतमानांकनातील सुधारणा अधोरेखित केली. २ सप्टेंबर रोजी जपान क्रेडिट रेटिंग एजन्सीने भारताचे दीर्घकालीन परकीय आणि स्थानिक चलनातील सार्वभौम मानांकन 'बी+' वरून 'ए ' केले असून, दृष्टिकोन 'स्टेबल' ठेवला आहे. भारताचे 'कंट्री सीलिंग' देखील 'ए' करण्यात आले आहे.

'जेसीआर'ने भारताच्या मजबूत आणि लवचीक आर्थिक वाढीसोबतच आर्थिक धोरणांची परिणामकारकता, वित्तीय व्यवस्थेतील सुधारणा आणि मजबूत बाह्य क्षेत्र यांचा या सुधारणेमागे आधार असल्याचे स्पष्ट केले आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, जीएसटी, सार्वजनिक गुंतवणूक आणि भक्कम खाजगी उपभोग यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेचा पाया अधिक मजबूत झाल्याचेही एजन्सीने नमूद केले आहे. ग्लोबल फिनटेक फेस्टची यंदाची सातवी आवृत्ती ८ ते ११ सप्टेंबरदरम्यान मुंबईत होत असून, 'पोटेन्शियल टू इम्पॅक्ट : एजंटिक एआय, टोकनायझेशन, क्वांटम – ट्रस्टेड, कनेक्टेड, ग्लोबल सिस्टिम्स फॉर इन्क्लुझिव्ह फायनान्स' ही यंदाची संकल्पना आहे. जगभरातील फिनटेक क्षेत्रातील धोरणकर्ते, नियामक, केंद्रीय बँकांचे प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील नेते, गुंतवणूकदार आणि नवउद्योजक या मंचावर सहभागी होत आहेत. ◂ (तभा वृत्तसेवा)



### 'यूपीआय' फिनटेक क्रांतीचा मोठा चेहरा

ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये मोदी यांनी भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा विशेष उल्लेख केला. आधार, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि यूपीआय यांच्या माध्यमातून भारताने आर्थिक सेवा मोठ्या प्रमाणावर सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवल्या आहेत. यूपीआयने डिजिटल व्यवहार अधिक सुलभ करत भारताच्या फिनटेक क्रांतीला मोठी चालना दिली असून, भारताची डिजिटल पेमेंट व्यवस्था आता जागतिक पातळीवर चर्चेचा विषय बनली आहे. ■

### तरुणाई आणि नवोन्मेषाची भूमिका महत्त्वाची

मोदी यांनी ग्लोबल फिनटेक फेस्टमधील आपल्या सलग तिसऱ्या उपस्थितीचा उल्लेख करताना, 'विकसित भारत' घडविण्यात फिनटेक क्षेत्रातील तरुणाई आणि नवोन्मेषाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. भारताच्या आर्थिक प्रगतीसोबतच डिजिटल तंत्रज्ञानाचा विस्तार आणि वित्तीय समावेशन यामुळे देशाची जागतिक आर्थिक भूमिका अधिक बळकट होत असल्याचा संदेश त्यांनी दिला. ■

# खेळाडूंच्या शासकीय नोकरीचा मार्ग सुकर

**मंत्रिमंडळ निर्णय**

### पाच टक्के आरक्षणाला नवे रूप

### बनावट प्रमाणपत्रांना बसणार आळा

**मुंबई, ८ सप्टेंबर**

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय तसेच शासनाकडून निधी किंवा अनुदान मिळणाऱ्या विविध संस्थांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी लागू असलेल्या पाच टक्के आरक्षणाच्या धोरणात सुसूत्रता आणि एकसंधता आणण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मंगळवारी मान्यता दिली.

सुधारित धोरणानुसार आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र खेळाडूंना आपल्या क्रीडा प्रमाणपत्राची वैधता शासनाने निश्चित केलेल्या कालावधीत, म्हणजेच सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत पडताळून घेणे बंधनकारक राहणार आहे. यामुळे क्रीडा प्रमाणपत्रांच्या वैधतेबाबत अधिक पारदर्शकता निर्माण होऊन बनावट प्रमाणपत्रांना आळा बसण्यास मदत होणार आहे.

हे पाच टक्के समांतर आरक्षण मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये, सहकारी संस्था तसेच शासनाकडून निधी किंवा अनुदान मिळणाऱ्या मान्यताप्राप्त स्वेच्छा संस्थांसह विविध आस्थापनांमधील गट-अ, गट-ब, गट-क आणि गट-ड मधील सरळसेवा पदांसाठी लागू राहणार आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांतील खेळ पात्र

आरक्षणासाठी खेळांची पात्रता निश्चित करताना २००५ नंतर सलग तीन ऑलिम्पिकमध्ये समाविष्ट असलेले खेळ विचारात घेतले जाणार आहेत. स्थानिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी कबड्डी, खो-खो, बुद्धिबळ, मल्लखांब आणि क्रिकेट यांचाही समावेश करण्यात आला आहे. ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक, आशियाई क्रीडा स्पर्धा, पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धा आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये ज्या वर्षी जे खेळ आयोजित केले जातील, त्या वर्षी ते खेळ आरक्षणासाठी पात्र राहतील. मान्यताप्राप्त संघटनांच्या माध्यमातून आयोजित स्पर्धांमध्ये वरिष्ठ, युवा आणि कनिष्ठ गटातील खेळाडूंनाही पात्रता मिळणार आहे. ■

### डिजिटल प्रमाणपत्रामुळे बनावटपणाला आळा

सुधारित धोरणात क्रीडा ई-प्रमाणपत्रासाठी स्वयंचलित डिजिटल कार्यप्रणाली लागू करण्यात येणार आहे. स्पर्धा संपल्यानंतर सात दिवसांच्या आत निकाल डिजिटल स्वाक्षरीसह संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक राहणार आहे. प्रमाणपत्रांची माहिती सुरक्षित पद्धतीने कायमस्वरूपी जतन केली जाणार असून, त्यामध्ये फेरफार करणे शक्य होणार नाही. स्वयंचलित तांत्रिक पडताळणीमुळे प्रमाणपत्राची सत्यता तत्काळ तपासता येणार आहे. त्यामुळे क्रीडा आरक्षण प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यासोबतच बनावट प्रमाणपत्रांचा वापर रोखण्यास मोठी मदत होणार आहे. ■

**अनेक क्रीडा प्रकारांना आरक्षणाचा लाभ**
(पान ३ वर...)

## महत्त्वाचे

### सराफा व्यापाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**वाशीम :** परवाना नसताना सावकारी व्यवहार केल्याप्रकरणी शहरातील एका सराफा व्यापाऱ्याविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम ३९ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. अवैध सावकारी व्यवहारासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यावरून सहकार व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने १६ एप्रिलला बालाजी कॉम्प्लेक्स येथील रुक्मिणी ज्वेलर्स येथे झडती घेतली. त्यात संबंधित सराफा व्यापारी परवाना नसताना सावकारी करीत असल्याचे आढळले. त्याच्याविरुद्ध पोलिस ठाण्यात ४ सप्टेंबरला गुन्हा दाखल झाला. अवैध सावकारी करणाऱ्या व्यक्तींची माहिती नागरिकांनी सहकार विभागाकडे द्यावी, तक्रारदारांची नावे गोपनीय ठेवली जातील, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशीम एम. एस. लटपटे यांनी केले आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

# पंतप्रधानांच्या सुरक्षेत मोठी घुसखोरी

**मुंबई, ८ सप्टेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबईतील नियोजित दौऱ्याच्या पृष्ठभूमीवर वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात असतानाच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. 'नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर' जवळील 'जिओ वर्ल्ड प्लाझा' परिसरात पंतप्रधान कार्यालयातील उच्चपदस्थ अधिकारी असल्याचे भासवत बंदुकीसह घुसखोरी करणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून बनावट ओळखपत्र आणि एक परवानाधारक पिस्तूल जप्त करण्यात आले आहे.

मुख्य संशयित त्याच्या साथीदारासह आणि खार येथील बीकेसी परिसरातील मॉलच्या प्रवेशद्वारावर पोहोचला होता. सुरक्षेसाठी तैनात असलेल्या कर्मचाऱ्यांनी तपासणी सुरू केली असता, त्याने आपण थेट 'पीएमओ'चे अधिकारी असल्याचे सांगत मॉलची सुरक्षा यंत्रणा चुकवून आत शिरण्याचा प्रयत्न केला. ◂ (तभा वृत्तसेवा)



शनिवारपासून दिल्ली येथे सुरू होणाऱ्या ब्रिक्स परिषदेसाठी 'रेल भवन' सजले आहे. येथील सजावटीच्या रोषणाईमुळे 'रेल भवन' आकर्षणाचे केंद्र ठरत आहे

# मराठा समाजाला संविधानानुसार आरक्षण

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**मुंबई, ८ सप्टेंबर**

मराठा आरक्षणासाठी संविधानानुसार जे काही देणे शक्य आहे, ते दिले जाईल. परंतु, एका समाजाच्या वाट्यातील हक्क दुसऱ्या समाजाला देण्यासाठी काढून घेतला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली.

ते मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आणि जरांगे यांच्या आंदोलनावर चर्चा करण्यासाठी सरकारने घेतलेल्या रात्रीच्या बैठकीच्या वृत्तांवर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत होते. जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे २९ ऑगस्टपासून उपोषण सुरू करणाऱ्या जरांगे यांनी, मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गांतर्गत आरक्षण मिळावे तसेच हैदराबाद आणि सातारा गॅझेटमधील नोंदींची अंमलबजावणी व्हावी आणि मराठा समाजातील पात्र सदस्यांना कुणबी जातीची प्रमाणपत्रे दिली जावीत, अशा मागण्या केल्या आहेत.

ओबीसी (इतर मागास वर्ग) समुदायाचे घटनात्मक अधिकार आणि आरक्षणाच्या वाट्याचे रक्षण करण्यासाठी या गावात ओबीसी कार्यकर्त्यांनी आंदोलनही केले होते. सत्ताधारी आघाडीने मराठा समाजाबाबत आतापर्यंतचे सर्व मोठे निर्णय घेतले असून, यापुढील कोणतेही निर्णय राज्यघटनेच्या चौकटीत राहून आणि न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून घेतले जातील, असे फडणवीस म्हणाले. संविधानानुसार जे काही देणे शक्य आहे, ते नक्कीच दिले जाईल. ◂ (वृत्तसंस्था)

### राजनाथसिंह कोलंबोत दाखल

**कोलंबो :** संरक्षण मंत्री राजनाथ सिंह मंगळवारी तीन दिवसांच्या दौऱ्यावर श्रीलंकेत दाखल झाले. या दौऱ्यादरम्यान ते द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याच्या तसेच संरक्षण व सागरी सुरक्षेच्या क्षेत्रातील सहकार्य वाढवण्याच्या उद्देशाने त्या देशाच्या वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा करतील. ते श्रीलंकेच्या नेतृत्वाशी फलदायी चर्चा करण्यास उत्सुक आहे. ■

### वाहन धडकेत दुचाकीवरील वृध्द महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ सप्टेंबर-**

अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकीवरील एक वृध्द दांपत्य जखमी झाल्याची घटना धाराशिव-नळदुर्ग रस्त्यावर देवसिंगा पाटी टोलनाक्याजवळ घडली होती. यातील जखमी खतिजा जब्बार शेख (वय-६0, रा.धाराशिव) या वृध्द महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात सोमवारी मध्यरात्री मृत्यू झाला. जब्बार अब्दुल शेख (वय-६६, रा.धाराशिव) हे आपली पत्नीसोबत शनिवार, दि.५ सप्टेंबर २0२६ रोजी दुचाकीवरुन धाराशिवहून नळदुर्गकडे निघाले होते. देवसिंगा पाटी टोलनक्याजवळ मागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली होती. यात ते दोघे जखमी झाले होते.

# आता राजकारणी, लोकप्रतिनिधींनाही दंड

## वाहनावर केली जाणार कारवाई; वरिष्ठ पातळीवरून आरटीओ अधिकाऱ्यांना सूचना

**प्रवीण राऊत**

**मुंबई, ८ सप्टेंबर**

राज्यात वाहनांच्या नंबर प्लेटसंदर्भात स्पष्ट नियम असतानाही नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर परिवहन विभागाकडून कारवाई केली जाते. मात्र, हे नियम सामान्य वाहनधारकांपुरतेच मर्यादित आहेत का? असा सवाल आता सामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे राजकीय व्यक्ती आणि लोकप्रतिनिधी यांच्या वाहनांची नंबर प्लेट नियमात नसल्यास त्यांच्या वाहनावरही कारवाई करण्याच्या सूचना विभागातील वरिष्ठ पातळीवरून घेण्यात आल्याचे सूत्राने सांगितले आहे.

पुण्यातील समाज माध्यमावर सक्रिय असलेल्या एका व्यक्तीने लोकप्रतिनिधी आणि राजकीय व्यक्तींच्या वाहनांचे चित्रकरण करून समाज माध्यमावर प्रसारित केली. त्यामुळे जनसामान्य वर्गातही चर्चेचा विषय ठरला आहे. वाहनांवर नियमानुसार नंबर प्लेट असणे बंधनकारक आहे. नंबर प्लेटचा आकार, अक्षरांची रचना, रंग आणि त्यावरील मजकूर याबाबत केंद्र शासनाने नियम निश्चित केले आहेत. या नियमांचे उल्लंघन केल्यास सामान्य वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली जाते. मात्र, अनेक वेळा राजकीय व्यक्ती, लोकप्रतिनिधी किंवा प्रभावशाली व्यक्तींच्या वाहनांवर नंबर प्लेटऐवजी विशिष्ट अक्षरे, पदनाम, पक्षचिन्ह अथवा इतर प्रकारचा मजकूर आढळून येतो. त्यामुळे सर्वांसाठी नियम समान आहेत का, असा प्रश्न उपस्थित होतो.पुण्यातील या प्रकरणानंतर नियम मोडणाऱ्या सामान्य नागरिकांवर तत्काळ कारवाई होत असेल, तर त्याच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या राजकीय व्यक्ती अथवा लोकप्रतिनिधींच्या वाहनांवरही कारवाई होणार का? असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. ■



### पहिले आवाहन, नंतर कारवाई

आपापल्या कार्यक्षेत्रातील राजकीय व्यक्ती आणि लोकप्रतिनिधींच्या वाहनांवरील नंबर प्लेटची तपासणी करावी. नंबर प्लेट नियमांनुसार नसल्यास संबंधितांना प्रथम नियमानुसार नंबर प्लेट बसविण्याचे आवाहन करावे, अशा सूचना देण्यात आल्याचे समजते. त्यानंतरही संबंधितांनी नियमांचे पालन केले नाही, तर सामान्य वाहनधारकांप्रमाणेच राजकीय व्यक्ती आणि लोकप्रतिनिधींच्या वाहनांवरही नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. ■

### दुचाकी घसरुन झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू

सोलापूर : दुचाकी घसरुन झालेल्या अपघातात मंगळवेढा येथील एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. प्रवीण लक्ष्मण राठोड (वय -४०, रा. बालाजी नगर, ता.मंगळवेढा) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. शनिवार, दि.५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री बालाजी नगर फाट्याजवळ दुचाकी घसरुन ते जखमी झाले होते.


SBI
भारतीय स्टेट बँक
केंद्रीय भरती व पदोन्नती विभाग, कॉर्पोरेट सेंटर, मुंबई
इमेल: crpd@sbi.co.in

अर्जासाठी क्यूआर स्कॅन करा

**कंत्राटी तत्त्वावर विशेषज्ञ संवर्ग अधिकारी नियुक्ति**

भारतीय नागरिकांकडून कंत्राटी आधारावर खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**जाहिरात क्र.: CRPD/SCO/२०२६-२७/२३ (कंत्राटी पदे)**

| पदाचे नाव | रिक्त जागा | वय (३१.०७.२०२६ पर्यंत) | |
|---|---|---|---|
| | | किमान | कमाल |
| झोनल प्रमुख (रिटेल) | १ | ३५ | ५० |
| प्रादेशिक प्रमुख (आरएच) | ५ | ३५ | ५० |
| रिलेशनशिप व्यवस्थापक-टीम लीड | २४ | २८ | ४२ |
| गुंतवणूक विशेषज्ञ (आयएस) | ९ | २८ | ४२ |
| गुंतवणूक अधिकारी (आयओ) | ४ | २८ | ४० |
| व्ही.पी. वेल्थ | ९१ | २६ | ४२ |
| एव्हीपी वेल्थ | ७३ | २३ | ३५ |

पात्रता निकष (वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, नोकरीचे तपशील इत्यादि), रिक्त जागा तपशील, आवश्यक शुल्क आणि इतर तपशीलासाठी उपरोक्त विस्तृत जाहिरात क्रमांकांतर्गत बँकेच्या वेबसाईटवर **https://sbi.bank.in/web/careers/current-openings** लॉग ऑन करा. येथे ऑनलाईन अर्ज दाखल करण्याच्या व ऑनलाईन अर्ज शुल्क प्रदान करण्याच्या लिंक उपलब्ध आहेत. अर्ज करण्यापूर्वी व शुल्क भरण्यापूर्वी सविस्तर जाहिरात बघून आपली पात्रता आणि इतर तपशील यांची खात्री करण्यासाठी तपशीलवार जाहिरात तपासुन घ्यावी. काही शंका असल्यास, कृपया आम्हाला **"CONTACT US" → "Post Your Query"** या लिंकद्वारे लिहा, जी बँकेची वेबसाईट (**https://sbi.bank.in/web/careers/post-your-query**) वर उपलब्ध आहे.

- **ऑनलाईन अर्ज भरण्याची व शुल्क भरण्याची तारीख : ०४.०९.२०२६ ते २५.०९.२०२६**

**स्थान:** मुंबई
**दिनांक:** ०४.०९.२०२६ **महाव्यवस्थापक (आरपी आणि पीएम)**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## शिवालय संकुलात शिक्षक दिन साजरा

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

शिवालय शैक्षणिक संकुलात प्राथमिक माध्यमिक व ओम वैष्णव कनिष्ठ महाविद्यालय शिवालय विद्यामंदिर या शाळेत शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. प्रथमतः भारताचे माजी राष्ट्रपती शिक्षणतज्ञ डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे सचिव ओमभैय्या गणेशकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्तात्रय गणेशकर महाविद्यालयाचे प्राचार्या कांचन वाघचवरे उपस्थित होते यावेळी उपस्थित मान्यवराचा सत्कार प्राचार्या कांचन वाघचवरे यांनी केली. संस्थेच्या सर्व शिक्षक कर्मचारी यांचा संस्थेच्या वतीने सत्कार भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जेष्ठ शिक्षक रघुनाथ पवार, सिध्दारूढ रेऊरे, किरण शिंदे, कोळेकर अभिमान, जाधव, इंगळे, दुधाळ, बाळकृष्ण भोसले, बी डी चव्हाण, अमीत कंपल्ली, शिवशंकर माने, राजकुमार शिंदे उपस्थित होते.

## उज्वल हाऊसिंग सोसायटीत कृष्ण जन्माष्टमी आणि गोपालकाला साजरा

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**



उज्वल हाऊसिंग सोसायटीत संत श्री प्रेमानंदजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. सोसायटीमधील रहिवासी अनुपमा अनिल कुलकर्णी यांच्या निवासस्थानी हा उत्सव पार पडला. यावेळी राधा-कृष्णाच्या मूर्तीची आकर्षक सजावट करून विधिवत पूजन करण्यात आले. पूजेनंतर राधा-श्रीकृष्णाला ५६ भोगांचा नैवेद्य दाखविण्यात आला. या उत्सवासाठी कुलकर्णी परिवारासह उज्वल हाऊसिंग सोसायटीमधील रहिवाशांनी परिश्रम घेतले.



## सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलात शिक्षक दिन उत्साहात

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

भवानी पेठ येथील सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य भरतकुमार शालगर होते. प्रमुख अतिथी म्हणून सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर तसेच वालचंद आर्ट अँड सायन्स महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व संकुलाचे संस्थापक अध्यक्ष कै. बाबुरावसा भुमकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल, संस्थेचे सदस्य सुरेशसा बिद्री, गणेशसा दामजी, शैक्षणिक संस्थेचे सदस्य तुकारामसा पवार, संजीवसा रंगरेज आदिसह प्रशालेचे मुख्याध्यापक मोरेश्वर काटवे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मंजुषा माने व इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार आदी उपस्थित होते. याप्रसंगी प्रशालेच्या सहशिक्षिका संतोषी जाधव यांना बसवेश्वर विचार मंचच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. उज्वल मलजी यांनी केले तर आभार सहशिक्षिका सिमा शिमगे यांनी मानले.



## लायन्स गुणवंत शिक्षक पुरस्काराचे वितरण

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

लायन्स क्लब ऑफ सोलापूर व लिओ क्लब ऑफ सोलापूर यांच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या गुणवंत शिक्षकांना लायन्स झोन चेअरमन अमिता कारंडे यांच्या हस्ते लायन्स गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या राजाराम शितोळे, समीर कुलकर्णी, ज्ञानेश्वर पाटील, शशिकला कंठी आणि स्मिता गवसने या गुणवंत शिक्षकांचा शाल व पुष्पहार व शिक्षक दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ सोलापूरच्या वतीने लायन्स गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष मंजुनाथ दर्गोपाटील यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देत गुणवंत शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करणे हा क्लबसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे सांगितले. सहसचिव अकबर मुल्ला यांनी आभार मानले

# पंढरपुरातील उपनगरांवर विस्थापनाची टांगती तलवार

## पंढरपूर-लोणंद रेल्वे मार्गासाठी १६ हेक्टर जमीन केली जाणार संपादित

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ सप्टेंबर-**

सुमारे ११३ वर्षांपासून रखडलेल्या पंढरपूर-लोणंद रेल्वे मार्गाच्या कामाला आता गती मिळत असताना या मार्गाचा फटका पंढरपूर शहरालगतच्या लक्ष्मी टाकळी, इसबावी आणि वाखरी परिसरातील नागरिकांना बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या भागातील सुमारे १६ हेक्टर जमीन भूसंपादित करण्यात येणार असून, त्यासाठी प्रशासनाकडून प्रत्यक्ष सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे गेल्या ३० ते ४० वर्षांपासून या परिसरात घरे बांधून वास्तव्यास असलेल्या नागरिकांवर पुन्हा विस्थापित होण्याची वेळ येणार असल्याने चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान अनेक वर्षाच्या या भागातील वास्तव्यानंतर एकदमच हे संकट आल्याने या परिस्थितीत आता आम्ही जायचे कुठे ? असा उद्विग्न सवाल या भागातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पंढरपूर-लोणंद रेल्वे मार्गाचा प्रश्न गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित आहे. या मार्गासाठी पंढरपूर तालुक्यातील भूसंपादनाचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाल्याचे सांगितले जात आहे. आता उर्वरित २० टक्के भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. याच प्रक्रियेचा भाग म्हणून लक्ष्मी टाकळी, इसबावी आणि वाखरी परिसरातील जमीन संपादनासाठी संबंधित अधिकारी नुकतेच या भागात दाखल झाले होते.

**चार दशकांपूर्वी घेतल्या जमिनी, आता विस्थापनाची भीती**

लक्ष्मी टाकळी, इसबावी आणि वाखरी हा परिसर गेल्या काही दशकांत पंढरपूर शहराचा विस्तार झाल्यामुळे उपनगर म्हणून विकसित झाला आहे. अनेक नागरिकांनी ३० ते ४० वर्षांपूर्वी या भागात जमिनी घेतल्या. त्यानंतर बंगले, घरे उभारून कुटुंबासह ते येथे वास्तव्यास आहेत. अनेकांचे या परिसरात व्यवसाय, उपजीविका आणि सामाजिक जीवनही रुजले आहे.

**कॉरिडॉर नंतर रेल्वे मार्गाचे संकट**

एकीकडे पंढरपूर शहरातील मंदिर परिसराच्या विकासासाठी प्रस्तावित असलेल्या पंढरपूर कॉरिडॉरमुळे शेकडो नागरिक बाधित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कॉरिडॉरला बाधित नागरिकांकडून विरोध सुरू असतानाच आता शहरा लगतच्या उपनगरातील नागरिकांवर रेल्वे मार्गाच्या भूसंपादनामुळे विस्थापित होण्याची वेळ आली आहे.

**पालकमंत्री, खासदार, आमदारांची भेट घेणार**

या प्रश्नावर परिसरातील नागरिक आता जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार प्रणिती शिंदे आणि आमदार समाधान आवताडे यांच्याकडे निवेदन देण्याच्या तयारीत आहेत. रेल्वे मार्गाचा विकास रखडू नये, मात्र त्यासाठी वर्षानुवर्षे या भागात वास्तव्यास असलेल्या नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर विस्थापन होऊ नये, यासाठी रेल्वे मार्गात आवश्यक बदल करावेत, अशी मागणी देखील केली जाणार असल्याचे नागरिकांतून सांगितले जात आहे.

**ऐवढ्या वर्षाच्या वास्तव्यानंतर आता जायचं कुठे?**

रेल्वे मार्गासाठी सर्वेक्षण सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. 'आम्ही गेल्या ४०-४५ वर्षांपासून या भागात राहत आहोत. घरं बांधली, संसार उभा केला. आता ही जमीन रेल्वेमार्गासाठी गेली तर आम्ही जायचं कुठे?' असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**विकासाला विरोध नाही; मात्र घरांवर बुलडोझर नको**

पंढरपूर-लोणंद रेल्वे मार्ग हा पंढरपूरच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रकल्प मानला जात आहे. त्यामुळे रेल्वे मार्गाला विरोध करण्यापेक्षा विद्यमान वस्ती, घरे आणि नागरिकांचे कमीत कमी नुकसान होईल, अशा पद्धतीने मार्ग आखावा, अशी भूमिका या परिसरातील नागरिकांमधून मांडली जात आहे.



## साहित्य सेवा संघाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार डॉ. शंकर नवले यांना प्रदान

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

साहित्य सेवा संघ, सोलापूर यांच्या वतीने देण्यात येणारा 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगावचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांना प्रदान करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. कर्नल प्रकाश महानवर यांच्या हस्ते रविवारी (ता. ६) महाविद्यालयात झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात डॉ. नवले यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. शंकर नवले यांनी हा पुरस्कार सहकुटुंब स्वीकारला. 'माऊलीची कुशी' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक व मनोरमा परिवाराचे सर्वेसर्वा श्रीकांत मोरे होते. ज्येष्ठ कवी व लेखक प्रदीप पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. साहित्य सेवा संघाचे अध्यक्ष दत्तात्रय इंगळे (आलूरकर), सोलापूर विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. शंकर नवले यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगावचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## स्नेहा गायकवाड हिचे जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत यश

**अक्कलकोट, दि. ८ सप्टेंबर-**



कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी स्नेहा गायकवाड हिने दयानंद कॉमर्स कॉलेज सोलापूर येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. दयानंद कॉमर्स कॉलेज यांच्या वतीने जिल्हास्तरीय आयोजित करण्यात आलेल्या इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील ५७ विद्यार्थी सहभागी झाले होते. कल्याणशेट्टी महाविद्यालयातील कुमारी स्नेहा गायकवाड बीएससी भाग १ मुस्कान शेख व सपना चेंडके बीए भाग १ यांनी या वक्तृत्व स्पर्धेत सहभाग नोंदविला होता, पैकी स्नेहा गायकवाड, राहणार कोन्हाळी या विद्यार्थिनींनी स्पर्धेमध्ये नैपुण्य दाखवून क्रमांक पटकावला तिला इंग्रजी विभाग प्रमुख प्रा राजशेखर पवार यांचे मार्गदर्शन लाभले. संयोजक प्राचार्य डॉ शिवाजीराव शिंदे यांनी तिच्या वाकब चातुर्य विषयी विशेष कौतुक केले. या यशाबद्दल संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, समन्वयक पूनम कोकळगी, रुपाली शहा, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले.

# जुनी पोलिस लाईन सोसायटीमधील अतिक्रमण हटविले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

शहरातील मुरारजी पेठेतील जुनी पोलीस लाईन भाडेकरू सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ओपन स्पेसमधील गेल्या ३० वर्षापासूनचे अतिक्रमण शनिवारी जमीनदोस्त करण्यात आले. त्यामुळे जुना हिरज नाका ते निराळे बस्ती रोडने मोकळा श्वास घेतला.



मुरारजी पेठेत असलेल्या जुनी पोलीस लाईन भाडेकरू सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या जुना हिरज नाका ते निराळे बस्ती रोडवर असलेल्या ओपन स्पेसमध्ये गेल्या ३० वर्षापासून अतिक्रमण करण्यात आलेले होते. या जागेत अतिक्रमण करण्यात आलेल्यांना संस्थेकडून अतिक्रमण काढून घेण्यासाठी रितसर नोटीसा पाठविण्यात आलेल्या होत्या. तरीही अतिक्रमण करणाऱ्यांनी त्यांचे अतिक्रमण न काढल्याने शनिवारी पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्यात आली.

जेसीबीच्या मदतीने ओपन स्पेसमध्ये करण्यात आलेले पक्के बांधकाम, पत्रा शेड, अडगळीचे साहित्य हटविण्यात आले. हे अतिक्रमण काढण्यात आल्याने निराळे बस्ती ते जुना हिरज नाका रोडने मोकळा श्वास घेतला. या अतिक्रमण हटाव मोहिमेवेळी जुनी पोलिस लाईन, निराळे बस्ती आदी परिसरातील नागरीकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी संस्थेचे चेंअरमन अनिकेत व्यवहारे, सचिव वसंत येळे, अरुण देशमुख, दत्ता भोसले, प्रकाश सुखसे, संजय घाडगे, मधुकर व्यवहारे, सुरेश शिंदे, लक्ष्मी पावडे, बळीराम पावडे विकास घाडगे विशाल पवार नागरबाई ढोबळे आदी उपस्थित होते. या कारवाईसाठी पोलीस उपनिरीक्षक बावने, पवार यांचे सहकार्य मिळाले.

## जैन धर्माचा व्यावसायिक जीवनातील उपयोग ही काळाची गरज : मुनीश्री सुप्रभसागरजी महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

जैन धर्माचा व्यावसायिक जीवनातील उपयोग काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प. पू. विशुद्धरत्न श्रमण मुनीश्री सुप्रभसागरजी महाराज यांनी केले.

जैन धर्मातील तत्त्वे, मूल्ये आणि जीवनदृष्टी यांचा व्यावसायिक जीवनात प्रभावीपणे उपयोग कसा करता येईल, या विषयावर ते बोलत होते. सोलापुरातील जैन व्यावसायिकांसाठी विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. "Use of Jainism in Professional Life'हा या चर्चासत्राचा विषय होता. विशेष म्हणजे मुनीश्री सुप्रभासागरजी महाराज हे दीक्षेपूर्वी चार्टर्ड अकाउंटंट होते.



कार्यक्रमाची सुरुवात ऋजुता शाह यांच्या मंगलाचरणाने आणि ॲड. चारुकीर्ती शिरसोडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर सीए सुरेश पांढरे यांच्या हस्ते गुरुदेवांचे पादप्रक्षालन करण्यात आले. सीए संजीव पाटील, लक्ष्मी ग्रुप व रयत शिक्षण संस्था यांच्या वतीने मुनीश्रींना शास्त्रभेट देण्यात आली.

प्रास्ताविक सीएमए प्रा. अमोल क्षीरसागर यांनी केले. यानंतर सीएमए शिरीष शाह, मध्यप्रदेशातील सागर येथून विशेष उपस्थित असलेल्या सीए अदिती जैन तसेच मुनीश्री सुप्रभासागरजी महाराज यांनी दीक्षेपूर्वी आर्टिकलशिप केलेल्या फार्मचे सीए सचिन भट्टड यांनी आपले विचार मांडले. मुनीश्रींच्या आहारचर्येनंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. दुपारच्या सत्रात सोलापूर सीए ब्रँचच्या माजी अध्यक्षा अश्विनी दोशी आणि सीए गिरीश शहा यांनी उपस्थितांना विविध व्यावसायिक विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार सीए श्रेणिक शाह यांनी केले. सोलापुरातील जैन सीए, सीएमए, सीएस, टॅक्स प्रॅक्टिशनर्स तसेच विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील व्यावसायिकांचा कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



## बालविवाह थांबविण्यामध्ये 'शिक्षकांची भूमिका' या विषयावर चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सोलापूर तसेच महात्मा फुले समाजसेवा मंडळ, करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह थांबविण्यामध्ये शिक्षकांची भूमिका या विषयावर हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये चर्चासत्राचे आयोजित करण्यात आले.

यावेळी प्रा. दिपक क्षिरसागर यांनी बालविवाह रोखण्यासाठी फक्त शिक्षकच नाही तर समाजातील प्रत्येक घटकांनी पुढाकार घ्यायला पाहिजे यासाठी समाजामध्ये जनजागृती केली पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रकाश कांबळे यांनी बालविवाह रोखण्यासाठी शिक्षकाबरोबरच विद्यार्थ्यांनीसुद्धा एखाद्या ठिकाणी बालविवाह होत असल्यास न घाबरता तात्काळ प्रशासनास कळविले पाहिजे असे आवाहन केले . शाळा समिती अध्यक्ष सुरेश बाबू मंकणी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रमुख पाहुणे जिल्हा महिला बालविकास अधिकारी अविनाश मगर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी नितीन थोरात, चाइल्ड लाइन समन्वयक आनंद ढेपे, महात्मा फुले समाज सेवा मंडळ अध्यक्ष प्रमोद झिंगाडे, प्राचार्य प्रकाश कांबळे, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक भानुदास बनसोडे, आप्पासाहेब राऊत, कार्याध्यक्ष प्रमोद चुंगे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना बालविवाह न करण्याची व बालविवाह होऊ न देण्याची प्रतिज्ञा देण्यात आली.

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, कौशल्ये रुजवावीत : जवंजाळ

## प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेतर्फे ११ उपक्रमशील शिक्षकांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

मनपा शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर संस्कार, कौशल्ये आणि जीवनमूल्ये रुजवून सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडवावेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष शामराव जवंजाळ यांनी केले.

सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित उपक्रमशील शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा समाजकल्याण केंद्राच्या रंगभवन येथे झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शामराव जवंजाळ होते. प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हाध्यक्ष शशिकांत खुडे तसेच मनपा उर्दू टीचर्स प्रायमरीचे अध्यक्ष फजल अहमद शेख उपस्थित होते.यावेळी सोलापूर महानगरपालिकेच्या मराठी, कन्नड, उर्दू आणि तेलुगू माध्यमातील कार्यरत ११ उपक्रमशील शिक्षकांचा जवंजाळ यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप शाल, सन्मानचिन्हे, गौरवपत्र आणि चांदीच्या मूर्तीची फ्रेम असे होते. प्रास्ताविक पतसंस्थेचे चेअरमन नागेश गोसावी यांनी केले.



सूत्रसंचालन संचालक गंगाधर कांबळे व तज्ज्ञ संचालिका स्नेहा पुजारी यांनी केले. स्वाती शिंदे यांनी आभार मानले. यावेळी व्हाईस चेअरमन जहारा नगदेकर, संचालक गंगाधर कांबळे, स्वाती शिंदे, कृष्ण परमेश्वर सुतार, इम्रान जमादार, अफरोज बागवान, मुद्देसर पाशा पिरजादे, शाहीन शेख, केशव गलगली, भास्कर मदनाल, तज्ज्ञ संचालिका स्नेहा पुजारी, व्यवस्थापक समर्थ जाधव, लिपिक शाकीर शेख यांच्यासह मनपा शिक्षक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**या ११ शिक्षकांचा झाला गौरव :** अप्पासाहेब चंद्रकांत ककमारे,रियाज बिलाल नदाफ, हनुमंत कुंडलिक लंगोटे , दुर्गादेवी गणेश जंजिराल, शिरीन सलामतुल्ला शेख, विठ्ठल सत्यप्पा वाघमोडे, कल्पना व्यंकटेश कुरापाटी , तहसीन सोहेल शेख, शबाना परवीन सोहेल जमादार, महेबूबबी मुश्ताक अहमद शेख, इम्रान हुसेन मोहम्मद इसाक सौराज आदी शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### तृणमूल संबंधित वृत्तपत्रावर ईडीचा छापा

**कोलकाता :** अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने तृणमूलचे राज्यसभा सदस्य नदीमुल हक आणि त्यांच्याशी संबंधित एका उर्दू वृत्तपत्राच्या परिसरात २४ तासांहून अधिक काळ शोधमोहीम राबवली. ही कारवाई ७ सप्टेंबरला सकाळी सुरू झाली आणि मंगळवारी पहाटे संपली. ईडीच्या अधिकाऱ्यांनुसार, तपासात सुमारे ६० कोटी रुपयांच्या व्यवहारांमध्ये आर्थिक अनियमितता उघडकीस आली आहे. या व्यवहारांना समर्थन देणारी आवश्यक कागदपत्रे तत्काळ उपलब्ध झाली नाहीत.

### मुलाला कोठडी, आई-वडिलांना तुरुंगवास

**नवी दिल्ली :** सत्य निकेतन पीजी इमारत अपघात प्रकरणात कठोर भूमिका घेत दिल्ली न्यायालयाने आरोपी हरिराम आणि उर्मिला यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तर तिसरा आरोपी मुलगा महेशला पुढील तपासासाठी दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. या प्रकरणात पोलिसांनी फरार कंत्राटदार सनोजला उत्तर प्रदेशातील कासगंज येथून अटक केली आहे. पोलिस चौकशीदरम्यान, आरोपी महेशने अनेक महत्त्वाचे खुलासे केले आहेत. त्याने सांगितले की, तो त्याच्या आई-वडिलांच्यामार्फत संपूर्ण इमारतीची देखभाल सांभाळत होता. ऑगस्ट २०२५ मध्ये ही इमारत 'हॉस्टेल डेज' नावाच्या पीजी चालकांना भाड्याने देण्यात आली होती. पावसामुळे गत ८-१० दिवसांपासून तळघरात कचरा आणि पाणी साचले होते. त्यामुळे दुरुस्तीचे काम सुरू होते. याशिवाय, तळमजल्याचा व्यावसायिक वापरासाठी विस्तार केला जात होता.

### येमेनमधील तुरुंगावर हल्ला; सात जण ठार

**कैरो :** उत्तर येमेनमधील एका तुरुंगावर सोमवारी हल्ला झाला. हुथी बंडखोरांनी सौदी अरेबियावर हा हल्ला केल्याचा आरोप केला आहे. या हल्ल्यात एका मुलासह सात जण ठार तर एका महिलेसह सात जण जखमी झाले. अल-जॉफ प्रांतातील सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या हझम शहरातील मध्यवर्ती सुधारगृहात हा हल्ला झाला.

हल्ल्यानंतर तुरुंगाच्या इमारतीचा काही भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. तुरुंग रक्षकानुसार, ३५ कैदी आणि आपल्या पतीला भेटायला आलेली एक महिला ढिगाऱ्याखाली अडकली होती. हुथी आरोग्य मंत्रालयाचे प्रवक्ते अनिस अल-अस्बाही यांनी सौदी अरेबियावर हल्ल्याचा आरोप केला. हुथी लष्कराचे प्रवक्ते ब्रिगेडियर जनरल याह्या सारी यांनीही सौदी अरेबियावर हवाई हल्ले करून जॉफमध्ये नरसंहार केल्याचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, सौदी अरेबियाने एक निगराणी ड्रोन तैनात केले आहे आणि भाडोत्री सैनिकांना विविध शस्त्रे पुरवली आहेत.

# भीषण अपघातात सहा मजुरांचा मृत्यू

## मृतांमध्ये तीन वर्षीय चिमुकल्याचा समावेश; सात गंभीर; गोंदिया-बालाघाट मार्गावरील घटना

**गोंदिया, ८ सप्टेंबर**

गोंदिया-बालाघाट मार्गावरील नागरा गावाजवळ मजुरांच्या वाहनाला सोमवारी मध्यरात्री भीषण अपघात झाला. या अपघातात सहा मजुरांचा जागीच मृत्यू तर चालकासह सात जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये एका तीन वर्षीय चिमुकल्याचा समावेश असून विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकच्या धडकेने मजुरांच्या वाहनाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.



अपघातग्रस्त ट्रक व चेंदामेंदा झालेले वाहन

मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील किरनापूर परिसरातील मजूर पिकअप वाहन क्रमांक एमपी-१५ टी-३४९५ मधून रोजगारासाठी तेलंगणातील जगतिहाल, करीमनगरकडे निघाले होते. दरम्यान, नागरा गावाजवळ गोंदियाच्या दिशेने भरधाव येणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच-३५ एजे-२५४७ ने पिकअपला समोरून जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, पिकअप वाहनाचा चुराडा झाला. या अपघातात आरुष मात्रे (३), किरण वैद्य (२६), संतोष मात्रे (३८), सुशीला मात्रे (३५), रूपसेन सत्यकर (३५) आणि ज्योती सत्यकर (३२) यांचा जागीच मृत्यू झाला. तर भूमेश्वर मात्रे (४७), संगीता मात्रे (३५), राजेंद्र पंचाले (३०), लक्ष्मी पंचाले (२७), संतोष वैद्य (३५), राकेश बाहे (२४) तसेच पिकअप चालक संदीप बाहे हे गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमींना उपचारासाठी गोंदिया येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघाताची तीव्रता एवढी होती की, धडकेचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती गोंदिया ग्रामीण पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत वाहनात अडकलेल्या जखमींना नागरिकांच्या मदतीने बाहेर काढले. त्यानंतर रुग्णवाहिकेतून त्यांना गोंदिया येथील केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

### परिसर सुन्न...

रोजगाराच्या शोधात तेलंगणाकडे निघालेल्या मजुरांवर काळाने घाला घातल्याने बालाघाट तसेच गोंदिया परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. एकाच परिसरातील सहा जणांचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या भीषण दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसर सुन्न झाले असून शोककळा पसरली आहे.

# 'नाराज फुफाजी' ते 'झूठ की गूंज'

## पंतप्रधान मोदींनी घेतला विरोधकांचा समाचार

**बडोदा, ८ सप्टेंबर**



नव्याने सुरू केलेल्या पश्चिम मालवाहतूक मार्गिकेवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी विरोधकांवर टीकास्त्र सोडले. विरोधक 'नाराज फुफाजी'प्रमाणे तक्रारी करत राहतात आणि विनाकारण समस्या निर्माण करतील. काँग्रेस नेते राहुल गांधी यांची सरकारविरुद्धची मोहीम म्हणजे 'झूठ की गूंज' असल्याचे त्यांनी सांगितले.

नवी मुंबईतील जवाहरलाल नेहरू बंदर आणि उत्तरप्रदेशातील दादरी यांना जोडणाऱ्या पश्चिम मालवाहतूक मार्गिकेच्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांचे उद्घाटन आणि या प्रकल्पाची पूर्तता या निमित्ताने बोलताना, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या प्रशासनाच्या अंमलबजावणीच्या गतीचे कौतुक केले आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील तत्कालीन संपुआ सरकारच्या कार्यपद्धतीचा वेग मंद होता, असे म्हटले.

२०१४ नंतर, तुमच्या आशीर्वादाने मी दिल्लीला पोहोचलो आणि तिथे दाखल होताच आम्ही या प्रकल्पाला गती दिली. आज 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर'चे काम पूर्ण झाले आहे, असे मोदी म्हणाले. काँग्रेसने सुरू केलेल्या 'छात्रों की गूंज' या संवाद मोहिमेची खिल्ली उडवताना त्यांनी हा 'झूठ की गूंज' कार्यक्रम असल्याचे म्हटले. या मोहिमेच्या अंतर्गत विविध शहरांमध्ये कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या मोहिमेद्वारे काँग्रेस परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटणे, महागडे शिक्षण, सरकारी भरतीतील अनियमितता आणि बेरोजगारी यासारख्या मुद्द्यांवरून भाजपाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत आहे.

नव्याने कार्यान्वित झालेल्या मालवाहतूक मार्गिकेसारख्या पायाभूत सुविधांच्या महत्त्वाच्या टप्प्यांमध्येही विरोधक नेहमीच दोष शोधत राहतील, असे नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींवर टीका करताना म्हटले. मुंबईतील जेएनपीटी बंदरापासून बडोद्यापर्यंत नुकतीच 'डबल-स्टॅक' कंटेनर मालगाडी चालवण्यात आली; या गाडीच्या एकाच फेरीत २५० पेक्षा जास्त ट्रकच्या क्षमतेइतका माल या दोन शहरांदरम्यान वाहून नेण्यात आला, असे मोदींनी सांगितले.

आता 'नाराज फुफाजी' ट्रकचालकांचे काय होणार? ट्रक कुठे जाणार? लोकांनी खरेदी केलेल्या ट्रकांचे काय, असे प्रश्न उपस्थित करीत ओरडायला लागतील. आता फुफाजींची तक्रार करण्यासाठी एक नवीन मुद्दा सापडला आहे, अशी टिप्पणी मोदींनी केली. देशाच्या प्रगतीविरुद्ध तक्रारींचे मुद्दे मुद्दामहून निर्माण करण्याकडे विरोधी पक्ष धडपडत असतात, असे त्यांनी या माध्यमातून सुचवले.

**२०१४ नंतर ५० हजार आधुनिक रेल्वे डब्यांचे उत्पादन**

२०१४ नंतर भारताने ५०,००० आधुनिक रेल्वे डबे तयार केले. याउलट, मागील सरकारला दहा वर्षांत ५० हजार शौचालयेही उभारता आली नव्हती, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. देशातील तरुण राजकीय बढायांऐवजी वास्तवालाच प्राधान्य देत राहतील, यावर नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा भर दिला. (वृत्तसंस्था)

# लिंगनिदान रोखण्यासाठी 'टास्क फोर्स'

## जिल्हे व महापालिकांना भेटी देऊन कारवाईचा आढावा घेणार

**मुंबई, ८ सप्टेंबर**



राज्यातील गर्भलिंग निदानाला प्रतिबंध करून स्त्रीभ्रूणहत्या रोखण्याबरोबरच बेकायदेशीर गर्भपातांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरीय विशेष कृती दल स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवड प्रतिबंध) अधिनियम अर्थात पीसीपीएनडीटी ॲक्ट आणि वैद्यकीय गर्भपात अधिनियम यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हे पथक राज्यातील जिल्हे व महानगरपालिकांना प्रत्यक्ष भेटी देऊन परिस्थितीचा आढावा घेणार आहे.

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने ८ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. या विशेष कृती दलाच्या अध्यक्षपदी विधानपरिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांची नियुक्ती करण्यात आली असून, विधानपरिषद व विधानसभेतील सदस्यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे. अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यातील जिल्हे आणि महानगरपालिका क्षेत्रांमध्ये पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रत्यक्ष आढावा घेणे, सोनोग्राफी व तत्सम केंद्रे तसेच वैद्यकीय गर्भपात केंद्रांची तपासणी करणे आणि कायद्याचे उल्लंघन आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना देणे, ही या पथकाची प्रमुख जबाबदारी असणार आहे. विशेष कृती दलाकडून विविध जिल्हे व महानगरपालिकांमधील कायद्याच्या अंमलबजावणीत असलेल्या त्रुटी आणि अडचणींचाही अभ्यास केला जाणार आहे. त्यावर मात करण्यासाठी शासनाला सुधारात्मक उपाययोजनांच्या शिफारशी करण्यात येतील. तसेच स्त्रीभ्रूणहत्या रोखणे आणि मुलींच्या जन्माचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने जनजागृतीसाठी उपाययोजना सुचविण्याचे कामही समिती करणार आहे. गर्भलिंग निदान आणि स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी कायद्याच्या अंमलबजावणीसोबतच प्रभावी देखरेख, नियमित तपासणी आणि जनजागृतीवर भर देण्याचा शासनाचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. (तभा वृत्तसेवा)

### दर तीन महिन्यांनी द्यावा लागेल अहवाल

जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त तसेच संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांना या पथकाच्या दौऱ्यावेळी आवश्यक प्रशासकीय, तांत्रिक आणि अभिलेखीय सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पथकाने केलेल्या निरीक्षणांचा आणि शिफारशींचा अहवाल दर तीन महिन्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाला सादर करावा लागणार असून, त्यानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही केली जाणार आहे. या राज्यस्तरीय विशेष कृती दलाचा कार्यकाळ तीन वर्षांचा राहणार आहे.

### इमारत कोसळण्याच्या घटनेची सर्वोच्च न्यायालयाकडून दखल

**नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

दिल्लीतील 'सत्य निकेतन' इमारत कोसळण्याच्या घटनेशी संबंधित मुद्द्यांवर १० सप्टेंबर रोजी विचार केला जाईल आणि आवश्यकता भासल्यास, उच्च न्यायालयाने हाताळलेले हे प्रकरण स्वतःकडे वर्ग करू, असे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी सांगितले.

देशभरातील निवासी क्षेत्रांमधील अनधिकृत बांधकामे, अग्निसुरक्षा आणि नियमांचे उल्लंघन करून निवासी जागांचे व्यावसायिक आस्थापनांमध्ये केलेले रूपांतर यासारख्या मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालय आधीच सुनावणी करीत आहे. त्यातच, रविवारी घडलेल्या आणि सात विद्यार्थ्यांचा बळी घेणाऱ्या घटनेशी संबंधित प्रकरणावर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती न्यायालयाला करण्यात आली. (वृत्तसंस्था)

# डीएनएस बँकेला प्रतिष्ठित 'ग्रेट प्लेस टू वर्क' प्रमाणपत्र

**मुंबई, ८ सप्टेंबर**

Great Place To Work® Certified AUG 2026-AUG 2027 INDIA

डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेडला 'ग्रेट प्लेस टू वर्क इंस्टिट्यूट, इंडिया'कडून प्रतिष्ठित 'ग्रेट प्लेस टू वर्क' प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. बँकेच्या ५६व्या वर्धापनदिनानिमित्त अध्यक्ष ॲड. गणेश धारगळकर यांनी गौरव प्राप्त झाल्याची घोषणा केली आहे.

नुकत्याच गठित झालेल्या नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या कार्यकाळातील हा पहिला महत्त्वपूर्ण सन्मान असून, तो बँकेसाठी अत्यंत आनंददायी आणि सकारात्मक सुरुवात ठरला आहे.

कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अभिप्राय व प्रत्यक्ष कार्यानुभवावर आधारित असलेले हे प्रमाणपत्र बँकेतील विश्वास, सकारात्मक कार्यसंस्कृती आणि कर्मचारीकेंद्री नेतृत्वाचे द्योतक आहे. ५६ वर्षांच्या वाटचालीत डीएनएस बँकेने महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशमध्ये विस्तार साधताना विश्वास, सहकार, सामूहिक प्रगती आणि सेवाभाव ही मूल्ये जपली आहेत. हा सन्मान डीएनएस बँक परिवारातील प्रत्येक कर्मचाऱ्याच्या समर्पणाला आणि योगदानाला समर्पित आहे, असे अध्यक्ष ॲड. गणेश धारगळकर म्हणाले.

हे प्रमाणपत्र कर्मचाऱ्यांचा संस्थेवरील विश्वास अधोरेखित करणारे असून, आगामी काळात अधिक नावीन्यपूर्ण, उत्तरदायी आणि ग्राहककेंद्री कार्यसंस्कृती निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी ठरेल, असे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी विश्राम दीक्षित यांनी सांगितले. कर्मचारी विकास, कौशल्यवृद्धी, पारदर्शक संवाद, नेतृत्वविकास, कल्याण आणि सर्वसमावेशकता यांना प्राधान्य देत डीएनएस बँक आपली भविष्यवेधी मनुष्यबळ धोरणे अधिक सक्षम करत आहे.

कर्मचारी अनुभव आणि ग्राहक अनुभव यांचा थेट संबंध असल्याने, आनंदी, सक्षम आणि प्रेरित कर्मचारीवर्गाच्या माध्यमातून उत्कृष्ट ग्राहकसेवा देण्यास बँक कटिबद्ध आहे. जागतिक स्तरावर प्रतिष्ठित असलेला हा सन्मान प्राप्त करणाऱ्या भारतातील अग्रणी बहुराज्यीय शेड्युल्ड सहकारी बँकांमध्ये आता डीएनएस बँकेचा समावेश झाला आहे.

'ग्रेट प्लेस टू वर्क' हा सन्मान डीएनएस बँकेच्या परिवर्तनाच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा असून, सहकाराच्या मूल्यांवर आधारित आधुनिक, तंत्रज्ञान-सक्षम आणि कर्मचारीकेंद्री बँक घडविण्याच्या बँकेच्या संकल्पाला यामुळे अधिक बळ मिळाले आहे. (वृत्तसंस्था)



पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी गुजरातमधील बडोदा येथे झालेल्या कार्यक्रमात जेन-झी सोबत संवाद साधला.

# लॉजिस्टिक्स व्यवस्थेला नवी गती : पंतप्रधान

**मुंबई, ८ सप्टेंबर**

पश्चिम आणि पूर्व समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिका पूर्ण झाल्यामुळे देशाच्या मालवाहतूक क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन घडत आहे. जेएनपीटी बंदरातून सुटलेली पहिली डबल-स्टॅक कंटेनर मालगाडी या परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा आहे. या प्रणालीमुळे एका मालगाडीतून सुमारे २५० ट्रक्स इतका माल अत्यंत वेगाने वाहून नेणे शक्य होणार असून, मालवाहतुकीचा वेळ आणि खर्च दोन्ही कमी होतील, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

पश्चिम समर्पित मालवाहतूक मार्गिकेच्या ३२६ किमी लांबीच्या आणि २०,७०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या तीन टप्प्यांचे राष्ट्रार्पण पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उरण येथील जेएनपीए येथे पार पडले.

याप्रसंगी त्यांनी व्ही.सी.द्वारे डबल-स्टॅक मालगाडीला हिरवा झेंडा दाखवला. कार्यक्रमास राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांच्यासह जपानच्या महावाणिज्यदूत साती हितोमी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या मार्गिकेमुळे देशातील ५५ टक्के कंटेनर वाहतूक हाताळणाऱ्या जेएनपीटीच्या क्षमतेत मोठी वाढ होणार आहे. चालू वर्षात एप्रिल ते ऑगस्टदरम्यान २८.२७ लाख टीईयू कंटेनर हाताळले गेले असून, या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या लॉजिस्टिक्स क्षेत्राला मोठी चालना मिळेल. २०३० पर्यंत जेएनपीटी हे देशातील दशलक्ष टीईयूपेक्षा अधिक क्षमता असलेले देशातील पहिले बंदर ठरेल असा आशावाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. (तभा वृत्तसेवा)

# अनेक क्रीडा प्रकारांना आरक्षणाचा लाभ

## यापूर्वीचे सर्व शासन निर्णय रद्द

**मुंबई, ८ सप्टेंबर**

सुधारित धोरणात धनुर्विद्या, मैदानी व धावण्याचे खेळ, बॅडमिंटन, बास्केटबॉल, मुष्टियुद्ध, नौकानयनाचे विविध प्रकार, क्रिकेट, सायकलिंग, तलवारबाजी, फुटबॉल, जिम्नॅस्टिक्स, हँडबॉल, हॉकी, ज्युडो, कबड्डी, खो-खो, मल्लखांब, रग्बी, नेमबाजी, जलतरण, टेबल टेनिस, तायक्वांदो, ट्रायथलॉन, व्हॉलीबॉल, आधुनिक पंचक्रीडा, भारोत्तोलन, कुस्ती, स्केटबोर्डिंग, सर्फिंग, गोल्फ, बुद्धिबळ, अश्वारोहण आणि टेनिस यासह विविध खेळांचा समावेश करण्यात आला आहे. क्रीडा आरक्षणाच्या धोरणात सुसूत्रता आणि एकसंधता आणण्यासाठी यापूर्वी जारी करण्यात आलेले सर्व शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत.

गटानुसार पात्रतेचे निकष निश्चित करण्यात आले असून, गट-अ पदांसाठी ऑलिम्पिक, आशियाई क्रीडा स्पर्धा, वरिष्ठ गटातील जागतिक व आशियाई अजिंक्यपद स्पर्धा, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, वरिष्ठ गटातील राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा, बुद्धिबळातील ग्रँडमास्टर दर्जा, टेनिसमधील चार प्रमुख स्पर्धा तसेच पॅरालिम्पिक आणि पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय किंवा तृतीय क्रमांक मिळविणारे खेळाडू पात्र ठरतील.

गट-ब राजपत्रित पदांसाठी युवा किंवा कनिष्ठ गटातील जागतिक, आशियाई आणि राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा, युवा ऑलिम्पिक, युवा आशियाई व राष्ट्रकुल स्पर्धा, आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा, जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा, बुद्धिबळातील आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा तसेच पॅरा जागतिक, आशियाई आणि राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धांतील पदकविजेते पात्र राहतील.

गट-ब अराजपत्रित पदांसाठी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा, राष्ट्रीय महासंघ चषक स्पर्धा, पॅरा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आणि राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांतील पदकविजेत्यांना प्राधान्य मिळणार आहे.

गट-क पदांसाठी खेलो इंडिया स्पर्धा, अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा, राज्यस्तरीय वरिष्ठ, युवा व कनिष्ठ क्रीडा स्पर्धा, राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा, राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ स्पर्धा तसेच राज्यस्तरीय पॅरा क्रीडा स्पर्धांतील पदकविजेते पात्र राहतील.

गट-ड पदांसाठी क्रीडा विषयक अर्हता धारण करणारे खेळाडू तसेच वरिष्ठ गटातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा आणि पॅरा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झालेले खेळाडू पात्र ठरतील. (वृत्तसंस्था)

### २०३१ पर्यंत राबविणार महत्त्वाकांक्षी प्रकल्प

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी 'प्रगती' (प्रायमरी हेल्थकेअर रिइमॅजिन्ड विथ अडव्हान्स्ड गव्हर्नन्स ॲंड अक्सेसिबल टेक्नॉलॉजी इंटिग्रेशन) या आरोग्य सुधारणा प्रकल्पाला आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. २०२६ ते २०३१ या कालावधीत हा प्रकल्प राबविण्यास तसेच आशियाई विकास बँकेकडून कर्ज स्वरूपात आर्थिक सहाय्य घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# महाराष्ट्रात दिसला दुर्मिळ विदेशी पाहुणा

## जंजाळा किल्ल्यावर आढळला 'युरोपियन रोलर'

**छ. संभाजीनगर, ८ सप्टेंबर**

छत्रपती संभाजीनगरमधील सिल्लोड जवळील ऐतिहासिक जंजाळा किल्ला आणि घटोत्कच लेणी परिसरात एका दुर्मिळ व अत्यंत आकर्षक 'युरोपियन रोलर' हा विदेशी पाहुणा दिसला आहे.



निसर्ग मित्र मंडळ आयोजित निसर्ग भ्रमंती दरम्यान पक्षीमित्र किशोर गठडी यांनी या दुर्मिळ पक्ष्यांसह तब्बल ३४ विविध प्रजातींच्या पक्ष्यांची नोंद जागतिक स्तरावरील 'ईबर्ड' प्लॅटफॉर्मवर केली आहे. या मोहिमेत मंडळाचे सचिव व महाराष्ट्र पक्षी मित्र संघटनेचे समन्वयक किशोर गठडी यांच्यासोबत निसर्गप्रेमी सहभागी झाले होते. सर्वांनी गडाच्या समृद्ध जैवविविधतेचा अभ्यास केला. पक्षी निरीक्षणादरम्यान एकाच वेळी दोन 'युरोपियन रोलर' आणि पाच 'स्थानिक इंडियन रोलर' (नीलकंठ) पक्षी एकत्र पाहायला मिळाले. गडद व फिकट निळ्या चमकदार रंगांचा 'युरोपियन रोलर' हवेतील सुरेख कसरतींसाठी ओळखला जातो. जंजाळा किल्ल्याच्या तटबंदीवरून उडणाऱ्या या पक्ष्याचे विहंगम दृश्य किशोर गठडी यांनी कॅमेऱ्यात टिपले. जंजाळासारख्या ऐतिहासिक, उंच गडावर गवताळ प्रदेश आणि दऱ्यांचे संरक्षण लाभल्याने एकाच वेळी दोन युरोपियन रोलर व ३४ प्रजाती आढळणे हे परिसराच्या समृद्ध जैवविविधतेचे प्रतीक आहे. 'ईबर्ड'वरील या नोंदीमुळे या परिसराकडे जागतिक अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले आहे, असे मागील ४० वर्षांपासून पक्षी संवर्धनात कार्यरत असलेले किशोर गठडी म्हणाले.

### विश्रांतीसाठी थांबतात भारतात

हा पक्षी भारतात कायमस्वरूपी न राहता 'पॅसेज मायग्रंट' (प्रवासी पक्षी) म्हणून येतो. मध्य आशिया आणि काश्मीरमध्ये वीण झाल्यानंतर दक्षिण आफ्रिकेकडे स्थलांतर करताना, ऑगस्ट ते नोव्हेंबर दरम्यान हे पक्षी भारतात विश्रांतीसाठी थांबतात. गठडी यांनी नोंदवलेल्या ३४ प्रजातींमध्ये कपाशी घार, शिक्रा, काळी घार, भारतीय धनेश, मोर, भारद्वाज, खाटीक, चंडोल, सुतार पक्षी, कोकिळा, सुगरण, ठिपकेवाली मुनिया, पिंगळा, बुलबुल आणि कोतवाल यांसारख्या अनेक महत्त्वाच्या पक्ष्यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# आता 'एमपीएससी'ची परीक्षा !

महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजे राज्यातील लाखो तरुणांच्या स्वप्नांचा आधार. हातात पुस्तके, डोळ्यांत अधिकारी होण्याचे स्वप्न आणि आपल्या मेहनतीवर विश्वास ठेवून वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या तरुणांसाठी एमपीएससी म्हणजे भविष्याची दारे उघडणारी संस्था. त्यामुळे या संस्थेच्या कामकाजाबद्दल शंका निर्माण होणे म्हणजे त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर, त्यांच्या भविष्यावर आणि व्यवस्थेवरील विश्वासावर होतो. दुर्दैवाने, आज ही शंका केवळ सोशल मीडियापुरती किंवा अभ्यासिकेतील चर्चांपुरती मर्यादित राहिलेली नाही; ती आता रस्त्यावर आली आहे. पुण्यात सोमवारी हजारो विद्यार्थ्यांनी काढलेला आक्रोश मोर्चा त्याचीच साक्ष देत होता. ओंकारेश्वर परिसरापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत विद्यार्थ्यांचा आक्रोश पोहोचला. यात अध्यक्षांच्या राजीनाम्याची, परीक्षांच्या प्रक्रियेचे स्वतंत्र ऑडिट करण्याची आणि दोषींवर कारवाईची मागणी झाली. सरकारला यासाठी अल्टिमेटमही देण्यात आला. ज्या युवाशक्तीच्या हातात उद्याच्या महाराष्ट्राची धुरा असायला हवी, त्यांना जर आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर हे अत्यंत वेदनाजनक आहे. पारदर्शक कारभार, वेळेत परीक्षा आणि अचूक नियोजन हा विद्यार्थ्यांचा-उमेदवारांचा मूळ अधिकार आहे. या जनक्षोभाची दखल घेऊन प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलायला हवीत. या आंदोलनाच्या निमित्ताने काँग्रेससह विरोधकांनी राजकीय स्वार्थ साधण्याचा प्रयत्न निश्चितच केला आहे. सत्ताधाऱ्यांविरोधात वातावरण निर्माण करण्याची राजकीय संधी ते विरोधक म्हणून कधीच सोडणार नाहीत. परंतु, म्हणून विद्यार्थ्यांच्या मनातील असंतोषच राजकीय आहे, असा निष्कर्ष काढणे चुकीचे आहे. आंदोलनात राजकीय चेहरे आले म्हणून विद्यार्थ्यांचे प्रश्न 'राजकीय' होत नाहीत. उलट, राजकीय नेते येण्यापूर्वीच विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. आता त्यांना उत्तरे हवी आहेत, असा विचार करण्याची आवश्यकता आहे. सध्याच्या वादाचे गांभीर्य समजून घेण्यासाठी औषध निरीक्षकपदाची परीक्षा हे एक उदाहरण पुरेसे आहे. २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या या परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर एमपीएससीने अखेर ही परीक्षा रद्द केली. परीक्षा झाली, विद्यार्थी पुढच्या प्रक्रियेत गेले, मुलाखतीही झाल्या आणि त्यानंतर संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याची वेळ आली. वर्षभराच्या तयारीचा, पैशाचा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे वेळेचा हिशेब कोण देणार?

आता प्रश्न फक्त एका परीक्षेचा राहिलेला नाही. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ आणि कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२४ च्या उत्तरपत्रिका तपासणीबाबतही विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. गुणांमधील तफावत, मूल्यांकनाबाबतच्या शंका आणि स्पष्टीकरणाची मागणी पुढे आली आहे. आयोगाने प्रक्रिया पारदर्शक असल्याचे सांगितले असले, तरी संशय निर्माण झाल्यानंतर केवळ 'सगळे व्यवस्थित झाले' असे सांगणे पुरेसे नसते; ते व्यवस्थित कसे झाले, हे देखील दाखवावे लागते. हीच आज एमपीएससी समोरची खरी कसोटी आहे. कारण, परीक्षा व्यवस्थेत एकदा 'काहीतरी गडबड असू शकते' असा संशय विद्यार्थ्यांच्या मनात घर करू लागला की, त्याचा परिणाम केवळ एका निकालावर होत नाही. तो संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर होतो. आज विद्यार्थी प्रश्नपत्रिका सुरक्षित आहे का, उत्तरपत्रिका योग्य तपासली जाते का, निकालात काही गडबड तर होणार नाही ना, उद्याची परीक्षा अचानक रद्द होणार नाही ना, अशा अनेक प्रश्नांसह अभ्यास करत असेल, तर ही परीक्षा व्यवस्था तांत्रिकदृष्ट्या कितीही सक्षम असली तरी ती विश्वासार्ह म्हणता येणार नाही. स्पर्धा परीक्षेतील सर्वांत मोठे भांडवल म्हणजे विश्वास; आणि आज नेमका तोच डळमळीत होत आहे. एमपीएससीला यापेक्षा मोठा इशारा आणखी कोणता हवा? कालपर्यंत परीक्षा केंद्राबाहेर शांतपणे रांगेत उभे राहणारे विद्यार्थी आज रस्त्यावर उतरले आहेत हे पुरेसे नाही काय? पुण्यातच नव्हे, तर राज्याच्या विविध भागांत विद्यार्थ्यांचा असंतोष व्यक्त होत आहे. याकडे केवळ 'आंदोलन करून दबाव आणणारे विद्यार्थी' म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. या मुलांनी आपली अनेक वर्षे या परीक्षेसाठी पणाला लावली आहेत. एखादी परीक्षा रद्द झाली की त्यांच्यासाठी ती फक्त एक तारीख रद्द होत नाही; त्यांच्या आयुष्यातील अनेक महिने 'रद्द' होतात. त्यांची स्वप्ने रद्दीत जातात. वयाची मर्यादा जवळ येते. आर्थिक ताण वाढतो. मानसिक दबाव वाढतो. व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले, तर या तरुणांनी काय करायचे? म्हणूनच सरकारने एमपीएससीला उगाच पाठीशी घालण्याची भूमिका घेऊ नये. आयोगाच्या स्वायत्ततेचा आदर असलाच पाहिजे; परंतु स्वायत्तता म्हणजे उत्तरदायित्वापासून मुक्तता नव्हे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे पाऊल उचलले आहे, तसेच पेपरफूट रोखण्यासाठी नव्या कायद्याची ग्वाही दिली आहे. ही सुरुवात योग्य आहे; पण विद्यार्थ्यांना आता आणखी ठोस कृती हवी आहे. उच्चस्तरीय समितीने केवळ अहवाल देऊन थांबू नये. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ती परीक्षा केंद्रावर पोहोचेपर्यंत, केंद्र व्यवस्थापनापासून उत्तरपत्रिका तपासणीपर्यंत आणि निकाल जाहीर होईपर्यंत संपूर्ण प्रक्रियेचा स्वतंत्र सुरक्षा आणि फॉरेन्सिक ऑडिटचा आराखडा तयार झाला पाहिजे. दोषी कोणीही असो; अधिकारी, कर्मचारी, दलाल किंवा बाहेरील व्यक्ती- त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. आणि इथेच येतो नैतिक जबाबदारीचा प्रश्न.

एखाद्या संस्थेच्या कामकाजाबद्दल सातत्याने गंभीर प्रश्न उपस्थित होत असतील, विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरावे लागत असेल आणि संस्थेच्या प्रमुखाच्या राजीनाम्याची मागणी हजारो विद्यार्थी करत असतील, तर त्या संस्थेच्या अध्यक्षांनी स्वतः पुढे येऊन जबाबदारी स्वीकारणे अपेक्षित आहे. एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीकडे केवळ राजकीय मागणी म्हणून पाहता येणार नाही. राजीनामा म्हणजे दोष सिद्ध झाल्याची कबुली नव्हे. पण तो नैतिक उत्तरदायित्वाचा संदेश ठरू शकतो. चौकशी निष्पक्ष व्हावी, संस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण व्हावा आणि विद्यार्थ्यांना 'आमच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले जात आहे' असा संदेश मिळावा, यासाठी हा मार्ग ठरू शकतो. आज एमपीएससीसमोरचा प्रश्न एवढाच नाही की परीक्षा व्यवस्थित झाली का? प्रश्न हा आहे की विद्यार्थ्यांचा ती व्यवस्थित झाली यावर विश्वास आहे का? या दोन प्रश्नांमध्ये मोठा फरक आहे. आयोगाने हा फरक समजून घेतला पाहिजे. कारण पुस्तक हातात घेऊन अभ्यास करणाऱ्या मुलांना राजकारण नको आहे. त्यांना आंदोलन नको आहे. त्यांना रस्त्यावर उतरण्याची हौस नाही. त्यांना फक्त एक गोष्ट हवी आहे, मेहनत केली तर संधी मिळेल, परीक्षा दिली तर निकाल निष्पक्ष लागेल आणि व्यवस्था आपल्यासोबत न्याय करेल, एवढा विश्वास. तो विश्वास परत मिळवण्याची वेळ आता आली आहे. पुण्याच्या रस्त्यावर उमटलेला विद्यार्थ्यांचा आवाज हा सरकारविरोधातील केवळ घोष नाही आणि आयोगाविरोधातील नुसता संतापही नाही. तो एका पिढीचा प्रश्न आहे. 'आमच्या भवितव्याशी खेळू नका', हा त्या आवाजाचा साधा अर्थ आहे. तो आवाज ऐकला पाहिजे; एमपीएससीनेही आणि सरकारनेही! संशयाचे ढग दाटल्यानंतर पाऊस पडण्याची वाट पाहत बसण्यात शहाणपण नसते. ढग हटवावे लागतात. त्यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कठोर निर्णय याशिवाय दुसरा मार्ग नाही. आयोगाची विश्वासार्हता वाचवायची असेल तर आजच निर्णय घ्यावा लागेल. अजून काही अवधी गेला तर आयोगाची उरलीसुरली प्रतिष्ठा प्रश्नांकित होईल. त्यामुळे आता एमपीएससीची परीक्षा आहे हेच खरे! ■

## श्रद्धांजली

### अभय बापट

# प्रेरणादायी बालकृष्णनजी

**दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी विवेकानंद केंद्र, कन्याकुमारीचे राष्ट्रीय अध्यक्ष ए. बालकृष्णनजी यांचे निधन झाले. त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आज श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त...**



१९७० च्या दशकात जेव्हा अनेक मानवनिर्मित व निसर्गनिर्मित आव्हानांना तोंड देत एका राष्ट्रीय स्मारकाचं काम सुरू होतं. स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दीनिमित्त, जिथे स्वामी विवेकानंदांना त्यांच्या आयुष्याचे ध्येय सापडले त्या शिलेवरती, स्वामी विवेकानंदांचे भव्य राष्ट्रीय स्मारक निर्माण होत होते. स्मारकाचे प्रेरणास्त्रोत माननीय एकनाथजी रानडे यांच्या मनात असा विचार आला की, हे तर स्वामी विवेकानंदांचे दगडामधले स्मारक. स्वामी विवेकानंदांचे खरे स्मारक उभे करायचे तर स्वामी विवेकानंदांचा विचार मनात ठेवून त्याप्रमाणे जीवन जगणारे हजारो युवक निर्माण करणे आवश्यक आहे. हे स्वामी विवेकानंदांचे खरे स्मारक होईल. म्हणून कन्याकुमारी येथील स्मारक निर्मितीनंतर लगेचच त्यावेळच्या पेपरमध्ये जाहिरात देऊन स्वामी विवेकानंदांना अपेक्षित तरुणांचा शोध घेण्याची मोहीम झाली. यामध्येच भारतीय हवाई दलामध्ये कार्यरत एका तरुणाने या मार्गावर चालण्याची इच्छा व्यक्त केली. आपली हवाई दलातील सेवा सोडून मनुष्य निर्माणातून राष्ट्र निर्माण या कार्यात हा तरुण सहभागी झाला. ए. बालकृष्णन असे या तरुणाचे नाव.

माननीय बालकृष्णनजींचे राष्ट्रीय जीवनात सर्वांत महत्त्वाचे योगदान म्हणजे विवेकानंद केंद्राच्या माध्यमातून पूर्वांचलला, विशेषतः अरुणाचलला, या देशाच्या भावविश्वाशी जोडणे. ज्यावेळी एकनाथजींच्या सूचनेनुसार पूर्वांचलात काम सुरू केले ते १९७० ते ८० या दशकात. त्यावेळी तिथे रस्ते नव्हते. संपर्काची साधने नव्हती. बालकृष्णनजी यांनीच मला सांगितले, एकदा एका शाळेची जागा बघण्यासाठी ते शिलाँगहून सात दिवस चालत ती जागा बघायला गेले. अरुणाचलमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, तेथील समाज उन्नत अवस्थेत यावा यासाठी त्यांनी अपार कष्ट सोसले. ते गावोगाव फिरले, त्याचा परिणाम स्वरूप आज अरुणाचल व आसाममध्ये विवेकानंद केंद्र विद्यालय हा एक परवलीचा शब्द झाला आहे. ४५ शाळांच्या माध्यमातून अरुणाचलमध्ये कायापालट झाला आहे. याच शाळांमधून आतापर्यंत १५ सनदी अधिकारी, शेकडो डॉक्टर्स, शेकडो इंजिनीयर्स, अनेक सेना अधिकारी तयार झाले आहेत. हे सारे स्वामी विवेकानंदांच्या शिक्षण या विषयावरील चिंतनातून निर्माण झालेल्या कार्यपद्धतीप्रमाणे आहेत. स्वामी विवेकानंद म्हणतात, "Education is the manifestation of the perfection within the man." विवेकानंद केंद्र विद्यालय ''हा जणू तिळा दार उघड''सारखा मंत्र झाला आहे, जो अरुणाचलमधील कुठलाही दरवाजा आपल्यासाठी उघडतो.

त्यावेळी शाळा व्यवस्थापनासाठी कुठलेही सॉफ्टवेअर नव्हते वा कुठलीही पद्धत नव्हती. बालकृष्णनजींनी स्वतः सुरुवातीच्या सात शाळांचे कॅशबुक लिहिले होते. त्यातूनच शाळांच्या व्यवस्थापनासाठी एक पद्धत विकसित झाली. जी आजतागायत विवेकानंद केंद्र विद्यालयाची विशेष ओळख झाली आहे. या व्यवस्थापकीय कौशल्याबरोबर तिथे हे सारे सांभाळेल अशी कार्यकर्त्यांची पुढची पिढी निर्माण केली. निर्णय घ्यायचे स्वातंत्र्य, घेतलेल्या निर्णयामागे ठामपणे उभे राहणे, त्याची काळजी घेणे. समर्थांच्या भाषेत सलगी देणे या शब्दातून कार्यकर्ता निर्माण याची प्रक्रिया सुरू राहिली. विपरीत स्थितीमध्ये सुद्धा काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची पिढी बालकृष्णन यांनी घडवली. त्यांच्या हृदयात अरुणाचलबद्दल एक विशेष जिव्हाळा होता. अरुणाचलनेही त्यांच्यावर भरभरून प्रेम केले. २०१४ मध्ये अरुणाचल सरकारने 'अरुणाचल मित्र' या पुरस्काराने गौरविले. साधारण पंधरा ते वीस दिवसांपूर्वी तवांग जिल्ह्यातील चीनच्या सरहद्दीवरील एका गावात बालकृष्णनजींच्या तब्येतीसाठी एका धार्मिक विधीचे आयोजन करण्यात आले होते. ज्याच्यामध्ये विवेकानंद केंद्रीय विद्यालयाचे माजी विद्यार्थी, अरुणाचल सरकारचे अधिकारी, बौद्ध धर्मांचे लामा यांनी भाग घेतला होता. कुठे चीनची सरहद्द, कुठे कन्याकुमारी पण कन्याकुमारीमध्ये आजारी असलेल्या माणसाच्या बरे होण्यासाठी काही हजार मैल दूर असलेल्या ठिकाणाहून प्रार्थना चालू होती. राष्ट्रीय एकात्मतेचे याहून वेगळे परिमाण काय असू शकते.

बालकृष्णनजी यांच्यावर १९८१ साली विवेकानंद केंद्राचे महासचिव म्हणून जबाबदारी देण्यात आली. १९९२ साली स्वामी विवेकानंद यांच्या भारतभ्रमणाला १०० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल एका मोठ्या उपक्रमाची आखणी बालकृष्णनजी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्वामी विवेकानंदानी ज्या मार्गाने भारत मातेचे दर्शन घेत कलकत्ता ते कन्याकुमारी असे भ्रमण केले होते, त्याच मार्गाने स्वामी विवेकानंदांचा मनुष्यनिर्माणातून राष्ट्र निर्माणाचा संदेश प्रसारित करत व "मानव सेवा हीच माधव सेवा" आहे हा सेवेचा संदेश पूर्ण भारतात प्रसारित करण्याचा हा उपक्रम होता. विवेकानंद भारत परिक्रमा असे या उपक्रमाचे नाव होते. या उपक्रमामुळे विवेकानंद केंद्राच्या कामाचा विस्तार झाला.

बालकृष्णनजी यांच्या कामाची पद्धत थोडी वेगळी होती. मंचावरून बौद्धिक न देता सात्त्विक प्रेमाने कार्यकर्ता निर्माण करणे, त्याच्या सुप्त शक्तीला आवाहन करणे, जबाबदारी देत देत कार्यकर्ता घडवणे, त्याच्या खांद्यावर हात टाकून त्याला आपलेसे करणे, निर्व्याज प्रेम देणे अशा अनेक गोष्टींनी त्यांच्यातील संघटक काम करत असे. आपल्यासारखे अनेक कार्यकर्ते निर्माण करणे त्यांना सहज शक्य झाले. प्रचंड इच्छाशक्ती, प्रचंड कार्यशक्ती, न थकता, न कंटाळता सतत कार्यरत राहणे, खऱ्या अर्थाने ते कर्मयोगी होते. शेवटच्या दिवसापर्यंत ते कार्यरत होते. त्यांच्या केवळ सहवासानेही कार्यकर्ते प्रेरित व्हायचे. १९८१ ते २००१ या कालावधीत विवेकानंद केंद्राचे महासचिव म्हणून ते मार्गदर्शन करत. नंतर २००१ ते २०२० या कालावधीत त्यांच्याकडे राष्ट्रीय उपाध्यक्ष अशी जबाबदारी आली. २०२० पासून अगदी आजपर्यंत विवेकानंद केंद्राचे राष्ट्रीय अध्यक्ष अशी जबाबदारी त्यांच्याकडे होती.

डोक्यावर बर्फ, जिभेवर साखर व पायाला भिंगरी अशी आदर्श कार्यकर्त्यांची व्याख्या त्यांना बघूनच केली की काय असे वाटावे. २४ तास या राष्ट्राच्या विविध समस्या आणि त्यावर विवेकानंद केंद्राच्या माध्यमातून काय उपाययोजना करता येईल याचा विचार सतत चालू असे.

बालकृष्णनजी यांनी गेली ५३ वर्षे विवेकानंद केंद्राचे नेतृत्व केले. आज पूर्ण भारतात २५ राज्यांत, चार केंद्रशासित प्रदेशात एक हजारहून अधिक शाखांच्या माध्यमातून व शेकडो प्रकल्पांच्या माध्यमातून आर्त विपन्न सेवेचे काम चालू आहे. स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातला बलसंपन्न, आत्मनिर्भर भारत, साऱ्या जगाला एकत्वाची जाणीव देणारा भारत निर्माण करण्यासाठी बालकृष्णनजी यांनी आपले आयुष्य वेचले. केंद्र प्रार्थनेमध्ये 'जीवने यावंदादानं स्यात प्रदानं तातोऽधिकम' अशी ओळ आहे. अर्थात जीवनात समाजाकडून जे आपल्याला मिळालेलं आहे, त्यापेक्षा अधिक समाजाला दिले पाहिजे. हाच सफलतेचा आणि सार्थकतेचा मार्ग आहे असे सांगितले आहे. बालकृष्णनजी असेच जीवन जगले. आपल्या साऱ्यांना जीवन कसे जगावे याचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला. त्याच मार्गाने आपले जीवन सार्थक व्हावे तीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. ■

(लेखक विवेकानंद केंद्र महाराष्ट्र व गोवाचे प्रांत प्रमुख आहेत.)

## वेध

### गिरीश शेरेकर

# गुटखा तस्करांचे 'एफडीए'ला आव्हान !

गुटखा, तंबाखूमिश्रित पानमसाल्याचे सेवन मानवी शरीराच्या प्रत्येक अवयवावर प्रचंड दुष्परिणाम करते. वैद्यकीय क्षेत्रातल्या वेगवेगळ्या संशोधनातून ते समोर आले आहे. विशेषत्वाने युवा पिढीवर त्याचे गंभीर परिणाम होत असल्याने राज्य सरकारने २०१२ पासून गुटखा व पानमसाला विक्री, उत्पादन, वितरण, साठवणुकीवर बंदी घातली आहे. ही बंदी कितपत यशस्वी झाली, याचे उत्तर शासन व प्रशासन केव्हा देईल? राज्यातल्या कोणत्याही शहरात व गावात फेरफटका मारल्यावर लक्षात येते की, बंदी फक्त कागदावरच आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकलच्या संशोधनातून वेळोवेळी गुटखा व तंबाखूचे मानवी शरीरावरचे गंभीर परिणाम समोर आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्यावर त्यांनी ज्या पद्धतीने धडक कारवाया सुरू केल्या, त्यावरून गुटखा व पानमसाल्याची विक्री बंद होईल, असे वाटत होते. सुरुवातीला तसे दिसतही होते. अनेक पानटपरी चालकांनी विक्री बंद केली होती. काहींनी तर आपल्या टपऱ्याच बंद ठेवल्या होत्या. विदर्भात तर सर्वत्र हे चित्र होते. पण, काही दिवसांतच स्थिती पूर्ववत झाली. त्याच्या पाठीमागचे नेमके कारण अद्याप समजलेले नाही. एकप्रकारे आता गुटखा व पानमसाल्याची तस्करी आणि विक्री करणाऱ्यांनी 'एफडीए'ला आव्हानच दिले आहे.

राज्यातले एकही असे गाव नाही की, जेथे गुटखा व पानमसाला मिळत नाही. बंदी घालण्यापूर्वी जी स्थिती राज्याच्या जिल्ह्यांमध्ये होती तीच आजही कायम आहे. बंदीनंतर काही वर्ष नागपूरसह पूर्व विदर्भातल्या जिल्ह्यांमध्ये गुटखा व पानमसाला फारसा मिळत नव्हता. कारण, याच काळात नागपुरी खर्र्याने अनेकांच्या मनात राज्य केले होते. मध्यंतरी नागपुरी खर्र्याची भीषणता समोर आल्याने खाण्याचे प्रमाण कमी झाले होते. आता पुन्हा कल वाढला आहे. सोबतच गुटखा व पानमसाला नागपूरसह वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये सहज मिळायला लागला आहे. परिणाम मात्र दोघांचेही सारखेच आहेत. हीच स्थिती पश्चिम विदर्भातल्या अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम या जिल्ह्यांसह राज्यातल्या अन्य जिल्ह्यांमध्ये आहे. विशेष म्हणजे उर्वरित महाराष्ट्रातही नागपुरी खर्रा पोहोचत आहे. अमरावती तर गुटखा व पानमसाला तस्करीचे, वाहतुकीचे, निर्मितीचे मुख्य केंद्रच झाले आहे. विशेष म्हणजे गुटख्याचे अनेक नवे ब्रॅण्ड अमरावतीत तयार झाले असून विदर्भासह राज्याच्या कानाकोपऱ्यात बिनबोभाटपणे पोहोचत आहे. अमरावती मुख्य केंद्र होण्यासाठी लगतचे मध्य प्रदेश कारणीभूत ठरले आहे. तिथे बंदी नसल्याने धारणी, बहिरम, पांढुर्णा या तीन व अकोला मार्गाने मोठ्या प्रमाणात गुटखा व पानमसाला अमरावतीत येतो. अचलपूर, वरुड, धारणी, चांदूर बाजार, अंजनगाव, मोर्शीत तो साठविला जातो. येथून तो अन्य जिल्ह्यांमध्ये वितरित होतो. सांगायचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मध्य प्रदेशसह देशातल्या अन्य भागांतला ब्रॅण्ड म्हणून ओळखला जाणारा गुटखा व पानमसाला अमरावती जिल्ह्यातच हुबेहूब बनावट तयार केला जातो. अत्यंत निकृष्ट साहित्य त्यात वापरले जाते. मूळ कंपनीच्या गुटखा व पानमसाल्याच्या पुड्यांसोबत सरमिसळ करून तो विदर्भासह राज्यातल्या अन्य भागांत विकला जातो.

अन्न व औषध प्रशासन विभागाला सर्व काही माहिती आहे. पण, त्यांचे दुर्लक्ष होत आहे. त्याचाच फायदा गुटखा किंग घेत आहेत. तुकाराम मुंढे आल्यानंतर स्थितीत काही बदल होईल असे वाटत होते. परंतु, दिवसागणिक ती अतिशय गंभीर होत आहे. गेल्या पाच वर्षात मुख कर्करोगाचे सर्वाधिक रुग्ण विदर्भात आढळले आहेत. राज्यातल्या अन्य भागांतही प्रमाण वाढले आहे. त्यात अनेकांचे मृत्यू झाले आहेत. तरी सुद्धा या समस्येकडे संवेदनशीलपणे पाहण्याची कोणाची तयारी नाही. तुकाराम मुंढे यांच्याकडून कडक कारवाईची अपेक्षा आहे पण, त्यांचेही दुर्लक्ष झाले की काय असे वाटते. कागदावरच्या गुटखाबंदीने महसूल बुडण्याचा संताप नाही पण, दुर्धर आजाराचे परिणाम भोगावे लागत असल्याचे दुःख आहे. तस्करी असल्याने गुन्हेगारी वाढत आहे. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तुकाराम मुंढे यांनीच या प्रकरणात लक्ष घालण्याची गरज आहे. अन्न व औषधातल्या गैरप्रकाराची साखळी शोधून धडक कारवाई होत आहे, त्याच पद्धतीने गुटखा तस्करीच्या मुळापर्यंत गेल्यावरच काही होऊ शकते. तुकाराम मुंढे यांनी याकडे लक्ष द्यावे, हीच अपेक्षा! ■

९४२०७२१२२५

## विशेष

### प्रा. सुखदेव बखळे

# 'मेंटेन इन इंडिया'ची झेप !

भारतातील नागरी विमान वाहतूक क्षेत्र गेल्या दशकात अभूतपूर्व वेगाने वाढले आहे. प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत आहे. नवीन विमानतळ उभारली जात आहेत. प्रादेशिक हवाई संपर्काला चालना मिळत आहे आणि भारतीय विमान कंपन्या अनेक नवीन विमानांची ऑर्डर देत आहेत. जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या विमान बाजारपेठांमध्ये भारताची गणना होत असताना, या क्षेत्रातील एक मोठी विसंगती मात्र कायम आहे. भारतीय विमाने देशात उड्डाण करत असली, तरी त्यांच्या देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉलसाठी (मेंटेनन्स, रिपेअर अँड ओव्हरहॉल) परदेशातील केंद्रांवर अवलंबून राहावे लागत होते. यामुळे दरवर्षी हजारो कोटी रुपयांचे परकीय चलन देशाबाहेर जात होते. आता केंद्र सरकारने 'एमआरओ' क्षेत्रासाठी केलेल्या धोरणात्मक सुधारणांमुळे भारत या परिस्थितीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहे. हा प्रयत्न यशस्वी झाला, तर भारत केवळ मोठी विमान बाजारपेठ राहणार नाही, तर विमान देखभालीचे जागतिक केंद्र म्हणूनही उदयास येऊ शकतो. विमान उद्योगात 'एमआरओ' हे अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र मानले जाते. प्रत्येक विमानाला ठरावीक कालावधीनंतर तांत्रिक तपासणी, इंजिन ओव्हरहॉल, सुटे भाग बदलणे आणि सुरक्षेच्या दृष्टीने अनेक प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. या प्रक्रियेशिवाय कोणतेही विमान उड्डाण करू शकत नाही. त्यामुळे 'एमआरओ' उद्योग हा विमान वाहतुकीचा कणा मानला जातो.

सरकारने केवळ करसवलती दिल्या नाहीत, तर पायाभूत सुविधांवरही भर दिला आहे. विमानतळ प्राधिकरणाच्या विमानतळांवर 'एमआरओ' केंद्रांसाठी जमीनवाटपाची प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यात आली आहे. भाडेपट्ट्याचा कालावधी वाढवण्यात आला आहे. नवीन हँगर उभारणाऱ्या कंपन्यांना प्रारंभीचा भाडेमुक्त कालावधी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा सुविधा भांडवली गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. फ्रान्समधील जागतिक विमान इंजिन उत्पादक कंपनी सफ्रानने हैदराबाद येथे सुमारे १,३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून अत्याधुनिक विमान इंजिन एमआरओ केंद्र उभारले आहे. हा प्रकल्प भारताच्या क्षमतेवर जागतिक उद्योगाचा वाढता विश्वास दर्शवतो.

अशा प्रकारच्या गुंतवणुकीमुळे इतर बहुराष्ट्रीय कंपन्याही भारताकडे आकर्षित होऊ शकतात. भारतात एअरबस, बोईंग, जीई एरोस्पेस, रोल्स-रॉइस आणि प्रॅट अँड व्हिटनी यांसारख्या कंपन्यांनीही दीर्घकालीन गुंतवणूक केल्यास भारताकडे आशियातील प्रमुख 'एमआरओ' केंद्र बनण्याची क्षमता आहे. मोठी देशांतर्गत विमान बाजारपेठ, वाढणारी विमानांची संख्या, तुलनेने कमी मनुष्यबळ खर्च आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील मजबूत कौशल्य ही भारताची जमेची बाजू आहे. या सर्वांचा योग्य वापर झाला, तर भारत केवळ स्वतःच्या विमानांचीच नव्हे, तर इतर देशांमधील विमानांचीही देखभाल करू शकतो; मात्र ही संधी साधण्यासाठी केवळ धोरणात्मक सवलती पुरेशा ठरणार नाहीत. सर्वांत मोठे आव्हान म्हणजे कुशल मनुष्यबळाची उपलब्धता. आज 'एमआरओ' उद्योग कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, डिजिटल ट्विन तंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्सकडे वेगाने वाटचाल करत आहे. भविष्यात विमानांच्या सेन्सरमधून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे बिघाड होण्यापूर्वीच दुरुस्ती केली जाईल. या अत्याधुनिक तंत्रज्ञानात गुंतवणूक न केल्यास भारत केवळ स्वस्त मजुरी देणारा देश राहील. उलट, संशोधनावर भर दिल्यास भारत उच्च मूल्यवर्धित सेवा देणारा जागतिक भागीदार बनू शकतो. नियामक प्रक्रियेतही सुधारणा आवश्यक आहेत. विमान उद्योगात सुरक्षा ही सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. त्यामुळे प्रत्येक 'एमआरओ' केंद्राला आंतरराष्ट्रीय मानके पूर्ण करावी लागतात. भारताला या देशांशी स्पर्धा करायची असेल, तर खर्च कमी ठेवण्याबरोबरच गुणवत्ता, वेळेचे नियोजन आणि विश्वासार्हता यांवरही भर द्यावा लागेल. भारताच्या संरक्षण क्षेत्रालाही याचा मोठा फायदा होऊ शकतो. नागरी आणि संरक्षण क्षेत्रातील अनेक तांत्रिक कौशल्ये समान असतात. मजबूत 'एमआरओ' परिसंस्था तयार झाल्यास लष्करी विमानांची देखभाल, स्वदेशी उत्पादन आणि संरक्षण उद्योगालाही चालना मिळू शकते. 'आत्मनिर्भर भारत' अभियानाच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा टप्पा ठरेल. पुढील दोन दशकांमध्ये जगभरात हजारो नवीन विमानांची भर पडणार आहे. भारतातील विमान कंपन्यांनीही मोठ्या प्रमाणावर विमानखरेदीची घोषणा केली आहे. म्हणजेच 'एमआरओ' सेवांची मागणी सातत्याने वाढणार आहे. हा वाढता बाजार भारतासाठी मोठी आर्थिक संधी घेऊन आला आहे. आज योग्य धोरणे, पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ उभारले, तर पुढील काही वर्षांमध्ये भारत जागतिक 'एमआरओ' नकाशावर महत्त्वाचे स्थान मिळवू शकतो. एकूणच, केंद्र सरकारने केलेल्या सुधारणांनी योग्य दिशा दाखवली आहे; मात्र त्यांची प्रभावी अंमलबजावणी अधिक महत्त्वाचे आहे.

उद्योग, सरकार, शैक्षणिक संस्था आणि संशोधन क्षेत्र यांच्यामध्ये मजबूत समन्वय निर्माण झाला, तर भारताला या क्षेत्रात मोठी झेप घेता येईल. आज भारतासमोर केवळ विमाने उडवण्याचे नव्हे, तर जगातील विमान उद्योगाला सेवा पुरवण्याचे स्वप्न आहे. 'मेक इन इंडिया'नंतर आता 'मेंटेन इन इंडिया' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्याची वेळ आली आहे. भारताने ही संधी ओळखून दीर्घकालीन दृष्टिकोन स्वीकारला, तर विमान देखभाल उद्योग देशाच्या आर्थिक विकासातील नवे इंजिन ठरू शकतो. अशा वेळी भारत मोठी विमान बाजारपेठ म्हणून नव्हे, तर जागतिक विमान उद्योगाचा विश्वासार्ह तांत्रिक भागीदार म्हणूनही ओळखला जाईल. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वाचक पत्रे

### घटना घडल्यानंतरची धावपळ नको

एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाची धावपळ सुरू होणे, पंचनामा होणे आणि जबाबदारी निश्चित करण्याच्या चर्चा रंगणे ही परिस्थिती टाळण्याची खरी गरज आहे. धोका निर्माण झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा संभाव्य धोका ओळखून त्यावर वेळीच उपाययोजना करणे, हीच खरी प्रशासनाची जबाबदारी आहे. शहर, गाव, रस्ते, पूल, इमारती, विद्युत व्यवस्था, नाले, जलाशये तसेच सार्वजनिक ठिकाणी अनेकदा धोकादायक परिस्थिती निर्माण झालेली दिसते. मात्र, त्याकडे वेळेत लक्ष दिले गेले नाही तर एखादी छोटीशी त्रुटी मोठ्या दुर्घटनेचे कारण ठरू शकते. संभाव्य धोकादायक ठिकाणांचे नियमित निरीक्षण, नागरिकांच्या तक्रारींची तत्काळ दखल, धोकादायक बांधकामे व संरचनांची तपासणी आणि आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना याकडे गांभीर्याने प्रशासनाने पाहणे गरजेचे आहे. कारण दुर्घटना झाल्यानंतरची मदत महत्त्वाची असतेच, पण दुर्घटना होऊ न देणे ही त्याहून मोठी जबाबदारी आहे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

### नागपूरची परंपरा : काळी-पिवळी मारबत



शेतकऱ्यांचा पोळा हा सण विदर्भात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. श्रावण अमावास्येला पोळा सण असतो. बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण शेतकरी उत्साहात साजरा करतात. पोळ्याचे दुसऱ्या दिवशी तान्हा पोळा असतो. तान्ह्या पोळ्याची सुरुवात नागपुरातच पहिल्यांदा झाली. परंतु नागपूरमधील पोळ्याचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मारबत आणि बडग्यांचा उत्सव असतो. काळी आणि पिवळी मारबत तसेच बडग्यांचे पुतळे बनवून त्याची संपूर्ण शहरातून मिरवणूक काढली जाते. समाजातील वाईट चालीरीती आणि रोगराई दूर करण्याचे साकडे मारबतीला घालण्यात येते. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मुद्दे आणि स्थानिक समस्यांवर या मारबतीद्वारे भाष्य करणारे फलक असतात. जसे कोरोना काळात 'कोरोना घेऊन जा गे मारबत' याप्रमाणेच महागाई, युद्धस्थिती वगैरेंवर लिहिलेले फलक लोकांचे लक्ष वेधून घेतात .

ही परंपरा साधारण १८८१ पासून सुरू झाली. हा जगातील एकमेव असा मिरवणूक प्रकार फक्त नागपुरातच आहे. ही मिरवणूक बघण्यासाठी लोक प्रचंड गर्दी करतात. मारबत आणि बडग्या हे वाईट शक्तींचे प्रतीक मानले जातात. त्या वाईट शक्तींची धिंड काढून त्यांना शहराबाहेर दहन करण्याची आणि आपले शहर स्वच्छ, प्रदूषणमुक्त आणि समाज समस्याविहीन ठेवण्याचा उद्देश या उत्सवामागे असावा असे वाटते. काळी मारबत साधारण १४० वर्षांपासून चालू आहे. त्याचा संबंध महाभारत काळाशी जोडला जातो. पूतना मावशीचे रूप धारण करून भगवान कृष्णाला मारण्याचा प्रयत्न केला आणि कृष्णाच्या हातून तिचा मृत्यू झाल्यानंतर गावकऱ्यांनी तिची धिंड अर्थात मारबत काढली आणि तिला जाळले. उद्देश हाच की गावावर पुन्हा कधीही समस्या, संकटे येऊ नयेत अशी आख्यायिका आहे.

**राधा पिंपळापुरे**/उमरेड

■■■

### जीवनावश्यक वस्तूंवरील वाढ कितपत योग्य ?

इराण-अमेरिका युद्धादरम्यान इंधन टंचाईचे संकट निर्माण झाल्यामुळे भारतासह जगभरातील देशांनाच त्याचा मोठा फटका बसला होता. पेट्रोलियम पदार्थांची आवक संकटात सापडल्यामुळे दर भडकून महागाईने मोठा उच्चांक गाठला होता. मात्र, ती स्थिती बरी होती, असे म्हणण्याची आता वेळ आली आहे. कारण जीवनावश्यक वस्तूंचे बाजारातील वाढलेले दर सर्वसामान्य जनतेच्या तोंडचे पाणी पळवणारे ठरत आहेत. श्रावण महिन्याच्या आगमनाबरोबरच सर्वांना सण-उत्सवाचे वेध लागतात. कारण श्रावणापासून हिंदू समाजाचे प्रमुख सण-उत्सव सुरू होतात. त्यामध्ये गोकुळाष्टमी, गणेशोत्सव, गौरी, नवरात्र, दसरा ते दिवाळीपर्यंत सणासुदीची मोठी रेलचेल सुरू होते. नेमके त्याच काळात साखर, गूळ, डाळी, खाद्यतेल, कांदा आणि इतर सर्वच जीवनावश्यक वस्तूंनी आपल्या वाढलेल्या दरामुळे लोकांच्या तोंडाला फेस आणण्यास सुरुवात केली आहे. काही दिवसातच साखरेच्या दराने जनतेची झोप उडवली आहे. साखरेसोबतच गुळाचीही विक्रमी दराकडे वाटचाल सुरू आहे.

सामान्य जनतेला होरपळून काढणाऱ्या या महागाईच्या आगीवर वेळीच नियंत्रण मिळवणे आवश्यक होते. साठेबाज वापाऱ्यांवर सणासुदीच्या काळात योग्य ती कारवाई करणे तसेच दर नियंत्रणात राहतील यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करणे, यावर अधिक भर देणे आवश्यक आहे. शेतकरीवर्ग नैसर्गिक संकटामुळे हवालदिल झालेला असतानाच बाजारपेठेत महागाईचे प्रस्थ वाढत जाणे सामान्य जनतेला सहन न होण्यापलीकडचे आहे. जीवनावश्यक वस्तूंचे दर आटोक्यात ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून तातडीच्या उपाययोजना होणे अपेक्षित आहे. ■

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः डि सोलापूर सब डि व तालुका बार्शी पैकी मौजे धोत्रे हददीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि सोलापूर सब डि व तालुका बार्शी पैकी मौजे धोत्रे हददीतील ग्रामपंचायत मिळकत नंबर सर्व्हे नंबर ४२७/२ पश्चिम बाजू याचे क्षेत्र २०००.०० चौ. फुट चे १८५.८७ चौ मी यांसी चतुःसिमा **पुर्वेस** - सदर मिळकत पैकी जागा, **दक्षिणेस** - सुभाष लांडे, यांची मिळकत, **पश्चिमेस** - विनायक लांडे यांची मिळकत व **उत्तरेस** - १२ फूट रस्ता यांची मिळकत येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही श्री संतोष सर्जेराव लांडे यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नावे नोंद आहे. वरील मिळकती बाबत सौ संगीता संतोष लांडे व श्री संतोष सर्जेराव लांडे यांचे हक्कात दिनांक ०४/०९/२०२६ रोजी नोंदणकृत बक्षीसपत्र केलेले असून सदरचे दस्त बार्शी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात अनुसूची दोन मध्ये अनुक्रमांक ६३५१/२०२६ वर नोंदलेले आहे. सौ संगीता संतोष लांडे ही सदरची मिळकत बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणचेही कसलेही हक्क हितसंबंध. उदा. - गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, चोळी, बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटुन कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशिल हे, सदर मिळकतीशी कोणाचाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत आमची पक्षकार बँक तारण घेऊन कर्ज रक्कम वितरीत करेल. कोणची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक ०७/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर**
**पाटील प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी**
**मो. नं. ९८२२०६५६६१**

## जाहीर नोटीसमध्ये दुरुस्ती

आमचे अशिल श्री निलेश बंकट कदम, रा. सांगवी, ता. करमाळा, जि. सोलापुर यांनी दिलेल्या माहिती वरुन दि. ३१.०८.२०२६ रोजीचे अंकामध्ये मौजे कुंभेज, ता. करमाळा, जि. सोलापुर येथील गट नं. २२५ चे क्षेत्र ०२ हे. १९ आर पोट खराब ०२ हे. २० आर एकूण ०४ हे. ३९ आर आकार रु.००.७०पैसे पैकी पुर्वेची ०० हे. ७१ आर पोट खराब ०० हे. ५५ आर एकूण ०१ हे. २६ आर आकार रु. ००.२४पैसे याची चतुःसिमा पुर्वेस- गट नं. २२४, २२६ व २२७, दक्षिणेस- २४३, पश्चिमेस- गट नं. २२५ पैकी केशरबाई शिंदे यांची शेतजमीन व उत्तरेस- करमाळा टेंभुर्णी रोड ते कुंभेज रोड व पुढे गट नं. २१० या वर्णनाची शेतजमीन मालक श्रीमती द्वारकाबाई रामकृष्ण कासविद या आहेत, पैकी ०१ हेक्टर ही मिळकत ही त्यांच्याकडून आमचे आशिलाने खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे वगैरे बाबत नोटीस प्रसिध्द केलेली होती सदरचे नोटीस मधील मिळकतीच्या चतुःसिमा या खालील प्रमाणे वाचणेत याव्यात.

पुर्वेस- गट नं. २२५ पैकी १५ फुट रुंदीचा रस्ता द्वारकाबाई यांचे नावावरील,
दक्षिण- गट नं. २२४,
पश्चिम- गट नं. २२५ पैकी केशरबाई शिंदे यांची शेतजमीन,
उत्तर- करमाळा-टेभुर्णी रोड ते मौजे कुंभेज रोड.
याची नोंद घ्यावी.
ही जाहीर नोटीस दिली. ता. ०८.०९.२०२६.

**सही/-**
**डी. एम. सोनवणे,**
**बी.कॉम., एलएल.बी., ॲडव्होकेट,**
**गाळा नं. ४, दिवाणी न्यायालया समोर,**
**विद्या नगर, करमाळा, जि. सोलापुर.**
**मो. नं. ९८५०५२९८१२**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट.**

## सिलींग जमीन भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करीता जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पिलीव ता. माळशिरस जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ३८०/२/३ क्षेत्र ०.८१ आर आकार ०.२० पै. ही मिळकतीचे खातेदार श्री. दत्तात्रय विनायक सांगले रा. वेळापूर ता. माळशिरस जि. सोलापूर यांनी सदरची जमीन भोगवटादार वर्ग-२ ची असल्याने सदर जमिनीची भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करीता आमचे अशिल श्री. दत्तात्रय विनायक सांगले यांनी मा. अपर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमुद शेतजमिनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहाराबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचाही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगीहक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्यूपत्र, खरेदी विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे-घेणे इ. बाबत काही हरकत / तक्रार / हितसंबंध / अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत मा. अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर (कुळकायदा), सात रस्ता, सोलापूर या पत्त्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झालेस कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमिनीचा झालेला खरेदी व्यवहार विधीग्राह्य होण्यासाठी पुढील कार्यवाही करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

ता. ०९/०९/२०२६

**सही/-**
**ॲडव्होकेट - ए. टी. झारेकरी**
**पत्ता - विजय चौक, अकलूज.**
**मो. नं. ९८८१०३५८१६**
**अशिल - श्री. दत्तात्रय विनायक गांगल**
**पत्ता - रा. वेळापुर ता. माळशिरस जि. सोलापूर**

## जाहीर प्रसिद्धीकरण

निशाणी नंबर : ६८ (नि. ५)
दि.कि.अर्ज नंबर- /२०२६.
मे श्री केंद्रे साहेब यांचे कोर्टात

### बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधीश सा. यांचे कोर्टात

१) आर्यन शुक्राचार्य गलांडे वय २३ वर्ष
धंदा शेती रा. मु पो अंबाबाईचीवाडी,
ता. बार्शी जि सोलापूर
२) आयुष शुक्राचार्य गलांडे वय १३ वर्ष -- **अर्जदार**
धंदा शिक्षण रा. रा. मु पो अंबाबाईचीवाडी,
ता. बार्शी जि सोलापूर
(अ.पा.क. आर्यन शुक्राचार्य गलांडे)

**विरुद्ध**

महाराष्ट्र शासन -- **सामनेवाला**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, अर्जदार यांनी बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात यातील अर्जदार व त्याचा लहान भाऊ नामे आयुष शुक्राचार्य गलांडे यांचे नावे असलेली सामाईक मिळकत मौजे मालेगाव ता बार्शी जि सोलापूर येथील शेतजमीन मिळकत याचा गट नं १४१ मधील अर्जदार यांचे नावे सामाईक असलेले क्षेत्र ०२ हे ०३ आर पैकी पश्चिम उत्तर कोपऱ्यातील क्षेत्र ०० हे ४० आर याचा आकार ००.७९ रु. पैसे या मिळकतीच्या विक्रीस परवानगी मिळणेसंदर्भात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

वर नमूद मिळकत अज्ञानाचे नावे सामाईक असलेली शेत जमीन मिळकत विक्री करणेस परवानगी देणेसंदर्भात कोणाची हरकत तक्रार असल्यास या न्यायालयास् ३० दिवसापूर्वी अथवा पुढील नेमलेली तारीख २६/१०/२०२६ पर्यंत आपले म्हणणे समक्ष हजर राहून अथवा वकीलामार्फत हजर होवून द्यावे.

वकील मुदतीत म्हणणे अथवा हरकत न आल्यास सदरचे न्यायालय अर्जदाराचे अर्जास अज्ञानाचे नावे वर नमुद केलेल्या मिळकतीची विक्री करणे संदर्भात जरुर ती परवानगी देतील. त्यानंतर कोणाचीही तक्रार एकुण घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिद्धीकरण केले असे. तारीख ०७/०९/२०२६

**सही/-**
**क्लर्क**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**प्र. सहा. अधीक्षक जिल्हा न्यायालय, बार्शी**

# पार्क चौपाटी परिसरातील अतिक्रमणांवर महापालिकेची कारवाई

## दोन लोखंडी गाड्यांसह प्लास्टिक खुर्च्या, ताडपत्री जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

पार्क चौक चौपाटी परिसरातील अतिक्रमणांवर महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने मंगळवारी कारवाई करीत विविध साहित्य जप्त केले. चौपाटी परिसरातील अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या हातगाड्या व अन्य साहित्य जप्त करण्यात आले.



महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली. विभागप्रमुख सोपान कांबळे यांच्या नेतृत्वाखाली कनिष्ठ अभियंता गणेश काकडे, राजेशकुमार कावळे तसेच पोलिस बंदोबस्तात पथकाने पार्क चौक चौपाटी परिसराची पाहणी करून अतिक्रमणे हटविली. या कारवाईदरम्यान दोन चारचाकी लोखंडी गाड्या, एक चारचाकी स्टील गाडी, एक लोखंडी काऊंटर, ११ प्लास्टिक खुर्च्या आणि एक ताडपत्री असे साहित्य जप्त करण्यात आले. चौपाटी परिसरातील अनधिकृत व्यवसाय व अतिक्रमणांवर यापुढेही कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## Office of the District Collector, Solapur and Returning Officer,

Karmayogi S.R. Paricharak Multistate Co-operative Credit Society Ltd., Pandharpur, Dist.Solapur.

### NOTICE OF ELECTION

(ONLY FOR MEMBERS)

(As per Multi-State Co-operative Societies Act, 2002 (Amendment 2023) and MSCS Rules 2002 (Amendment 2023))

Notice is hereby given that, as per Cooperative Election Authority, New Delhi, Order No. CEA-12011/567/2026 Dated 2nd Septenber 2026, **Election is to be held for Board of Directors and Office Bearers** of Karmayogi S.R. Paricharak Multistate Co-operative Credit Society Ltd., Pandharpur, Solapur, Maharashtra.

| | | |
|---|---|---|
| The number and type of "Board of Directors" to be elected | : | 15 (General - 12, SC/ST- 01, Women – 02) |
| The number and type of "Office Bearers" to be elected | : | 02 (Chairman - 01 and Vice- Chairman- 01) |
| Office address of Returning Officer (RO) | : | Office of the RO Office, Solapur, New Collector Office, Sat Rasta, Vijapur Road, Solapur-413003. |

**Election Schedule**

**Election programme for "Board of Directors"**

| S.No. | Particulars | Date | Time | Place |
|---|---|---|---|---|
| 1 | Publication of Provisional List of Members /delegates eligible to Vote | 15th September, 2026 (Tuesday) | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 2 | Time Window for Raising Objection to the Provisional List | 16th September, 2026 to 18th September, 2026 (Wednesday to Friday) | 11:00 AM to 3:00 PM | RO Office. |
| 3 | Scrutiny of objection received to the Provisional List (if any) | 21st September to 22nd September, 2026 (Monday to Tuesday) | 11:00 AM to 3:00 PM | RO Office. |
| 4 | Publication of Final List of Members eligible to Vote | 22nd September, 2026 (Tuesday) | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 5 | Issue and Filing of Nomination Form | 23rd September, 2026 to 28th September, 2026 (Wednesday to Monday) | 11:00 AM to 3:00 PM | RO Office. |
| 6 | Publication of List of Nominations Received | 28th September, 2026 (Monday) | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 7 | Scrutiny of Received Nomination Forms | 29th September, 2026 (Tuesday) | 11:00 AM to Till the scrutiny is complete | RO Office. |
| 8 | Publication of List of Valid Nominations | 29th September, 2026 (Tuesday) | after scrutiny | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 9 | Withdrawal of Nominations | 30th September, 2026 (Wednesday) | 11:00 AM to 3:00 PM | RO Office. |
| 10 | Publication of Final List of Contesting Candidates | 30th September, 2026 (Wednesday) | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 11 | Date of Polling, if Necessary | 14th October, 2026 (Wednesday) | 8:00 AM to 04:00 PM | Place will be Announced later. |
| | | and all those who have entered polling station at 04 PM or before, should be allowed to cast vote | | |
| 12 | Counting of votes | 16th October, 2026 (Friday) | 8:00 AM onward | Place will be Announced later. |
| 13 | Declaration of Result of "Board of Directors" | 2nd November, 2026 After approval of Cooperative Election Authority, New Delhi on Format 19M | | |

**Election programme for "Office Bearer"**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Announcement of Election Schedule | 3rd November, 2026 (Tuesday) | After Declaration of Result of Board of Directors Election | |
| | 1. Time window for filing nomination | | 09:00 AM to 11:30 AM | RO Office. |
| | 2. Scrutiny of nomination papers | | 12:30 PM to 02:00 PM | RO Office. |
| | 3. Time and date for withdrawal | | 2:00 PM to 04:00 PM | RO Office. |
| | 4. Display of list of the contesting candidate and schedule of election | | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 2 | Meeting of Newly Constituted Board and Publication of Valid Nominations, Polling (if required) | 4th November, 2026 (Wednesday) | 11:00 AM Onwards | Place will be Announced later. |
| 3 | Declaration of Result of Election of Office Bearers | On or before 13th November, 2026 After approval of Cooperative Election Authority, New Delhi on Format 19N | | |

1. MSCS Rule 19(1) and the relevant clauses of the Bye-laws of the Karmayogi S.R. Paricharak Multistate Co-operative Society Credit Ltd. state that only members registered in the final voter list shall be eligible to vote in the said election.
2. The Provisional List of members will be available for inspection at the RO/ARO office, the registered office of the Karmayogi S.R. Paricharak Multistate Co-operative Credit Society Ltd. all of its branch offices, and the Society's website.
3. A copy of the final voters list will be supplied to any member or delegate upon payment of the fee specified by the society's Board of Directors.
4. It is mandatory for the candidate, proposer, and seconder to be members of the Karmayogi S.R. Paricharak Multistate Co-operative Credit Society Ltd. and their names must be included in the final voter list.
5. It is mandatory for the candidate, or a person authorized by them, or their nominee, to file a nomination form in the prescribed format—'Form III' for the Board of Directors and 'Form V' for Office Bearers—with the Returning Officer or Assistant Returning Officer within the prescribed time limit.
6. To be eligible to contest elections for the Board of Directors and as an Office Bearer, a candidate must fulfill the criteria under Sections 29, 43, and 44 of the Multi-State Cooperative Societies Act, Rules 19J, 19K, and 19L of the MSCS Rules, and the bye-laws of the Karmayogi S.R. Paricharak Multistate Credit Co-operative Society Ltd.
7. An election deposit of Rs. 2,000/- (Rs. 500/- for Scheduled Castes and Scheduled Tribes candidates) is mandatory, and the receipt for this deposit must be attached to the nomination paper.
8. A candidate filing a nomination form under a reserved category (SC/ST/NT/OBC) must attach a self-attested copy of their caste certificate to the nomination form.
9. A candidate, their nominee, or their authorized representative (authorized in writing by the candidate) may give a written notice of withdrawal of candidature to the Returning Officer or Assistant Returning Officer within the prescribed time.
10. All contesting candidates must submit the details of their election expenses to the RO/ARO as per the provisions of MSCS Rules 19(U), (V), (W), and (X), and strictly adhere to the code of conduct.

**Place : Solapur**
**Date : 09 September, 2026**

**Sign/-**
**Karthikeyan S, IAS**
**Returning Officer**
**Karmayogi S.R. Paricharak Multistate Co-operative Credit Society Ltd., Pandharpur, Solapur.**

## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या तारणावर (गहाणखत) सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित नोटीसनुसार दिली आहे, आणि सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 148487967 | मालमत्तेवर कर्ज | १. रेणुका खजाप्पा कामठी<br>२. खाजप्पा यलप्पा कामठी | 04/07/2026 | INR 5,48,882.88/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत नं. ३२० ची संपूर्ण जागा व भूखंड, एकूण क्षेत्रफळ १२२० चौ. फूट, मौजे शेगाव, ग्रामपंचायत शेगावच्या हद्दीत, तालुकाः अक्कलकोट, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१९.चतुःसीमाः पूर्वः सुभाष कामठी यांचे घर, पश्चिमः मोकळी जागा, उत्तरः दयानंद एफ. कामठी यांचे घर, दक्षिणः रस्ता.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 158357862 | मालमत्तेवर कर्ज | १. जगन्नाथ एकनाथ खरात<br>२. राणी जगन्नाथ खरात | 14/05/2026 | INR 9,55,124.24/- |

**मालमत्तेचा पत्ता** : ग्रामपंचायत मिळकत नं. १९१ ची संपूर्ण जागा व भूखंड, एकूण क्षेत्रफळ १२२० चौ. फूट, मौजे कोंडभावी, ग्रामपंचायत कोंडभावीच्या हद्दीत, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१.चतुःसीमाः पूर्वः सदाशिव सोपान खरात यांचे घर, पश्चिमः स्वतःची मोकळी जागा, उत्तरः रस्ता, दक्षिणः स्वतःची मोकळी जागा.

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

**दिनांक : 09/09/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

Yashoda Shikshan Prasarak Mandal's

## Sojar College of Pharmacy, Khandvi.

Tal: Barshi; Dist: Solapur. (MS) 413401 Ph: 02184-297000

## ADMISSION NOTICE : 2026-27

Application are invited from the eligible candidates for

**DIRECT SECOND YEAR B. PHARMACY**

Admission for the academic year 2026-27 for probable Vacancies after CAP rounds.

Detail schedule of admission process is displayed on college notice board & college website.

**CONTACT**

**Sojar College of Pharmacy, Khandvi,**
**PH: (02184) 297000, Mo. 9604397996 / 9420702085 / 9923332316**

E-mail : sojarcop@gmail.com Web Site : www.sojarcop.edu.in

**PRINCIPAL** **PRESIDENT**

श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे

## श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी, उमरगा

उपकार्यालय महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीसमोर,
१३२ केव्ही, उमरगा - ४१३६०६, जि. धाराशिव
Telephone: 02475-253254
E-mail: scopomerga@gmail.com Website: www.scopomerga.org
Approved by Pharmacy Council of India (PCI) New Delhi, Recognized by DTE, Maharashtra, Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Technological University, (DBATU) Lonere, Dist. Raigad

### प्रवेश प्रक्रिया सूचना २०२६-२७

**संस्था कोड : २६१९**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी थेट द्वितीय वर्ष बी फार्मसी पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता पात्र व इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून केंद्रीभूत प्रवेश फेरी झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | क्रियाकल्प | वेळापत्रक |
|---|---|---|
| ०१ | संस्थास्तरावरील प्रवेशाकरिता उपलब्ध असलेल्या प्रवर्गनिहाय जागांची माहिती प्रदर्शित करणे. | ०९/०९/२०२६ |
| ०२ | अर्जाची नोंदणी व त्याची पडताळणी करणे. | ०९/०९/२०२६ते ११/०९/२०२६ सायंकाळी ०५:०० वा. पर्यंत |
| ०३ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे. | १२/०९/२०२६ सकाळी ११: ०० वाजता |
| ०४ | तात्पुरती गुणवत्ता यादी संदर्भात जर काही तक्रार वा आक्षेप असल्यास, सादर करणे अथवा नोंदवणे. | १२/०९/२०२६ सकाळी ११:०० ते सायंकाळी ०५:०० वा. पर्यंत |
| ०५ | अंतिम गुणवत्ता यादीचे प्रदर्शन. | १३/०९/२०२५ सकाळी ११:०० वा. |
| ०६ | संस्थेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रे व शुल्क भरून प्रवेशाची निश्चिती करणे. | १३/०९/२०२५ दुपारी ०२: ०० वा. ते १५/०९/२०२५ सायंकाळी ०५:०० वा. पर्यंत |

प्रवेशाची पात्रता आणि प्रवेश प्रक्रिया ही राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष आणि तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र शासन, यांच्या नियमानुसार करण्यात येईल व प्रवेशाचे संपूर्ण वेळापत्रक महाविद्यालयाच्या वेबसाईटवर व सूचना फलकावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अधिक माहितीसाठी संपर्क:- 9325099319, 986000875, 9945464003**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### दिल्ली अर्ध मॅरेथॉन १८ ऑक्टोबर रोजी

**नवी दिल्ली :** आगामी १८ ऑक्टोबर रोजी येथे २१ वी दिल्ली अर्ध मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इथिओपियाचा बिरहानू लेगेसे व केनियाची इरीन चेप्ताई हे या अर्ध मॅरेथॉनमधील प्रमुख आकर्षण असतील. लेगेसे ५८:५९ मिनिटांच्या वैयक्तिक सर्वोत्तम वेळेसह एलिट पुरुष गटात आघाडीवर असेल, ज्यामुळे तो या वर्षीच्या स्पर्धेसाठी घोषित केलेल्या खेळाडूंमध्ये सर्वात वेगवान ठरला आहे. महिलांच्या गटात, केनियाची इरीन चेप्ताई ६४:५३ मिनिटांच्या वैयक्तिक सर्वोत्तम वेळेसह आघाडीवर असेल. वर्ल्ड ॲथलेटिक्स गोल्ड लेबल रोड रेसमध्ये जगातील काही सर्वोत्तम लांब पल्ल्याचे धावपटू एकत्र येतील, जे एकूण २,७५,७३२ डॉलर्सच्या बक्षीस रकमेसाठी स्पर्धा करतील. प्रत्येक गटातील विजेत्याला २७,००० डॉलर्स मिळतील. पुरुष आणि महिला दोन्ही गटांमध्ये १०व्या स्थानापर्यंतच्या धावपटूंना बक्षीस रक्कम दिली जाईल, तसेच अव्वल भारतीय धावपटूंसाठी स्वतंत्र प्रोत्साहनपर रक्कमही असेल. याव्यतिरिक्त, आपल्या गटातील मागील विक्रम मोडणाऱ्या एलिट ॲथ्लिटसाठी १२,००० डॉलर्सचा इव्हेंट-रेकॉर्ड बोनस देखील दिला जाणार आहे. लेगेसेसोबत ६० मिनिटांपेक्षा कमी वेळेत वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सात पुरुषांची एक बलाढ्य फळी असेल, त्यामुळे या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात चुरशीच्या पुरुष शर्यतींपैकी एक होण्याची शक्यता आहे.

### भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या घटनेत बदल

**नवी दिल्ली :** भारतीय ऑलिम्पिक संघटनेने (आयओए) मंगळवारी येथे झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत आपल्या घटनेत काही बदल करण्यास मंजुरी दिली. हे बदल 'नॅशनल स्पोर्ट्स गव्हर्नन्स ॲक्ट'शी (एनएसजीए) सुसंगत करण्यासाठी करण्यात आले असून, यामुळे पदाधिकाऱ्यांना दीर्घ कालावधीसाठी पदावर राहणे शक्य होणार आहे. आयओएच्या कार्यकारी समितीने १९ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत यापूर्वीच्या घटनेत करायच्या बदलांना मंजुरी दिली होती. आयओएच्या जुन्या घटनेनुसार, निवडणुकीच्या तारखेला ७० वर्षे पूर्ण झालेली कोणतीही व्यक्ती कोणत्याही पदासाठी पात्र नव्हती. मात्र, एनएसजी कायद्यानुसार, आंतरराष्ट्रीय सनद आणि नियमावलीने परवानगी दिल्यास ७० ते ७५ वयोगटातील व्यक्तीला निवडणूक लढवण्याची किंवा नामांकनासाठी प्रयत्न करण्याची मुभा मिळते. तसेच, आयओएच्या जुन्या घटनेत अशी तरतूद होती की, कोणताही सदस्य एका किंवा अनेक पदांवर सलग दोन कार्यकाळांपेक्षा जास्त काळ राहू शकत नाही. सलग दोन कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर संबंधित पदाधिकाऱ्याला 'कूलिंग-ऑफ' कालावधी (विशिष्ट विश्रांतीचा काळ) पूर्ण करणे अनिवार्य होते.

### हॉकी संघाने ऑलिम्पिक पात्रतेचे लक्ष्य ठेवावे

**नवी दिल्ली :** क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी भारतीय हॉकी संघांना विश्वचषकातील कामगिरीचा विचार करत बसण्याऐवजी आपल्या त्रुटी ओळखून त्या सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले आहे. लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळविणे हे आता आशियाई क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून साध्य करायचे असल्याने हे प्राधान्याचे ठरले आहे. नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये नुकत्याच पार पडलेल्या एफआयएच विश्वचषकातील भारताच्या कामगिरीनंतर, मांडविया यांनी पुरुष संघाचे प्रशिक्षक क्रेग फुल्टन, कर्णधार हरमनप्रीत सिंग, महिला संघाचे प्रशिक्षक स्योर्ड मारिजने, कर्णधार सलिमा टेटे आणि हॉकी इंडियाच्या अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. ही बैठक सुमारे एक तास चालली. विश्वचषकात भारतीय पुरुष संघ आठव्या स्थानावर राहिला, तर महिला संघाने ऐतिहासिक कामगिरी करत पाचवे स्थान पटकावले; १९७४ मधील पहिल्या स्पर्धेपासूनची ही त्यांची विश्वचषकातील सर्वोत्तम कामगिरी ठरली. ■

# दक्षिण विभाग ४६६ धावांनी पिछाडीवर

**दुलिप करंडक अंतिम सामना : पूर्व विभाग ७०८, दक्षिण विभाग ६ बाद २४२**


तिलक वर्मा


मुकेश कुमार

- देवदत्त, तिलकची अर्धशतके
- पूर्व विभागाचे वर्चस्व
- शमी, मुकेशचे प्रत्येकी २ बळी

**चेन्नई, ८ सप्टेंबर**

प्रतिष्ठेच्या दुलिप करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी एम. ए. चिदम्बरम स्टेडियमवर सुरू असलेल्या अंतिम सामन्यात पूर्व विभागाच्या ७०८ धावांच्या प्रत्युत्तरात देवदत्त पडिक्कल (६२) आणि तिलक वर्माच्या (५६ नाबाद) अर्धशतकांच्या बळावर दक्षिण विभागाने दुसऱ्या दिवस अखेर पहिल्या डावांत ८० षटकांत ६ बाद २४२ धावा काढल्या.

दक्षिण विभाग अजूनही ४६६ धावांनी पिछाडीवर आहे आणि या स्थितीतून पूर्व विभागाच्या ७०८ एवढ्या मोठ्या धावसंख्येला मागे टाकणे जवळपास अशक्य आहे.

देवदत्त व तिलकने चांगली कामगिरी केली असली, तरी दक्षिण विभागाच्या फलंदाजांच्या नियमित अंतराने विकेट्स पडत राहिल्या. अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने छोटे स्पेल्स टाकताना दिलेल्या धक्क्यांमुळे पूर्व विभागाचे दुलिप करंडक जिंकण्याचे स्वप्न साकारण्याच्या दिशेने पाऊल पडले. त्याने महत्त्वाच्या जोड्या फोडत शेख रशीद व रविचंद्रन स्मरणला बाद केले.

प्रत्युत्तर देताना दक्षिण विभागाच्या रिकी भुई व नारायण जगदिशन या सलामी जोडीने डावाची सुरुवात केली, परंतु वेगवान गोलंदाज मुकेश कुमारने रिकी भुईला (१) लवकर बाद केले. जगदिशन व देवदत्त पडिक्कलने संयमाने फलंदाजी करत दुसऱ्या गड्यासाठी ६० धावांची भागीदारी केली. पुढे देवदत्तने शेख रशीदसोबत तिसऱ्या गड्यासाठी ५६ धावांची भागीदारी करून संघाला १२६ धावांचा टप्पा गाठून दिला. मोहम्मद शमीने पायचित करण्यापूर्वी रशीदने २७ धावांची भर घातली. मुकेशने खेळपट्टीवर स्थिरावलेल्या देवदत्त पडिक्कललाही बाद करीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. देवदत्तने १०४ चेंडूंचा सामना करीत ४ चौकारांसह ६२ धावांची खेळी केली. दिवसाच्या खेळाच्या अखेरच्या काही मिनिटांत कर्णधार तिलक वर्माने स्मरण रवीचंद्रन (२३) व श्रेयस गोपालच्या (२६) मदतीने दक्षिण विभागाच्या ८० षटकांत ६ बाद २४२ धावांचा टप्पा गाठून दिला. खेळ थांबला तेव्हा तिलक वर्मा (नाबाद ५६, १३३ चेंडू)व सी.व्ही. मिलिंद (०) खेळपट्टीवर होते.

पूर्व विभागाकडून मोहम्मद शमी व मुकेश कुमारने प्रत्येकी २ बळी, मोहम्मद कुरैशी व शिखर मोहनने प्रत्येकी एक बळी बळी टिपला.

(वृत्तसंस्था)

# भारताला दोन सुवर्ण, दोन रौप्य अन् एक कांस्य

**अहमदाबाद, ८ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या जागतिक पॅरा तिरंदाजी सीरिज तिसरा टप्पा स्पर्धेच्या अंतिम टप्प्याआधीच्या दिवशी भारताने दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य पदक जिंकले. यामध्ये पुरुष कम्पाऊंड व रिकर्व्ह संघांनी सुवर्णपदके पटकावली, तर स्वाती चौधरीने दोन पदके आपल्या नावे केली.



जागतिक पॅरा तिरंदाजी सीरिज तिसऱ्या टप्प्याच्या स्पर्धेत मिश्र सांघिक प्रकारात लक्ष्य साधताना भारतीय पॅरा तिरंदाज

विद्यमान विश्वविजेता तोमन कुमार व श्याम सुंदर स्वामीने इराकचा १५२-१३९ असा पराभव करून पुरुष कम्पाऊंड सांघिक गटात सुवर्णपदक जिंकले; तर हरविंदर सिंग व विजय सुंडीने स्लोव्हाकियावर ६-२ असा विजय मिळवित पुरुष रिकर्व्ह सांघिक गटाचे विजेतेपद पटकावले.

महिलांच्या रिकर्व्ह सांघिक गटात भावना व पूजा यांच्या जोडीला चीनकडून ०-६ असा पराभव पत्करावा लागल्याने रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर स्वाती आणि आदिल मोहम्मद नझीर अन्सारीने मिश्र सांघिक डब्ल्यू-१ रिकर्व्ह कम्पाऊंड प्रकारात उपविजेतेपद मिळविले.

त्यानंतर स्वातीने वैयक्तिक डब्ल्यू-१ प्रकारात तटस्थ संघाकडून खेळणाऱ्या रशियाच्या एलेना क्रुटोव्हाचा ६-२ असा पराभव करून कांस्यपदक जिंकले.

महिलांच्या कम्पाऊंड सांघिक प्रकारात भारताचे कांस्यपदक हुकले; शीतल देवी व पायल नागला तिसऱ्या स्थानासाठीच्या लढतीत चीनकडून पराभव स्वीकारावा लागला. स्वामी व तोमनने इराकच्या अब्बास काधिम व अन्वर अलदावद या जोडीवर वर्चस्वपूर्ण विजय मिळवित पुरुष कम्पाऊंड सांघिक गटात सुवर्णपदक जिंकले.

भारतीय खेळाडूंची सुरुवात संथ झाली व पहिल्या फेरीत त्यांनी ८ गुण मिळविले, परंतु लवकरच त्यांनी आपला लय पकडली. त्यानंतरच्या १२ बाणांमध्ये त्यांनी केवळ पाच गुण गमावले व भक्कम आघाडी घेतली.

त्यानंतर स्वामी व तोमनने गुण मिळविण्यातील सातत्य राखले; त्यांच्या अचूक नेमबाजीमुळे इराकी खेळाडूंना पुनरागमन करण्याची फारशी संधी मिळाली नाही.

हरविंदर व सुंडीने सुरुवातीच्या सेटमधील पिछाडीवरून सावरत स्लोव्हाकियाच्या डेव्हिड इव्हान आणि डेनिस इव्हान यांचा ६-२ असा पराभव केला. त्यांनी हा सामना ३४-३७, ३६-३१, ३८-३४, ३५-३१ अशा फरकाने जिंकला.

सुरुवातीला भारताला संघर्ष करावा लागला; पहिल्या सेटमध्ये त्यांना ७ गुण मिळाले आणि एकही '१०' गुण मिळवता आला नाही, मात्र तिसऱ्या सेटमध्ये भारताने तीनदा '१०' गुण मिळवत ४-२ अशी आघाडी घेतली.

चौथ्या सेटमध्येही त्यांनी संयम राखत पुनरागमन पूर्ण केले आणि सुवर्णपदक निश्चित केले.

एकतर्फी ठरलेल्या अंतिम सामन्यात चीनकडून ०-६ (२३-३४, ३३-३५, ३०-३१) अशा फरकाने पराभव पत्करल्यामुळे भावना व पूजाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. चीनने सहजपणे सुवर्णपदक जिंकले.

स्वाती आणि आदिल मोहम्मद नझीर अन्सारीने मिश्र सांघिक डब्ल्यू-१ रिकर्व्ह कम्पाऊंड प्रकारात रौप्यपदक जिंकले; त्यांना चेक प्रजासत्ताकच्या सारका पुल्तार मुसिलोव्हा आणि डेव्हिड ड्राहोनिन्स्की यांच्याकडून १-५ (३१-३८, ३३-३७, ३३-३३) असा पराभव स्वीकारावा लागला.

(वृत्तसंस्था)

## हॉकी संघ निळ्या रंगाच्या गणवेशात खेळणार


**नवी दिल्ली, ८ सप्टेंबर**

आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय हॉकी संघ आपल्या जुन्या निळ्या रंगाच्या गणवेशात खेळणार आहेत, अशी माहिती हॉकी इंडियाने दिली.

हॉकी इंडियाने आपला दीर्घकाळापासून असलेला निळा रंग बदलून केशरी रंग स्वीकारण्याच्या निर्णयावर बरीच टीका झाली होती; नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये नुकत्याच पार पडलेल्या विश्वचषक स्पर्धेत संघांनी याच केशरी रंगाचा गणवेश परिधान केला होता.

हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी या निर्णयामागील प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने हा वाद अधिकच वाढला होता. फेडरेशनचे निवडून आलेले नेतृत्व किंवा कार्यकारी मंडळाला कोणतीही कल्पना न देता हा निर्णय अंमलात आणला गेल्याचे त्यांनी म्हटले होते. हॉकी इंडियाने आपल्या पसंतीच्या गणवेशाबाबतचा तो निर्णय मागे घेतल्याचे दिसून येत आहे.

# गॉफ तीन वर्षांनंतर उपांत्यपूर्व फेरीत


कोको गॉफ

**न्यू यॉर्क, ८ सप्टेंबर**

प्रतिष्ठेच्या अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत महिला विभागात उपांत्यपूर्व फेरीत अमेरिकेच्या कोको गॉफने १४ व्या मानांकित इव्हा जोव्हिकचा ६-१, ६-४ असा पराभव केला. २०२३ मध्ये आपले पहिले ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपद जिंकल्यानंतर कोकोने पहिल्यांदाच अमेरिकन ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. गत दोन वर्षांत ती प्रत्येक वेळी चौथ्या फेरीत पराभूत झाली होती.

चौथ्या मानांकित गॉफचा सामना फ्रेंच ओपन विजेती आणि पाचवी मानांकित मीरा आंद्रीव्हा हिच्याशी होईल. आंद्रीव्हाने सामन्याच्या अंतिम गेममध्ये दुखापतग्रस्त झालेल्या प्रतिस्पर्धी ॲनास्तासिया पोटापोव्हाला (२४ वी मानांकित) मदत केल्यानंतरही जोरदार पुनरागमन करीत ५-७, ६-४, ६-३ असा विजय मिळविला.

### झेंगविरुद्ध उपांत्यपूर्व फेरीची लढत निश्चित

जगातील दुसऱ्या क्रमांकाची खेळाडू एलेना रायबाकिनाने दोन वेळा अमेरिकन ओपन विजेती राहिलेल्या नाओमी ओसाकाचा सरळ सेटमध्ये पराभव केला. आता उपांत्यपूर्व फेरीत झेंग किनवेनवर विजय मिळवून ती जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान गाठू शकते.

तिला फक्त झेंग किनवेनचा पराभव करायचा आहे, पण हे काम सोपे नसेल. कारण झेंग जेव्हा पिछाडीवर राहते तरीही ती तिथेच हार मानत नाही व चिवट झुंज देते. रायबाकिनाने ओसाकाचा ६-१, ६-४ असा पराभव केला.

### लुसियानोला नमवून झ्वेरेव्ह उपांत्यपूर्व फेरीत

अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेतील आपल्या मोहिमेची संथ सुरुवात मागे सारत अव्वल मानांकित जर्मन खेळाडू अलेक्झांडर झ्वेरेव्हने इटलीच्या लुसियानो डार्डेरीचा ६-२, ६-२, ७-६(३) असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीतील स्थानासाठी आता त्याचा सामना नेदरलँड्सच्या बोटिक व्हॅन डी झँडशल्पशी होईल.

सलग चौथा 'नाईट-सेशन' सामना खेळताना व या प्रवासात दोनदा पाच-सेटचे सामने खेळून थकवा जाणवत असतानाही, २९ वर्षीय झ्वेरेव्हने सामन्यात वेळ न घालवता आक्रमक खेळ केला; आपल्या भक्कम सर्व्हिसवर अखेरीस निर्माण झालेला दबाव पचवत त्याने पहिला सेट सहज जिंकला. त्यानंतरही त्याने आपला फॉर्म कायम राखत प्रतिस्पर्ध्यावर वर्चस्व गाजविले. (वृत्तसंस्था)

# शौर्य, इलिशा, आर्या, अयान, आर्य, साईशा व आर्यन अजिंक्य

**सोलापूर टीपीएल लॉन टेनिस स्पर्धेतील कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

टीपीएल अंतर्गत समाज कल्याण लॉन टेनिस क्लब येथे पार पडलेल्या दोन दिवसीय लॉन टेनिस स्पर्धेत शौर्य बेंद्रे, इलिशा खबायते, आर्या जाधव, अयान बोल्ली, आर्य पवार, साईशा पुलगम आणि आर्यन येमूल या खेळाडूंनी आपापल्या वयोगटात विजेतेपद पटकावले.

सोलापूरसह बीड, नाशिक, तुळजापूर येथील ९१ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. समाज कल्याण लॉन टेनिस क्लब आणि गॅलेक्सी प्लाय अँड हार्डवेअर यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा पार पडल्या. प्रशिक्षक सुधीर सालगुडे आणि महेश झांबरे यांच्या आयोजनाखाली या स्पर्धा पार पडल्या.



या स्पर्धेसाठी पंच म्हणून शिवा हडपद, विजय वीरगौडा, आर्यन येमूल, आशिष हुंडेकरी, शंभूराजे पवार आणि पवन डीडवानी यांनी काम पाहिले. पारितोषिके गॅलेक्सी प्लाय अँड हार्डवेअरचे अझर गदवाल व परिवार, मुलाणी, आझम सैय्यद , संगमनाथ नागोजी आणि असीफ शेख यांच्या उपस्थितीत देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद सोनवणे यांनी केले.

**स्पर्धेतील अंतिम निकाल याप्रमाणे:**

**१० वर्षे:** मुले: शौर्य बेंद्रे वि. वि. अमन शेख ६/१. मुली: इलीशा खंबायते वि. वि. अवनी वीर ६/२.

**१२ वर्षे:** मुले: अयान बोल्ली वि. वि. ऋषिकेश चव्हाण ६/२. मुली: आर्या जाधव वि. वि. साईशा पुलगम ६/४

**१४ वर्षे:** मुले: आर्य पवार वि. वि. यशवंतराजे पवार ६/३, मुली: साईशा पुलगम वि. वि. अमोली बिराजदार ६/२

**१६ वर्षे:** मुले: आर्यन येमूल वि. वि. तनुज संचेती ६/४.

# सेंट थॉमस स्कूलची योगा व स्केटिंग स्पर्धेत ८ पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

सेंट थॉमस स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शहर, राज्य आणि झोन स्केटिंग तसेच योगासन स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन करत ८ पदके पटकावली.

शहरस्तरीय योगासन स्पर्धेत गार्गी आळगीकर हिने आर्टिस्टिक पेयर गटात प्रथम क्रमांक मिळवला, तर राज्यस्तरीय स्पर्धेत ती द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली. याशिवाय आयसीएसई बोर्डाच्या पुणे झोन स्केटिंग स्पर्धेतही शाळेच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक फादर रॉबिन, क्रीडा शिक्षक अमित येवलेकर, राजेंद्र गायकवाड, प्रशांत जाधव तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



**पदक विजेते असे**

**शिवाने हत्ते :** ११ वर्षाखालील- इनलाईन ट्रॅक ५०० मीटरमध्ये द्वितीय आणि इनलाईन ट्रॅक १००० मीटरमध्ये तृतीय.

**शिवम वाघमोडे :** १४ वर्षाखालील- इनलाईन ट्रॅक ५०० मीटरमध्ये द्वितीय आणि इनलाईन ट्रॅक १००० मीटरमध्ये तृतीय.

**श्रवण पेरला :** १४ वर्षाखालील मुले- क्वाड्र स्केटिंग १००० मीटरमध्ये प्रथम आणि ५०० मीटरमध्ये द्वितीय. तसेच रीजनल आयसीएसई बोर्ड स्पर्धेसाठी त्याची निवड.

# सोलापूरच्या सर्वलिंग काळेल यास कांस्य

**स्पेशल ऑलंम्पिया राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेतील कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर -**

गाझीपूर सिटी (उत्तर प्रदेश) येथील कान्हा हवेली येथे दिनांक ०२ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या स्पेशल ऑलंम्पिया राष्ट्रीय स्पर्धेत सोलापूरचा सुपुत्र आणि भैरुरतन दमाणी अंध शाळेचा माजी विद्यार्थी सर्वलिंग काळेल याने ज्युनिअर गटातील पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावले आहे.

त्याचे उद्योजक राजेश दमाणी, भैरुरतन दमाणी अंध शाळेचे सचिव संतोष भंडारी, मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे अंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू गंगा कदम व त्याचे मार्गदर्शक राजू शेळके यांनी सर्वलिंगचे विशेष कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



### मुंबईत घेतोय उच्च शिक्षण व क्रीडा प्रशिक्षण

सर्वलिंग हा सध्या मुंबई येथील कीर्ती कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत आहे. खेळाची आवड जपण्यासाठी तो प्रभादेवी (मुंबई) येथील कामगार मैदानाच्या व्यायामशाळेत पॉवरलिफ्टिंगचे खडतर प्रशिक्षण घेत आहे. त्याला प्रशिक्षक लक्ष्मण पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

**अंधत्वावर मात करीत यश**

**सर्वलिंगचा हा प्रवास अत्यंत संघर्षमय राहिला आहे. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपल्यानंतर त्याच्या आईने इतरांकडे धुणे-भांडी आणि मोलमजुरी करून कुटुंबाचा गाडा हाकला. अत्यंत गरिबी आणि प्रतिकूल परिस्थिती असतानाही आईने दोन्ही मुलांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विशेष म्हणजे, सर्वलिंग आणि त्याचा धाकटा भाऊ दोघेही अंध आहेत. घरची बिकट आर्थिक परिस्थिती आणि शारीरिक आव्हानांवर मात करत सर्वलिंगने जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्याने हे राष्ट्रीय स्तरावरील यश संपादन केले आहे.**

## सोलापूर जिल्हा सब ज्युनियर बॉलबॅडमिंटन संघ निवड चाचणी उद्या मंगळवेढ्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्य ४५ वी सब ज्युनिअर बॉल बॅडमिंटन अजिंक्य स्पर्धा १० ते १३ सप्टेंबर दरम्यान चंद्रपूर येथील क्रीडा संकुल या ठिकाणी होत आहे. या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्याचा संघ निवडण्यात येणार आहे. यासाठी सोलापूर जिल्ह्यातील खेळाडूंनी ९ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजता जवाहरलाल शेतकी हायस्कूल मंगळवेढा या ठिकाणी आपल्या ओळखपत्रासह उपस्थित रहावे. या निवडचाचणी समितीमध्ये सोलापूर जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशन संघटनेचे सचिव राजेंद्र माने, शब्बीर शेख व शिवकुमार स्वामी हे काम पाहणार आहेत. तरी जिल्ह्यातील सर्व खेळाडूंनी या निवड चाचणीसाठी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष प्रकाश भुतडा यांनी केले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### पोस्टर सादरीकरण स्पर्धेत ‘एसव्हीएस’ची कामगिरी

**टेंभुर्णी, दि. ८ सप्टेंबर-**

बारामती कॉलेज ऑफ फार्मसी, बारामती येथे आयोजित पोस्टर सादरीकरण स्पर्धेत एसव्हीएस कॉलेज ऑफ फार्मास्युटिक एज्युकेशन अँड रिसर्च, टेंभुर्णीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली. विद्यार्थ्यांनी फार्मसी क्षेत्राशी संबंधित विविध नाविन्यपूर्ण व अभ्यासपूर्ण विषयांवरील पोस्टर्स प्रभावीपणे सादर करून उपस्थितांची दाद मिळिवली. स्पर्धेतील उत्कृष्ट सादरीकरणाची दखल घेत एसव्हीएस महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकावले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र ठोंबरे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



### विद्यानिकेतन प्रशालेत शिक्षक दिन साजरा

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

विद्यानिकेतन प्रशाला व हिंगूलाबिका प्राथमिक शाळेत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन मोहन भूमकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजकुमार हंचाटे व ट्रस्टी जगदीप दंतकाळे, विजय पुकाळे, उद्योगपती अनिल ढवळे, बिराजदार, फुटाणे, मुख्याध्यापक गोपीचंद नवले उपस्थित होते. यावेळी सर्व शिक्षकांना भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास माजी विद्यार्थी व लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन मोहन भूमकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.




### मायबोली सांस्कृतिक मंडळाच्या हास्यरंगला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बार्शी, दि. ८ सप्टेंबर-**

येथील मायबोली सांस्कृतिक मंडळाच्यावतीने नुकतेच येथे हास्यरंग या तुफान विनोदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एकेकाळी हास्यजत्रा गाजवणारे प्रसिद्ध हास्य कलाकार विशाखा सुभेदार, पॅडी कांबळे, गौरव मोरे आणि मयुरी रानडे यांनी एकूण चार स्किट सादर केले. अपरात्री घरी आलेला दारुडा नवरा व त्याची चिडलेली पत्नी यांचे प्रहसन, आडनाव बदलण्यासाठी गॅझेट ऑफिसमध्ये आलेला एक तरुण व तेथील महिला अधिकाऱ्याचा संवाद, मंगल कार्यालय चालक व ग्राहक यांची शाब्दिक चकमक आणि अविवाहित ड्रायव्हर व लग्न ठरवण्यासाठी निघालेली प्रवासी तरुणी यांचे संभाषण असे प्रसंग निवडून सर्वच कलाकारांनी त्यातील नाट्य विलक्षण विनोदी आणि परिणामकारक पद्धतीने रंगवले. चारी स्किटना मायबोलीच्या श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात मायबोलीचे संस्थापक, अध्यक्ष विजयकुमार माढेकर आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमांसमोर दीपप्रज्वलन करुन झाली. प्रास्ताविक मुकुंदराज कुलकर्णी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रशांत मोहिरे यांनी करुन दिला. पाहुण्यांचा सत्कार शुक्लाभाभी माढेकर,जवाहर माढेकर, प्रमोदिनी कोठारी, शिल्पा माढेकर,पल्लवी माढेकर यांच्या हस्ते करण्यात आला. आभार राजेंद्र श्रीश्रीमाळ यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. वैशाली मोहिरे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर पंढरपूर बँकेचे अधिकारी अमित उत्पात, अरुण शहा, व्यंकटेश कुलकर्णी आदी मान्यवर होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील पाटील, जितेंद्र माढेकर, निलेश माढेकर, राजेश खाडे, डॉ.योगेश कुलकर्णी, डॉ.तेजस लाड, सुमन चंद्रशेखर, शारदा पानगावकर यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### संगीता राऊत



**बार्शी, दि. ८ सप्टेंबर-**

येथील कसबा पेठेतील राऊत गल्लीत राहणारे न्यायालयातील सेवानिवृत्त सहा. अधीक्षक संजय उध्दवराव राऊत यांच्या धर्मपत्नी सौ. संगीता संजय राऊत यांचे मंगळवार दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ५४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवार पेठेतील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### महेश वचने-पाटील



**सोलापूर, दि.७ सप्टेंबर-**

येथील महेश अशोक वचने- पाटील (वय. ४६) यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, बहिण, मावशी, मामा, मामी, असा परिवार आहे. त्यांची अंत्यविधी लोहारा त्यांच्या शेतात करण्यात आले. रेवणसिध्देश्वर पुजारी शिंगारे यांचे भाचे होत.

# सोलापूर परिसरात दोघांचा आत्महत्येचा प्रयत्न

**कौठाळी व बाळे येथील घटना**

**एकाने विष पिले, एकाने गळफास घेतली : त्यातील एकाचा मृत्यू**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

शहर व परिसरात दोघांचे आत्महत्येचा प्रयत्न झाले. घरच्यांनी मोबाईल काढून घेतला म्हणून एका युवकाने केला विष पिऊन आत्महत्याचा प्रयत्न तर एकाने अज्ञात कारणावरून गळफास घेतली.

पहिल्या घटनेत घरातील लोकांनी मोबाईल काढून घेतल्याच्या राग धरून एका १८ वर्षीय तरुणाने विष पिऊन आत्म हत्येचा प्रयत्न केला. ही घटना कौठाळी (ता.उत्तर सोलापूर) येथे आज मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. समर्थ कल्याण माळी (वय १८ रा. कौठाळी) असे विष प्राशन केलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्या जवळ असलेला मोबाईल घरातील लोकांनी काढून घेतला होता.त्यामुळे रागाच्या भरात त्याने कीटकनाशक हे विषारी द्रव प्राशन केले होते. वडाळा येथे प्राथमिक उपचार करून त्याला वडिलांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

दुसऱ्या घटनेत अज्ञात कारणावरून एका ३३ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना लक्ष्मीनगर बाळे येथे सोमवारी रात्री १० वाजेच्या सुमारास उघडकीस आली. सचिन देविदास दवेकर (वय ३३ रा.लक्ष्मीनगर बाळे) असे मयताचे नाव आहे. सोमवारी रात्री १० वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह पत्र्याच्या घरातील लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ही खबर फौजदार चावडी पोलिसांना समजली असता पोलीस हवालदार गायकवाड यांनी घटनास्थळी पोहोचून त्याला फासातून सोडवून येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## पेटीएमवरील प्रलंबित कर्ज मंजूर करून देण्याच्या आमिषाने ७१ हजार रुपये उकळले

**एकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

पेटीएमवरील प्रलंबित कर्ज मंजूर करून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीकडून ऑनलाइन ७१ हजार ६५२ रुपये घेत फसवणूक केल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात एका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजू आर. बटले असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत सोमनाथ राजू कोळेकर (रा. मनोहर नगर झोपडपट्टी, मुरारजी पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

वरील आरोपीने यातील फिर्यादीशी क्रोमा शोरूम च्या बाजूला २० ते २५ जुलैदरम्यान संपर्क साधला. त्यानंतर आरोपीने पेटीएमवरील प्रलंबित कर्ज मंजूर करून देतो, असे सांगून त्याने फिर्यादीकडून फोन-पेच्या माध्यमातून ७१ हजार ६५२ रुपये घेतले. पैसे घेऊन दीड महिना उलटला तरी आरोपीने सांगितल्याप्रमाणे कर्ज मंजूर करून न देता रुपये घेऊन फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत श्रावणी लवांडे प्रथम



**संस्कृती बेहेरे द्वितीय, स्पंदन कोळेकर तृतीय**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ सप्टेंबर-**

कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या ४५ व्या स्मृती समारोह अंतर्गत तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत श्रावणी लवांडे प्रथम, संस्कृती बेहेरे द्वितीय (सांगोला विद्यामंदिर प्रशाला), स्पंदन कोळेकर तृतीय (न्यू इंग्लिश स्कूल), ईश्वरी गायकवाड चतुर्थ (फॅबटेक पब्लिक स्कूल) तर ग्रामीण स्पर्धकांमधून पाचवा क्रमांक सिद्धी लिगाडे (श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल, धायटी) यांनी संपादन करत पारितोषिक मिळवले.

स्पर्धेच्या सुरुवातीला कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास परीक्षक सुनील जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. सदर स्पर्धेत ४३ स्पर्धकांच्या पात्रता फेरीतून ९ स्पर्धक निवडून त्यांचे अंतिम परीक्षण सागर विश्वासे, सुनील जगताप (पंढरपूर), निखिल बडवे (सोलापूर), पुष्पलता मिसाळ, नितीन गवळी (सांगोला), ज्ञानेश्वर डोंगरे (चोपडी) या तज्ञपरीक्षकांमार्फत करण्यात आले. यशस्वी स्पर्धकांचा प्रशस्तीपत्रक, सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन मार्गदर्शक शिक्षकांसह सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सदस्या शीलाकाकी झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, पर्यवेक्षक जगन्नाथ माने उपस्थित होते. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक काकासाहेब नरुटे, शुभांगी घोंगडे, मकरंद अंकलगी यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा.चारुदत्त जगताप, सत्कार निवेदन उन्मेश आटपाडीकर, सूत्रसंचालन आशुतोष नष्टे तर आभार काकासाहेब नरुटे यांनी मानले.



## ‘या मेरे अल्लाह बारिश बरसा दे’

**करमाळयात पावसासाठी मुस्लिम बांधवांची प्रार्थना**

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. ८ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्ह्यासह करमाळा शहर व तालुक्यात सप्टेंबर उजाडला तरीही वरुण राजाने पाठ फिरवल्याने शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडला आहे.बाजारपेठेतील उलाढाल ठप्प झाली असून पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत असल्याने पिण्याच्या व जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.या पार्श्वभूमीवर करमाळा शहरातील मुस्लिम समाजबांधवांनी पावसासाठी अल्लाहकडे विशेष प्रार्थना करत दुआ करण्यात आली.

या अल्लाह बारिश बरसा दे अशा पद्धतीने परमेश्वराकडे दुवा करीत करमाळातील मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केली

शहरातील करमाळा टेंभुर्णी महामार्गावरील असणाऱ्या ईदगाह मैदानावर रविवारी दुपारी २ वाजताच्या नमाजनंतर हाफिज मौलाना मरगबुल हसन यांच्या मार्गदर्शनाखाली ही सामूहिक प्रार्थना करण्यात आली. शेतकऱ्यांच्या शिवारात भरघोस पाऊस पडावा, कुठेही दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होऊ नये,जनावरांना चारा-पाणी मिळावे, तलाव, विहिरी आणि धरणे भरून निघावीत आणि संपूर्ण सृष्टीवर अल्लाहची कृपा व्हावी यासाठी मनोभावे दुआ करण्यात आली. यावेळी हात वर करून भरल्या डोळ्यांनी पावसाची याचना करण्यात आली. लहानांपासून ते वयोवृद्धांपर्यंत उपस्थित सर्वांच्या डोळ्यांत अश्रू तरंगले होते.

# सोलापूर विद्यापीठ युवा महोत्सवासाठी बार्शी महाविद्यालय सज्ज; तयारी अंतिम टप्प्यात

**विद्यापीठ युवा महोत्सव समितींकडून तयारीची पाहणी; ९ रंगमंचांवर ३९ कला प्रकारांचे होणार सादरीकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २२ व्या युवा महोत्सवासाठी बार्शी येथील श्री शिवाजी महाविद्यालय सज्ज झाले असून, महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. दि. २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत महाविद्यालयाच्या परिसरात हा महोत्सव रंगणार आहे. विद्यापीठ युवा महोत्सव समितीकडून महाविद्यालयाला भेट देऊन तयारीचा आढावा नुकताच घेतला. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक केदारनाथ काळवणे योग्य त्या सूचना दिल्या आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातळचे कुलगुरू प्रकाश महानवर, प्र-कुलगुरु लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव अजित लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा महोत्सवाचे नियोजन सुरू आहे. अवघ्या वीस दिवसावर महोत्सव येऊन ठेपला असून दुसरीकडे विद्यार्थ्यांची जोरदार रंगीत तालीम सुरू आहे. विद्यापीठ युवा महोत्सव समितीकडून तयारीचा आढावा नुकताच घेण्यात आला. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ देऊ नका अशी सूचना संचालक काळवणे यांनी दिली आहे.



**सर्वच महाविद्यालयाकडून तयारी जोरदार**

युवा महोत्सवासाठी श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी, संगमेश्वर, वालचंद महाविद्यालय, सांगोला महाविद्यालय, दयानंद महाविद्यालय यांच्यासह ५५ हून अधिक महाविद्यालयाकडून विविध कला प्रकाराची जोरदार तयारी सुरू आहे. विद्यार्थी दिवस रात्र विविध कलाप्रकारची कसून सराव करीत आहेत. काही महाविद्यालयाचे कलाप्रकार जवळपास बसलेले आहेत तर काहींनी आत्ताच सुरुवात केली आहे. जास्तीत जास्त बक्षीसे जिंकण्याचा निर्धार महाविद्यालयाकडून करण्यात आला आहे.

महाविद्यालयास भेट देऊन नियोजनाचा आढावा घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांची राहण्याची, जेवणाची सोय, रंगमंच यासह विविध बाबींची पाहणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना कला सादर करण्यासाठी दर्जेदार साऊंड सिस्टिम, रंगमंच असणार आहे. विद्यार्थ्यांनी उत्तम तयारी करून आपली कला सादर करावी.
**- केदारनाथ काळवणे,** संचालक, विद्यार्थी विकास विभाग, सोलापूर विद्यापीठ

यंदाचा युवा महोत्सव दर्जेदार, यादगार असणार आहे. महोत्सवाची तयारी जवळपास अंतिम टप्प्यावर आली आहे. पाऊस आल्यावर कोणताही व्यत्यय येणार नाही. वॉटरप्रूफ मंडप असणार आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ देणार नाही.
**- डॉ.ए. बी शेख,** प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

युवा महोत्सवात विविध ३९ कला प्रकारांचे सादरीकरण होणार असून, त्यासाठी महाविद्यालय परिसरात ९ रंगमंचांची निर्मिती करण्यात येत आहे. प्रत्येक रंगमंचावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम वेगाने सुरू आहे. स्पर्धक विद्यार्थी, परीक्षक, पत्रकार आणि विद्यार्थी प्रेक्षकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी महाविद्यालय प्रशासनाकडून काटेकोर नियोजन करण्यात आले आहे.

महोत्सवासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाचीही उत्तम व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच रंगमंच, बैठक व्यवस्था, ध्वनी व प्रकाशयोजना, प्रवेश व्यवस्था आदी विविध बाबींची पाहणी करून आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी बार्शी महाविद्यालयाचे प्राचार्य शेख, प्रा. विश्वनाथ आवड, यशपाल खेडकर,राम पवार, गुणवंत सरवदे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## धनगर समाजाच्या ‘एसटी’ आरक्षणासाठी बार्शीत आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ८ सप्टेंबर-**

धनगर समाजाचा अनुसूचित जमातीच्या (ST) प्रवर्गात समावेश करून आरक्षणाची अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी सकल धनगर समाज बार्शी शहर व तालुक्याच्या वतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसील कार्यालयामार्फत पाठविले.

यावेळी माजी नगरसेवक हरिभाऊ कोळेकर, राजेंद्र येळे, ॲड. रविंद्र वैद्य, बजरंग नरोटे, शितल पाटील, आप्पा शेंडगे, संदिप काळे, अरुण वैद्य, विपुल होनमाने, खंडू नरोटे, प्रणित काळे, राहुल खरात, विश्वास काळे, मारुती मारकड, ज्ञानेश्वर दलगुडे, सर्जेराव घेलतोडे, साईराज ढेकळे यांच्यासह धनगर समाजबांधव उपस्थित होते



धनगर समाजाचा आरक्षणाचा प्रश्न अनेक दशकांपासून प्रलंबित असून, समाजाच्या घटनात्मक हक्कांसाठी सातत्याने लोकशाही व संविधानिक मार्गाने संघर्ष सुरू आहे. सामाजिक न्याय, शैक्षणिक व आर्थिक प्रगती तसेच भावी पिढ्यांच्या भवितव्याशी हा प्रश्न निगडित असल्याने शासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

सध्या धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या अंमलबजावणीसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी निर्णायक टप्प्यावर आहे. ८ सप्टेंबरपर्यंत राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयासमोर आपली स्पष्ट व ठाम भूमिका मांडावी, धनगर समाजाच्या आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, यासाठी सरकारने पूर्ण कायदेशीर ताकदीने बाजू मांडावी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल प्रतिकूल ठरल्यास आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने पर्यायी ‘प्लॅन-बी’ तयार ठेवावा. केंद्र व राज्य शासनाने समन्वय साधून आवश्यक प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावी. यानंतर माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद वाघमोडे यांनी धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या प्रवर्गात समावेशाच्या प्रलंबित मागणीबाबत भूमिका मांडली.

### नोटीस

**सौ. सर्वमंगलाबाई उत्रेश्वर कथले चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने**
**डॉ. बी. एम. नेने अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च अँड रिलीफ सोसायटी**
आगळगांव रोड, बार्शी- ४१३४०१ जि. सोलापूर

**वर्ष २०२५-२०२६ करीता वार्षिक सर्वसाधारण सभा क्रमांक- ४५ ची नोटीस**

सोसायटीच्या सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की, संस्थेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दिनांक- २४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२.१५ वाजता मिटींग हॉल (गणेश हॉल), नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, आगळगांव रोड, बार्शी येथे होईल. सर्वांनी उपस्थित राहावे ही विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

१. २७ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभा क्रमांक- ४४ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. वर्ष २०२५-२०२६ चा लेखापरीक्षण अहवाल स्विकारणे व मंजुरी देणे.
३. वर्ष २०२५-२०२६ च्या वार्षिक अहवालास मंजुरी देणे.
४. वर्ष २०२६-२०२७ चे अंदाजपत्रक मंजुर करणे.
५. वर्ष २०२६-२०२७ करिता वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणारे विषय.

**-:टीपः-**

१. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेवर असलेल्या विषयांसंबंधी- कागदपत्रे सभासदांना पाहणी व तपासणीसाठी नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी येथे कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत बैठकीपूर्वी ७ दिवस उपलब्ध करुन दिली जातील.
२. गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी १२.४५ वाजता पुन्हा सभा भरविण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
३. संपर्कासाठी सर्व सभासदांनी आपले सध्याचे पत्ते व फोन नंबर कार्यालयाकडे त्वरीत पाठवावेत. संस्था/फर्म तर्फे येणाऱ्या इसमाने त्यांचे प्रतिनिधी असल्याबद्दल पत्र घेऊन यावे.

**दिनांक- ०९/०९/२०२६**

**सही/-**
**नंदकिशोर सोमाणी**
**चेअरमन**
**डॉ. बी. एम. नेने अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च अँड रिलीफ सोसायटी**

## महत्वाचे...



## पोशम्मा मंदिर येथे १००० लिटर क्षमतेची पाण्याची टाकी प्रदान

**सोलापूर, दि.८ सप्टेंबर-**
रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी आणि नंदमुरी बाळकृष्ण फॅन्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विष्णू नगर येथील पोशम्मा मंदिरासाठी १००० लिटर क्षमतेची सिंटेक्स पाण्याची टाकी प्रदान करण्यात आले. यावेळी निर्मला दंडी, सिद्राम मादगुंडी, व्यंकटेश मादगुंडी, रवि साई, शिवराज केंचुगुंडी, नरसिंह कनकी, सचिव श्रीनिवास नंदाल, प्रा.विठ्ठल वंगा, चार्वाक बुर्गुल, श्रीनिवास कट्टा, नागनाथ बंडा, गोपाल मिठ्ठा, देविदास मंगलपल्ली, रघुनाथ केंचुगुंडी, श्रीनिवास बिंगी आदी उपस्थित होते.

---

## उपनिबंधक कार्यालयात तोतया महिलेच्या साह्याने शेतजमीन हडपली

### दोन महिलांसह दहा जणांवर फसवणुकीचा गुन्हा

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**
येथील दुय्यम निबंधक कार्यालयात एका तोतया महिलेला उभे करून बनावट कागदपत्रांच्या आधारे शेतजमीन स्वतःच्या नावावर हस्तांतर करून घेतली .त्यानंतर ती जमीन पुन्हा विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी दोन महिलांसह दहा जणांविरुद्ध सदर बाजार पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजीम शेख, हसीना शेख, सादीक पटेल, शफिक कुरेशी, रिजवान मुल्ला, मोहिनी कोरे, विरपक्ष कोरे, रेवणसिध्द कोरे आणि नागेश पुजारी (सर्व रा-सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत हसीना म. गौस शेख (वय ५८, रा. शास्त्रीनगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. वरील आरोपींनी संगणमत करून २३ ऑक्टोबर २०२३ रोजी ते ७ सप्टेंबर २०२६ दरम्यान यातील फिर्यादीच्या मालकीची दक्षिण सोलापूर तालुक्यातील लिबीचिंचोळी शिवारातील गट क्रमांक १७६/२/ब येथील शेतजमीन स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी खरेदी दस्तऐवज करताना एका तोतया महिलेला फिर्यादी असल्याचे भासवून उभे केले व फिर्यादीच्या नावावरील आधारकार्डाचा वापर करून संबंधित शेतजमीन वरील आरोपींनी स्वतःच्या नावावर करून घेऊन फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक पवार हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहे.

---

## अपघातातील व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर, दि.८ सप्टेंबर-**
दुचाकी घसरुन झालेल्या अपघातात जखमी व्यक्तीचा शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मंगळवार, दि.८ सप्टेंबर २०२६ रोजी मृत्यू झाला. सुभाष शिवराया कोळी (वय-५४, रा.बोरोटी खुर्द, ता.अक्कलकोट) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. बुधवार, दि.२ सप्टेंबर २०२६ रोजी ते आपल्या गावाकडून अक्कलकोटकडे दुचाकीवरुन निघाले असता बासले गावाजवळ दुचाकी घसरुन ते जखमी झाले होते. एका खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

---

## जयभारत प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**सोलापूर, दि. ८ सप्टेबर-**
जयभारत प्राथमिक शाळेत माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. संस्थेचे चेअरमन सिद्राम फुले गुरूजी, सचिव दिपक फुले, सालोमन रामपोगू, मुख्याध्यापक नारायण सुर्यवंशी, व्यंकटेश मुळे यांच्या उपस्थितीत याचे वाटप करण्यात आले. यावेळी शामसुंदर हुल्लेनवरू यांनी मनोगत व्यक्त केले. किरण गाटे यांनी सूत्रसंचालन केले. राजश्री फुले यांनी आभार मानले.

# १४८३ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला पार करावी लागत आहे अडथळ्याची शर्यत

- योजनेची रक्कम कमी करण्याच्या मुख्य सचिवांनी दिल्या सूचना
- दि.१३ सप्टेंबर रोजी सादर करावा लागणार सुधारित आराखडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ सप्टेंबर-**
शहराला नियमित व सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेने तयार केलेल्या जलवितरण योजनेच्या किंमतीमध्ये कपात करण्याची सूचना राज्याच्या मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केली. त्यामुळे १४८३ कोटी रुपयांच्या या योजनेला अडथळ्याची शर्यत पार करावी लागत आहे. आता दि.१३ सप्टेंबर २०२६ रोजी शासनाकडे सुधारित आराखडा सादर करावा लागणार आहे.

महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी मंगळवार, दि.८ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई येथे मुख्य सचिव अग्रवाल यांच्यासमोर या जलवितरण योजनेच्या आराखड्याचे सादरीकरण केले. ही योजना ८८३ कोटींवरुन १४८३ कोटी कशी झाली? असा सवाल उपस्थित करत ही रक्कम कमी करुन आराखडा नव्याने सादर करा, अशा सूचना मुख्य सचिवांनी दिली.

### प्रकल्पाची किंमत ८८३ कोटी रुपये

सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी उजनी धरण हा प्रमुख जलस्रोत आहे. यापूर्वीच्या समांतर जलवाहिनी प्रकल्पातून दररोज सुमारे १७० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यासाठी जॅकवेल, पंपिंग स्टेशन, रायझिंग मेन आणि ग्रॅव्हिटी मेन आदी कामे करण्यात आली आहेत. या प्रकल्पाची किंमत ८८३ कोटी होती.

### हा प्रकल्प प्रत्यक्षात आला तर...

१,४७८ कोटींच्या योजनेच्या संदर्भात जुलै २०२६ मध्ये झालेल्या आढावा बैठकीत अंतिम तांत्रिक आराखडा, जागतिक बँकेकडून प्रस्तावित कर्ज, निधी नियोजन आणि प्रशासकीय प्रक्रिया यांचा आढावा घेण्यात आला होता. हा प्रकल्प प्रत्यक्षात आला तर पुढील अनेक वर्षांचा एकात्मिक जलव्यवस्थापन आराखडा म्हणून पाहता येईल.

दरम्यान, मुख्य सचिवांनी अनेक प्रश्न उपस्थित करताना काही शंकाही व्यक्त केल्या.

महापालिकेने तयार केलेल्या सुमारे १,४८३ कोटींच्या दीर्घकालीन जल आराखड्याचा मुख्य उद्देश सोलापूर शहराचा भविष्यातील पाणीप्रश्न कायम स्वरूपी सोडवणे हा आहे. भविष्यातील



शहराची पाण्याची गरज सोलापूर शहराची वाढती लोकसंख्या, हद्दवाढ भाग आणि भविष्यातील औद्योगिक-वाणिज्यिक गरज लक्षात घेऊन दीर्घकालीन पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. सध्या शहरातील अनेक भागांना तीन ते पाच दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत आहे.

जुन्या शहर विकास आराखड्यातही पाणीपुरवठ्याची सातत्याची पातळी अत्यंत कमी असल्याचे निदर्शनास आले होते. नव्या आराखड्याचा भर केवळ पाणी आणण्यावर नसून शहरातील वितरण यंत्रणा मजबूत करण्यावर आहे. त्यात आवश्यक त्या नवीन जलवाहिन्या, जलसाठवण व्यवस्था, पंपिंग व्यवस्था आणि वितरण नेटवर्कचा विस्तार यांचा समावेश अपेक्षित आहे. सोलापूर शहराला नियमित आणि अधिक विश्वासार्ह पाणीपुरवठा करण्याचे हे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे.

### योजनेला ब्रेक दिलेला नाही

पाणीपुरवठा योजनेला ब्रेक दिलेला नाही. रक्कम कमी करण्यास सांगितले आहे. सोलर, भूसंपादन, जलवाहिन्या यामुळे वाढलेली रक्कम कमी करता येते का ते पाहावे लागेल. यासंदर्भात आमदार, पालकमंत्री यांच्याशी चर्चा करुन गरज असेल तर मुख्यमंत्र्यांना भेटून हा विषय मार्गी लावण्यात येईल, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले.



## अकलूजस्थित शंकर नगर येथील शिवपार्वती मंदिरात महाआरती

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ८ सप्टेंबर-**
येथील महाशिवरात्र यात्रा समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्या वतीने श्रावण मासनिमित्त शंकरनगर येथील श्रीशिवपार्वती मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व त्यांच्या पत्नी शितलदेवी मोहिते-पाटील या उभयतांच्या हस्ते शिवपार्वतीस लघुरुद्राभिषेक व एक लक्ष बिल्वापत्र अर्पण करण्यात आले. प्रसाद कुलकर्णी व त्यांचे सहकार्यांनी धार्मिक विधींचे पौरोहित्य केले.

यावेळी माजी मुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, महाशिवरात्र यात्रा समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, त्यांच्या पत्नी सुलक्षणादेवी मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, त्यांच्या पत्नी कांचनमालादेवी मोहिते-पाटील, कारखान्याच्या संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्यासह मोहिते-पाटील परिवारातील इतर सदस्य आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकारांनी आरोग्याकडे दुर्लक्ष करु नये : पवार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ सप्टेंबर-**
दिवसभर बातम्यांच्या शोधात धावपळ करणाऱ्या पत्रकारांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. उत्तम आरोग्य असेल तरच अधिक जोमाने आणि प्रभावीपणे कर्तव्य बजावता येते, असे प्रतिपादन सहाय्यक पोलिस आयुक्त दिलीप पवार यांनी केले.

जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त होली स्पिरिट फिजिओथेरपी सेंटर आणि श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापुरातील पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात ते बोलत होते.

व्यासपीठावर जेसीएफए मिनिस्ट्री सोलापूरचे संस्थापक डॉ.डॅनियलपॉल यंगल, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, डॉ.प्रकाश सांगे, ज्येष्ठ पत्रकार संजय पाठक यांची उपस्थित होते. श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार किरण बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले.

## पवित्र पोर्टल शिक्षक भरतीला वेग; ३३२ उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी पूर्ण

### १७ उमेदवार पुन्हा गैरहजर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ सप्टेंबर-**
राज्य शासनाच्या पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत सोलापूर जिल्हा परिषदेसाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. २ व ३ सप्टेंबर रोजी झालेल्या पडताळणी प्रक्रियेत निवड झालेल्या ३४९ उमेदवारांपैकी ३३२ उमेदवारांची कागदपत्रे तपासण्यात आली. उर्वरित १७ उमेदवार अंतिम संधी देऊनही गैरहजर राहिल्याने त्यांच्या निवडीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक भरतीअंतर्गत जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका तसेच अन्य संस्थांमध्ये सुमारे १३ हजार उमेदवारांना नोकरीची संधी मिळत आहे. त्याच प्रक्रियेत सोलापूर जिल्हा परिषदेसाठी ३४९ उमेदवारांची निवड करण्यात आली होती. या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी २ व ३ सप्टेंबर रोजी घेण्यात आली. त्यावेळी १७ उमेदवार अनुपस्थित राहिल्याने त्यांना ७ सप्टेंबर रोजी अंतिम संधी देण्यात आली. मात्र, या संधीचाही लाभ न घेतल्याने आता संबंधित उमेदवारांच्या जागा पुढील फेरीत भरण्याची शक्यता आहे.

### समुपदेशन प्रक्रिया पूर्ण करावी

सोलापूर जि.प.साठी ३३२ पेक्षा अधिक उमेदवारांची कागदपत्र पडताळणी पूर्ण झाली. समुपदेशन प्रक्रिया तातडीने करण्यात पूर्ण करण्यात यावी. पात्र-अपात्र उमेदवारांची यादी जाहीर करुन अंतिम निवड यादी पारदर्शकपणे प्रसिध्द करावी, असे डीएड, बीएड असोसिएशन व पवित्र पोर्टल शिक्षक भरती संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले.

### हजर राहण्याचे आदेश दिले होते

सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु १७ उमेदवार अनुपस्थित राहिले, अशी माहिती जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी विशाल मुळे यांनी दिली.

कागदपत्र पडताळणी पूर्ण झाल्यानंतर पात्र उमेदवारांना समुपदेशनाद्वारे शाळा निवडीची संधी देऊन नियुक्ती प्रक्रिया पुढे नेली जाणार आहे. पहिली ते पाचवी तसेच सहावी ते आठवीच्या पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांमुळे ग्रामीण भागातील शाळांमधील शिक्षकांची कमतरता काही प्रमाणात दूर होण्याची अपेक्षा आहे.

समांतर आरक्षणातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने रिक्त राहिलेली पदे 'कन्व्हर्टेड राउंड' अर्थात रूपांतरित फेरीत भरण्याची प्रक्रिया होणार आहे. या फेरीत आरक्षणाच्या नियमानुसार उपलब्ध उमेदवारांच्या माध्यमातून रिक्त जागा भरण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्या रिक्त असलेल्या जागांकडे उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

## बैलपोळा साजरा करा, पण बैलांवर अन्याय नको

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ सप्टेंबर-**
बैलपोळा सण उत्साहाने साजरा करा. पण बैलांची शिंगे तासु नका, रासायनिक रंग लावू नका. जेणेकरुन बैलांवर अन्याय होईल असे कोणतेही कृत्य करु नका, असे भावनिक आवाहन ॲनिमल राहत या संस्थेने केले आहे.

बैल सुंदर दिसण्यासाठी त्यांची शिंगे तासने, शिंगाणा आणि शरीरावर रासायनिक रंग लावणे त्यांना डॉल्बी समोर मिरवणुकीत तासनतास उभा करणे या सर्व चुकीच्या पद्धती मुळे बैलांना वेळवेगळे त्रास आणि आजार होतात, असेही सांगण्यात आले.

# 'मतदार नोंदणी अधिकाऱ्याने व्हीआयपी मतदारांची यादी स्वत: तपासावी'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**
एसआयआर अंतर्गत कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची तातडीने स्थापना करावी. प्रत्येक मतदार नोंदणी अधिकाऱ्याने आपापल्या कार्यक्षेत्रातील व्हीआयपी मतदारांची यादी स्वतः तपासावी, अशा सूचना मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एसआयआर अंतर्गत मतदान नोंदणी अधिकारी यांच्या बैठकीत त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, सोलापूर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर, मतदार नोंदणी अधिकारी सुमित शिंदे, अमित माळी, सीमा होळकर, अंजली मरोड, जयश्री आव्हाड,




सदाशिव पडदुने, सचिन इथापे, सुशांत बनसोडे, अमोलसिंह भोसले उपस्थित होते.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादीचे काम करताना सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी परस्परांमध्ये समन्वय ठेवावे. मतदार हाच केंद्रबिंदू असून प्रत्येक पात्र मतदाराचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट होईल, याची दक्षता घ्यावी. आगामी ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार असल्याने प्रत्येक टप्प्याचे काटेकोर नियोजन करून विहित मुदतीत काम पूर्ण करावे.

अंतिम मतदार यादी अचूक, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे. विहित कालावधीत प्रत्येक प्रक्रिया पूर्ण करण्यासोबतच पात्र मतदारांचा मताधिकार अबाधित राहील, याची विशेष दक्षता घ्यावी, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जिल्हा प्रशासनाने एसआयआर अंतर्गत केलेल्या कामकाजाची सविस्तर माहिती बैठकीत सादर केली. अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे यांनीही मार्गदर्शन केले.

### 'बल्क'मध्ये अर्ज स्वीकारु नयेत

मतदार यादीत बदल अथवा नाव वगळण्याच्या प्रक्रियेत नियमांचे काटेकोर पालन करावे. बल्कमध्ये अर्ज स्वीकारु नयेत. फॉर्म क्रमांक ७ व ८ चा गैरवापर होणार नाही, यासाठी विशेष दक्षता घ्यावी. मृत व्यक्तीचे नाव मतदार यादीतून वगळताना संबंधित मृत्यू प्रमाणपत्राची तपासणी करुनच आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी सक्त सूचनाही त्यांनी दिली.

### दावे, हरकतींच्या सुनावणीबाबत वेळापत्रक

प्रारुप मतदार यादीवर प्राप्त होणाऱ्या दावे व हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी स्वतंत्र आणि नियोजनबध्द वेळापत्रक तयार करावे. संबंधितांना सुनावणीच्या नोटिसा बजावताना उपलब्ध असलेल्या विविध माध्यमांचा प्रभावी वापर करावा. व्हॉट्सप संदेशाचाही वापर करून संबंधितांपर्यंत सूचना पोहोचवाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

### महाविद्यालयांत जाऊन नवमतदारांची नोंदणी

१८ ते १९ वर्षे वयोगटातील नवमतदारांची नोंदणी वाढविण्यासाठी महाविद्यालयांना भेटी देऊन पात्र विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नोंदणी करावी. पात्र असूनही एकही नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही, यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन करून विशेष जनजागृती उपक्रम राबवावेत, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लोहारा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा; राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ सप्टेंबर -**

पावसाने मोठी ओढ दिल्याने लोहारा तालुक्यातील खरीप पिके संकटात सापडली असून, तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे तहसीलदारांमार्फत निवेदनाद्वारे करण्यात आली.



पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे सोयाबीन, तूर, मूग, उडीद आदी पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांचा बियाणे, खते, औषधे, मशागत व मजुरीवरील खर्च वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. गावनिहाय व शेतनिहाय पंचनामे करून नुकसानभरपाई, पीक विम्याचा लाभ, तसेच पाणीटंचाई निर्माण झाल्यास टँकरने पाणी व जनावरांसाठी चारा उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी करण्यात आली. निवेदनावर जालिंदर कोकणे, बाबा शेख, अमोल कडगावे, अमोल वाघ, विश्वनाथ बिराजदार यांच्यासह शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### मार्डी जि.प. शाळेची सुवर्णा पाटील यांच्याकडून पाहणी

**लोहारा, दि.८ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यातील मार्डी येथील जिल्हा परिषद शाळेला जिल्हा परिषद सदस्या सुवर्णा पाटील यांनी भेट देऊन शाळेची पाहणी केली. यावेळी त्यांनी शैक्षणिक सुविधा, वर्गखोल्या, विद्यार्थ्यांची उपस्थिती तसेच मूलभूत सोयी-सुविधांची माहिती घेतली. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि आवश्यक सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात, याबाबत त्यांनी शिक्षक व प्रशासनाशी चर्चा केली. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावाही घेतला. यावेळी मुख्याध्यापक सुरेश वाघमोडे, कैलास माणिकशेट्टी, छायाबाई अडसूळ, वर्षा चौधरी, उषाताई ओवाडकर, प्रशांत थोरात, ज्योती जाधव, सुजाता जाधव, अंजली सरवदे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



### लाठीकाठी स्पर्धेत प्रणिता सूर्यवंशी, श्रेया अंकुश यांचे घवघवीत यश

**उमरगा, दि.८ सप्टेंबर -**

नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय लाठीकाठी स्पर्धेत श्री महात्मा बसवेश्वर विद्यालयातील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी केली. प्रणिता सूर्यवंशी हिने दोन सुवर्णपदके, तर श्रेया अंकुश हिने एक सुवर्णपदक पटकावत विद्यालयाचे नाव उंचावले. या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक डॉ. चंद्रकांतराव महाजन, मल्लिकार्जुन आप्पा दंडगे व डॉ. कपिलजी महाजन यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यालयात यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख संजय कोथळीकर व क्रीडा शिक्षक सुरेश गायकवाड उपस्थित होते. विद्यार्थिनींच्या यशाबद्दल विद्यालय परिसरातून कौतुक होत आहे.



### ठाकरे नगर उद्यानाला मीनाताई ठाकरे यांचे नाव

**नळदुर्ग, दि.८ सप्टेंबर -**

स्व. मीनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त ६ सप्टेंबर रोजी ठाकरे नगर येथील उद्यानाचे 'स्व. माँसाहेब मीनाताई बाळासाहेब ठाकरे उद्यान' असे नामकरण करण्यात आले. शहर शिवसेनेच्या सौजन्याने उभारलेल्या नामफलकाचे व स्व. मीनाताई ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून ठाकरे नगरमधील महिलांच्या हस्ते फीत कापून अनावरण करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे माजी उपजिल्हाप्रमुख कमलाकर चव्हाण यांनी ठाकरे नगरमधील नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देत उद्यानाचा सर्वांगीण विकास करून ते शहरातील उत्कृष्ट उद्यान बनविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे सांगितले. यावेळी शिवसेना पदाधिकारी, महिला व ठाकरे नगरमधील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना 'श्यामप्रसन्न घोष पुरस्कार'

**उमरगा, दि.८ सप्टेंबर -**

उमरगा तालुक्यातील जवळगा बेट येथील रहिवासी तथा प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना शिक्षण, साहित्य व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा 'श्यामप्रसन्न घोष पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बहरमपूर येथे गंगा नदीच्या प्रवाहावर जहाजात आयोजित 'इलिश उत्सव २०२६'मध्ये राढ बंगला साहित्य परिवाराच्या वतीने डॉ. गायकवाड यांचा गौरवपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी साहित्यिक, कलाकार व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारताना डॉ. गायकवाड यांनी साहित्य व शिक्षण हे सामाजिक जागरूकता, संवेदनशीलता आणि मानवी मूल्ये दृढ करण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. या सन्मानामुळे उमरगा तालुक्यासह मराठवाड्यातील शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# कृष्णा खोरे योजनेच्या कामावरून दानवे-ठाकूर आमनेसामने

## मराठवाड्याचा विकास तुमसे ना हो पायेगा'; दानवेंचा वाशी दौरा चर्चेत... पूर्ण कामांवरून सरकारला घेरले...

**सुधीर घोलप**
**वाशी, दि.८ सप्टेंबर -**

भाजप सरकारच्या काळात मराठवाडा आणि विदर्भात झालेल्या विकासकामांची पाहणी करून त्याची वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्यासाठी ठाकरे गटाचे नेते तथा राज्याचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विकासकामांच्या पाहणी दौऱ्याला सुरुवात केली आहे. 'मराठवाड्याचा विकास तुमसे ना हो पायेगा' असा टोला लगावत दानवे यांनी सरकारच्या विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या दौऱ्यात अपूर्ण, रखडलेली आणि निधीअभावी थांबलेली कामे प्रत्यक्ष पाहून त्यांनी सरकारवर टीका केली.





या दौऱ्यादरम्यान दि. ७ सप्टेंबर रोजी धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी परिसरात दानवे यांनी मराठवाडा-कृष्णा खोरे पाणी योजनेच्या कामाची पाहणी केली. तसेच जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या अपूर्ण कामांचीही पाहणी केली. घराघरात नळ आणि नळाला पाणी देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली जलजीवन मिशन योजना अनेक ठिकाणी अपूर्ण असल्याचा दावा करत शासनाकडून पुरेसा निधी मिळत नसल्याने कामे रखडल्याचा आरोप त्यांनी केला.

'नळ बसविले, मात्र नळाला पाणी कधी येणार?' असा सवाल करत दानवे यांनी जलजीवन मिशनच्या कामावरून सरकारला धारेवर धरले. नागरिकांना नियमित पाणीपुरवठा मिळावा यासाठी शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून अपूर्ण कामे पूर्ण करावीत, अशी मागणी यावेळी गावकऱ्यांनीही केली.

कडकनाथवाडी परिसरातील लिफ्ट इरिगेशनच्या कामाची पाहणी करताना कामाच्या संथ गतीवर दानवे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कामाचा सध्याचा वेग पाहता शेतकऱ्यांच्या शिवारात प्रत्यक्ष पाणी पोहोचण्यासाठी आणखी दहा-पंधरा वर्षे लागतील, अशी टीका त्यांनी केली. मागील दोन-तीन निवडणुकांपासून कृष्णा खोऱ्याचे पाणी मराठवाड्यात आणण्याच्या घोषणा होत आहेत; मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या शिवारात पाणी पोहोचले नसल्याचे दानवे म्हणाले.

कडकनाथवाडी येथील साठवण तलाव क्रमांक दोनमध्ये या योजनेचे पाणी येणार आहे. मात्र तलावाला मोठ्या प्रमाणात गळती असल्याचा मुद्दा उपस्थित करत 'आडातच नाही तर पोहऱ्यात कसे येणार?' असा सवाल त्यांनी केला. आधी तलावाची गळती दूर करून पाणी साठवण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी केली. रस्त्यांची दुरवस्था, अपूर्ण विकासकामे आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांचा अभाव यावरूनही दानवे यांनी सरकारवर निशाणा साधला. मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार गांभीर्याने पाहत नसल्याची टीका करत पावसाअभावी नुकसान झालेल्या भागांचा तातडीने आढावा घेऊन मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली.

धाराशिव जिल्ह्याच्या सिंचन प्रश्नावरही त्यांनी सरकारला लक्ष्य केले. धाराशिव जिल्ह्याने महाराष्ट्राला मोठे राजकीय नेतृत्व दिले. जिल्ह्यातील नेत्यांना महत्त्वाची मंत्रिपदे आणि खात्यांची जबाबदारी मिळाली. एवढे राजकीय वजन असूनही जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आजही पुरेसे सिंचनाचे पाणी मिळालेले नाही, ही खंत असल्याचे दानवे यांनी सांगितले.

### माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांचे प्रत्युत्तर...

दरम्यान, दानवे यांच्या आरोपांना भाजपचे नेते तथा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी प्रत्युत्तर दिले. लिफ्ट इरिगेशन योजना मुळात त्यांच्या सरकारच्या काळातच बंद झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी



कृष्णा खोरे योजनेला पुन्हा चालना देत ती मार्गी लावली, असा दावा ठाकूर यांनी केला. योजनेसमोर पाणी उपलब्धतेचे पत्र, लवादाची पाणी मान्यता, निधी तसेच केंद्रीय पर्यावरण विभागाशी संबंधित अनेक अडथळे होते, असे ठाकूर यांनी सांगितले. या योजनेसाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला असून राज्य सरकारपासून केंद्रीय स्तरापर्यंत योजनेच्या फाईलचा पाठपुरावा केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी वैयक्तिक लक्ष घालून निधी उपलब्ध करून दिल्याचा दावाही ठाकूर यांनी केला. त्यामुळे 'मराठवाड्याचा विकास तुमसे ना हो पायेगा' या दानवे यांच्या टीकेला ठाकूर यांनी कृष्णा खोरे योजनेच्या कामाची पार्श्वभूमी सांगत प्रत्युत्तर दिले आहे. विकासकामांच्या पाहणीसाठी सुरू झालेला दानवे यांचा दौरा आता आरोप-प्रत्यारोपांमुळे राजकीयदृष्ट्याही चांगलाच रंगला आहे.

## आश्विनी मोहिते आत्महत्या प्रकरणी फास्ट ट्रॅक तपासाची मागणी

### सुरेश बिराजदार यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ सप्टेंबर -**

राष्ट्रीय स्तरावरील कुस्तीपटू आश्विनी मोहिते यांनी तीन मुलांसह केलेल्या आत्महत्येच्या



घटनेचा फास्ट ट्रॅक तपास करून प्रकरणातील दोषींवर कठोर न्यायालयीन कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश दाजी बिराजदार यांनी केली आहे. याबाबत त्यांनी दि. ५ सप्टेंबर रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले.

निवेदनानुसार, उमरगा तालुक्यातील व्हंताळ येथील राष्ट्रीय स्तरावरील कुस्तीपटू आश्विनी मोहिते यांचा विवाह निलंगा तालुक्यातील अंबुलगा येथील पौळ कुटुंबात झाला होता. विवाहानंतर सासरी त्यांना त्रास दिला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच पतीने त्यांना शासकीय नोकरी सोडण्यास भाग पाडल्याचाही दावा करण्यात आला आहे.

सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या कथित जाचाला कंटाळून आश्विनी मोहिते यांनी नळदुर्ग किल्ल्यावरून तीन मुलांसह उडी मारून आत्महत्या केल्याचे निवेदनात नमूद आहे. राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूला अशा प्रकारे छळाला सामोरे जावे



लागल्याची घटना अत्यंत गंभीर असून, यामुळे समाजात अस्वस्थता निर्माण झाली आहे, असे बिराजदार यांनी म्हटले आहे.

या प्रकरणाचा त्वरित आणि सखोल तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून आश्विनी मोहिते व त्यांच्या मुलांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत आणि महिलांवरील अत्याचार करणाऱ्यांवर कायद्याचा धाक निर्माण व्हावा, यासाठी कठोर कारवाई आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, निवेदन देण्यापूर्वी सुरेश दाजी बिराजदार आणि जिल्हा परिषद सदस्या सविताताई बिराजदार यांनी व्हंताळ येथे आश्विनी मोहिते यांच्या घरी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले.

## कृषी विभागातील रिक्त पदांमुळे शेतकऱ्यांचे अनुदान रखडले

### रिक्त पदे तातडीने भरा, प्रलंबित देयके वितरित करा; ज्ञानराज चौगुलेंची कृषिमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ सप्टेंबर -**

जिल्ह्यात कृषी विभागातील अनेक महत्त्वाची पदे रिक्त असल्याने विविध शासकीय योजनांतर्गत निवड झालेल्या लाभार्थी शेतकऱ्यांची थकीत देयके रखडली आहेत. त्यामुळे कृषी विभागातील रिक्त पदे तात्काळ भरून शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान विनाविलंब वितरित करावे, अशी मागणी माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मागील काही वर्षांत सूक्ष्म सिंचनांतर्गत ठिबक व तुषार सिंचन, फळबाग लागवड, कृषी यांत्रिकीकरण तसेच विविध कृषी अवजारांच्या योजनांसाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांची देयके अद्याप प्रलंबित आहेत. शासनाने नुकताच या थकीत देयकांच्या वितरणासाठी निधी उपलब्ध करून वितरण आदेशही काढले आहेत. मात्र, जिल्ह्यात कृषी विभागातील वरिष्ठ व महत्त्वाची पदे रिक्त असल्याने हा निधी लाभार्थी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण झाले आहेत.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी उपसंचालक, तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांतील तालुका कृषी अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे चौगुले यांनी निवेदनात नमूद केले आहे.

दरम्यान, दुष्काळी परिस्थितीमुळे जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी शासकीय योजनांचा लाभ मिळेल या अपेक्षेने कर्ज काढून ठिबक सिंचन, फळबाग, यांत्रिकीकरण आदी कामे पूर्ण केली आहेत. शासनाकडून निधी उपलब्ध होऊनही केवळ रिक्त पदांमुळे अनुदान वितरणाला विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी कृषी विभागातील सर्व रिक्त पदे तातडीने भरावीत आणि लाभार्थी शेतकऱ्यांची प्रलंबित थकीत देयके त्वरित वितरित करावीत, अशी मागणी ज्ञानराज चौगुले यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली आहे.

## फ्रेम व्यवसायातील कुशल कारागीर संजय भोजगुडे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

येथील फ्रेम व्यवसायातील कुशल कारागीर संजय किसनराव भोजगुडे (वय ५७) यांचे पुणे येथील आरएमडी हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) निधन झाले. गेल्या आठवड्यात त्यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांचे वडील किसनराव भोजगुडे यांनी १९६७ मध्ये 'भोजगुडे फ्रेम मेकर' हा व्यवसाय सुरू केला होता. संजय भोजगुडे व त्यांचे बंधू दगडू भोजगुडे यांनी आधुनिक पद्धतींचा स्वीकार करून हा व्यवसाय यशस्वीपणे पुढे नेला.

## धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ सप्टेंबर -**

धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती (एसटी) आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करावी, यासह विविध मागण्यांसाठी तुळजापूर तालुका धनगर समाज आरक्षण संघर्ष समितीच्या वतीने ७ सप्टेंबर रोजी नळदुर्ग येथील अपर तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. नायब तहसीलदार नितीन चौधरी यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करून आरक्षणाची अंमलबजावणी करावी, लोणावळा येथील मिसिंग लिंक प्रकल्पाला वीर शिंग्रोबा धनगर यांचे नाव द्यावे, मुंबईतील चर्चगेट स्थानकाला राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्यावे आणि सद्गुरू संत बाळूमामा देवस्थानसाठी स्वतंत्र कायदा करावा, या मागण्या करण्यात आल्या.

मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला.

यावेळी समितीचे अध्यक्ष पद्माकर घोडके यांच्यासह विविध गावांतील समाजबांधव यांच्यासह युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजापूर बाजारपेठेतील मोबाईल चोरीचा छडा; महिला आरोपी जेरबंद




**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

तुळजापूर बाजारपेठेत मोबाईल चोरी करून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या महिला आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. गोपनीय माहितीच्या आधारे धाराशिव शहरात चोरीच्या उद्देशाने फिरणाऱ्या संशयित महिलेला ताब्यात घेण्यात आले. तिच्याकडून ४० हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला.

जिल्ह्यातील मालमत्तेविषयक गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी पोलिसांकडून कारवाई सुरू असताना, ७ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला संशयित महिलेबाबत गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने धाराशिव शहरात सापळा रचून महिलेला ताब्यात घेतले. तिच्या ताब्यात विवो कंपनीचा मोबाईल आढळून आला.

मोबाईलबाबत चौकशी केली असता, सदर मोबाईल तुळजापूर बाजारपेठेतून चोरी केल्याची माहिती तिने दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर तुळजापूर पोलिस ठाण्यातील गुन्हे अभिलेख तपासले असता, संबंधित मोबाईल चोरीप्रकरणी गुन्हा दाखल असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी महिलेच्या ताब्यातून ४० हजारांचा मोबाईल जप्त केला. आरोपी महिलेची वैद्यकीय तपासणी करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी तिला तुळजापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलिस निरीक्षक सुदर्शन कासार तसेच पोलिस हवालदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, महिला पोलिस हवालदार शोभा बांगर आणि चालक पोलिस हवालदार नागनाथ गुरव यांच्या पथकाने केली.

## संक्षिप्त...

### बाबासाहेब पाटील यांची दैठणा येथे भेट



तभा वृत्तसेवा

दैठणा, दि. ८ सप्टेंबर : महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सोमवारी दैठणा येथील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेला भेट देऊन नूतन बँक इमारतीची पाहणी केली. यावेळी त्यांनी इमारतीच्या बांधकामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर झालेल्या संवादात दैठणा परिसरातील सहकार क्षेत्रातील विकासकामे, बँकेचा व्यवहार, कर्जवाटप तसेच विकासकामांमध्ये येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून विविध बाबींची माहिती जाणून घेतल्यानंतर मंत्री पाटील यांनी, पुढील काळात कोणतीही अडचण निर्माण झाली तर माझी भेट घ्या. अडचण कोणतीही असो, त्यावर आपण निश्रि्चतपणे मार्ग काढू, असा विश्र्वास देत मार्गदर्शन केले.

यावेळी दैठणा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व्यंकटरावजी बिरादार, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन उमेश मोरे, समाजसेवक सुखदेव पाटील, शिरूर अनंतपाळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विठ्ठल पाटील, दैठणा गावचे विद्यमान उपसरपंच तथा माजी सरपंच योगेशजी बिरादार, अण्णाराव पाटील, बँक अधिकारी चंद्रकांत जाधव, विजयकुमार सामानगावे आणि निळकंठ बिरादार आदी उपस्थित होते.

# अल निनोच्या लाटेत शेतकऱ्यांच्या तोंडचा घास करपला

## कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी पावसाअभावी पिके करपली जनावरांच्या चायाचा प्रश्न गंभीर थकित व यंदाचा पिक विमा तात्काळ देण्याची मागणी

तभा वृत्तसेवा /सुधीर गंगणे

ओसा दि.८ सप्टेंबर : उसने अवसान काढून का होईना शेतकऱ्यांनी यंदाच्या खरीप हंगामासाठी जय्यत तयारी केली खरी पण पाऊस पीक पदरात पडेल एवढाही पडला नाही. या हंगामात अल निनोच्या लाटेतील रखरखत्या उन्हाने उन्हाळ्यातीलही गर्मीचे रेकॉर्ड मोडले आहेत.याचा या हंगामात विपरीत परिणाम होऊन जनावरांच्या चाऱ्यांसह उभी पीके जाग्यावरच करपत असून अख्खा खरिप हंगाम शेतकऱ्यांच्या हातून गेला आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्र्न गंभीर झाला आहे.शासनाने कोरडा दुष्काळ जाहीर करून थकीत व यावर्षीचा पीक विमा तात्काळ द्यावा.अशी मागणी होत आहे.

गेल्या दोन तीन हंगामात पावसाने सलगपणे आगळीक केल्याने खरिप व रब्बी हंगामाच्या उत्पादनात मोठी घट झाली.उत्पादनात झालेल्या तुटीमुळे शेतकऱ्यांच्या कर्जाच्या ओझ्यात भर पडली.या थकीत कर्जाच्या ओझ्याला गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाने केलेल्या सातबारा कोरा,कोरा,कोराच्या घोषणेने काहीसा दिलासा मिळाला होता.दोन वर्ष उलटली



सातबारा कोरा झाला नाही.यातून कर्जाच्या ओझ्यात भर पडली.आणि गेल्या हंगामातील पीक विमा मिळाला नाही.यामुळे यंदाच्या हंगामात पेरणीसाठी अडचणी वाढल्या होत्या.

बँकात व बाजारात पत शिल्लक उरली नाही. देवाण घेवाण जाग्यावर थांबली.खाजगी सावकारांचा रेटा वेगळाच यामुळे हंगाम तोंडावर आल्यावर पेरणी कशी करावी.ही मोठी अडचण समोर होती.याच काळात पीक विमा चे तुणतुणं वाजलं आणि एकच धावपळ सुरू झाली.पीक विम्याचा वायद्यावर शेतकऱ्यांनी अख्खी पेरणी केली.परंतू निसर्गाला हेही मान्य झाले नाही. गेल्या पाच सहा दशकांत पाहिला नाही. असा एल निनो यावर्षी आला.पण या वर्षीच्या हंगामातील पहिल्या नक्षत्रात पडलेल्या पावसाने मोठा दिलासा दिला. कमी जास्त पडर्णाय़ा पावसामुळे पेरण्या झाल्या. पिकांची उगवण झाली. आंतरमशागती, फवारणी,खुरपणी झाली.ऐण फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत पिकं असताना पावसाने पाठ फिरवली.आणि पुन्हा खाजगी सावकारी तगादा सुरू झाला.मशागत आणि पेरणी केलेल्या ट्रॅक्टर चालकांचे हेलपाटे सुरू झाले. या काळातही पीक विमा पावला नाही. त्यामुळे गेल्या निवडणुकीत झालेल्या चुकांची उजागर गावागावांतील ओट्या कट्यावर होत असल्याचे आज तरी दिसून येत आहे.

### ऊस उत्पादक स्लाईनवर

यंदा पाऊस कमी झाल्याने उसाची वाढ खुंटली आहे. आणि गेल्या तीस पस्तीस दिवसांपासून पावसाने गुंगारा दिल्याने ऊस वळत आहे.त्यामुळे यंदा उसाचे उत्पादन अर्ध्याहून कमी होणार असल्याची भिती शेतकऱ्यांतून व्यक्त केली जात आहे.

खरिप हंगामातील व पावसाळ्यातील हंगामाचा शेवटचा महिना सध्या सुरू आहे.गेल्या तीन महिन्यांत ओसा तालुक्यात जवळपास ४००मि मी पाऊस अपेक्षित असताना २०० मिमी च्या आसपास पाऊस पडला आहे.यावर्षी निम्मा च पाऊस पडल्याने विहिरींनी तळ गाठला आहे. तर विंधन विहिरी आजच उचक्या देत आहेत.

यामुळे खरिप हंगामातील पिकांना शेतकऱ्यांना पाणी देता येत नाही.यावर्षी पाऊस कमी पडल्याने पाणी साठ्यात वाढ झाली नाही.आणि जमिनीत रब्बी हंगाम येईल अशी ओली नाही.यामुळे औसा तालुक्यात पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्र्न गंभीर झाला आहे. दिवसभर धगधगत्या उन्हात अधूनमधून येणाऱ्या ढगाळ वातावरणामुळे उन्हाची दाहकता वाढत आहे.परिणामी अवर्षणात वाढ होऊन पाण्याचा प्रश्र्न गंभीर होत आहे.अशा या नैसर्गिक वातावरणामुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली आहे. शासनाने तातडीने पाहणी करून गेल्या वर्षीचा आणि या वर्षीचा पीक विमा तात्काळ द्यावा. व दोन लाखांच्या कर्जमाफीचे गाजर दाखवणे बंद करून विधानसभेच्या निवडणुकीत दिलेल्या सातबारा कोरा करण्याच्या आश्र्वासनांची पूर्तता तात्काळ करावी. अशी मागणी ओसा तालुक्यातून जोर धरीत आहे.

# गुरव समाजातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

तभा वृत्तसेवा



उदगीर दि. ८ सप्टेंबर : येथील शहर गुरव समाजा तर्फे सद्गुरू शंकर लिंग महाराज महाराज मठात गुणवंत विद्यार्थी सत्कार व स्नेहभोजन कार्यक्रम संपन्न झाला. दहावीच्या परीक्षेत९४ टक्के गुण घेणारे मनोहर शिवाजी जवळगे, ९०% गुण संस्कृती बाबुराव बिरादार, चौथी स्कॉलरशिप परीक्षेत भावना भीमसेन भडगे, बॅचलर ऑफ फिजिओथेरपी डॉ. धनश्री भगवान बिरादार, एलएलबी परीक्षेत ऋषभ रवी तेज घुगे, एम टेक बायोटेक्नॉलॉजी परीक्षेत श्रेया अनिल पाटील या विद्यार्थ्यांचा तसेच गटशिक्षणाधिकारीपदी कैलास होदरणे, उपमुख्याध्यापक भगवान बिरादार, सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. अंकुश पाटील पदोन्नती झाल्याबद्दल शाल पुष्पगुच्छ व विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले प्रारंभी संत काशिबा महाराज गुरव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.अध्यक्षस्थानी हरिभाऊ जवळगे होते .पाहुणे महावितरणचे सेवानिवृत्त सहाय्यक अभियंता संजय घुगे , डॉ.कृष्णा नाईकवाडे, सौ प्रतिभा ठाकूर यांची उपस्थिती होती. सर्वच वक्त्यांनी स्तुत्य प्रेरणादायक उपक्रम असल्याचे सांगून यशवंत यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक प्रा. प्रवीण जाहुरे यांनी केले. रामदास नारंगवाडे, पत्रकार नरेश बिरादार यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन संदेश बोरोलकर यांनी केले. आभार अजय मुंरळे यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी कैलास पाटील ,बाबुराव पाटील, नारायण पाटील, प्रमोद पाटील , राहुल नाईकवाडे ,नितीन आलमले दीपक येरोळकर, नामदेव जावरे, मुरलीधर पाटील, विठ्ठल ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

# नामानायक महाराजांनी भक्ती,अध्यात्म,सदाचार,मानवता,सामाजिक एकतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला :आ. संजय बनसोडे

तभा वृत्तसेवा

जळकोट दि. ८ सप्टेंबर : संत-महात्म्यांच्या विचारांची परंपरा ही समाजाला योग्य दिशा देणारी आहे. नामानायक महाराजांनी भक्ती आणि अध्यात्मासोबतच सदाचार, मानवता, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य केले. त्यांच्या विचारांचे आचरण केल्यास समाजात प्रेम, शांतता आणि एकोपा निर्माण होण्यास निश्रि्चतच मदत होईल, असे प्रतिपादन माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी केले जळकोट तालुक्यातील गुत्ती (अग्रवाल तांडा) नामानायक गड येथे आयोजीत सत्पुरुषी नामानायक महाराज जळभोग व भव्य जयंती महोत्सवाप्रसंगी बोलत होते.




यावेळी मुखेडचे आ. डॉ. तुषार राठोड, माजी आमदार गोविंद केंद्रे, लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सौ. उषाताई पाटील तळेगावकर, संभाजी पाटील तळेगावकर, लातूर जि. प. चे बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, रामराव राठोड, रमन अदावळे, प्रकाश राठोड, गुत्तीच्या सरपंच मिनाताई केंद्रे, यादव केंद्रे, प्रा.श्याम डावळे, मीरा सुर्यवंशी, तहसिलदार सुधाकर राठोड, सत्यवान पांडे, पवन चव्हाण, संदिप आडे, प्रकाश बिरादार, कमलाकर फुले, शशिकांत बनसोडे, शिवकुमार कांबळे, चंद्रशेखर पाटील, पाशा शेख, दिपक आंब्रे, संयोजक डॉ.गजेंद्र राठोड, डॉ.भारती राठोड, मानसिंग आडे, पंकज आडे, मनोज कांबळे, गंगाधर पीटलेवाड, डॉ.रंजीत काळे, सुधीर चव्हाण, रश्मी राठोड, ज्योती राठोड, डॉ.प्रियंका राठोड, राजु राठोड, गोविंद राठोड, आदी उपस्थित होते . यावेळी उपस्थित मान्यवरांनी नामानायक महाराजांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचे स्मरण केले.पुढे बोलताना आ. संजय बनसोडे म्हणाले की, संतांचे कार्य हे केवळ धार्मिक क्षेत्रापुरते मर्यादित नसते, तर त्यांच्या विचारांमधून समाजाला जीवन जगण्याची मूल्ये मिळतात. नामानायक महाराजांनी सामान्य माणसाला भक्तीच्या माध्यमातून आत्मिक समाधानाचा मार्ग दाखविला. त्याचबरोबर सत्य, प्रामाणिकपणा, परोपकार, संयम आणि सदाचार यांचे महत्त्व समाजाला पटवून दिले.

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत संत-महात्म्यांचे विचार अधिक महत्त्वाचे ठरत आहेत. समाजामध्ये जात, धर्म, पंथ आणि विविध भेद बाजूला ठेवून मानवतेच्या नात्याने एकत्र येणे गरजेचे आहे. नामानायक महाराजांनी दिलेला सामाजिक एकतेचा संदेश प्रत्येकाने आत्मसात करावा, असे सांगुन 'मानवसेवा हीच ईश्र्वरसेवा' या भावनेतून समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे हीच संतांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल. युवकांनी संतांचे साहित्य व विचार समजून घेऊन ते आपल्या आचरणात आणावे. अध्यात्माबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारा समाज निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असेही आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.कार्यक्रमादरम्यान विविध धार्मिक विधी, भजन, कीर्तन तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नामानायक महाराजांचे दर्शन घेतले. परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.गजेंद्र राठोड यांनी केले तर आभार सुत्रसंचालन प्रा.कीशन राठोड यांनी केले.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, भाविक तसेच महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक व भक्त मंडळींनी परिश्रम घेतले.

# महात्मा गांधी वाचनालयाचा स्तुत्य उपक्रम

## जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना वर्षभर मोफत पेन वाटप



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ८ सप्टेंबर : चाकूर तालुक्यातील भाटसांगवी येथील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी एक अभिनव आणि स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे.या उपक्रमाचा शुभारंभ वाचनालयाचे अध्यक्ष अण्णाराव दाडगे यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वाचनालयातर्फे संपूर्ण वर्षभरासाठी मोफत निळा व लाल बॉलपेन देण्यात येणार असून

या पेनवर वाचनालयाचे नाव छापलेले असणार आहे. विद्यार्थ्याने प्रथम आपल्या वर्गशिक्षकाकडून निळा व लाल पेन घ्यायचा आहे. पेन संपल्यानंतर वाचनालयाचे नाव असलेला रिकामा झालेला पेन वर्गशिक्षकांकडे जमा करायचा असून, तो जमा केल्यानंतरच विद्यार्थ्याला नवीन पेन दिला जाणार आहे.अशा पद्धतीने विद्यार्थ्यांना वर्षभर पेन दिला जाणार आहे.

या आगळ्या वेगळ्या नियमामुळे विद्यार्थ्यांना वर्षभर मोफत पेन तर मिळणारच आहेत, शिवाय पेन हरवणार नाही याची काळजी विद्यार्थी घेतील. यातून वस्तू जपून वापरण्याची आणि सांभाळण्याची चांगली सवय विद्यार्थ्यांना लागेल, तसेच पेन संपेपर्यंत सातत्याने लेखन करण्याची सवय लागेल, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

यावेळी शिक्षक दिनाचे औचित्य साधून वाचनालयाचे अध्यक्ष अण्णाराव दाडगे यांनी स्वतः विद्यार्थ्यांना पेनचे वाटप केले व शाळेतील शिक्षकांचा सत्कार केला.या सामाजिक उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक विरभद्र बावगे, शाळा व्यवस्थापन समिती आणि सर्व शिक्षकांनी वाचनालयाचे कौतुक केले असून आभार मानले आहेत. शिक्षणात लेखन साहित्याला अनन्यसाधारण महत्त्व असून वाचनालयाने दिलेले हे पेन म्हणजे विद्यार्थ्यांसाठी प्रगतीची प्रेरणा असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले. याप्रसंगी शाळेच्या वतीने अण्णाराव दाडगे यांचे आभार मानून त्यांचा सत्कार करण्यात आला.

# औसा तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा एमआयएमची मागणी




तभा वृत्तसेवा

औसा दि. ८ सप्टेंबर : पावसाळा संपत आला तरी पिकांना पुरेसा आणि समाधानकारक पाऊस झाला नाही. हातातोंडाशी आलेली खरिपातील पीक वाया गेली आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांसमोर जगण्यासाठी मोठे आर्थिक संकट उभा आहे. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने ओसाड तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा. अशी मागणी एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी तहसीलदार यांच्यामार्फत शासनाकडे केली आहे.

यावर्षीच्या खरिप हंगामात पेरणी पासूनच पावसाने हात आखडता ठेवला. यातून पीके चांगली येथूनही हातातोंडाशी आलेल्या पिकांना शेवटच्या टप्प्यात पाऊस कमी पडला.यामुळे वर्षापेक्षा पीक चांगली येवून जाग्यावर वाळत आहेत.निसर्गाच्या या अवकृपेमुळे भरून न येणारे नुकसान होत आहे. पावसाअभावी प्रकल्प, तलाव, विहीर,विंधन विहिरी कोरड्या ठाक पडत आहेत.त्यामुळे जनावरांच्या चाऱ्यांसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्न गंभीर झाला आहे.आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी शासनाने पाहणी करून औसा तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

याचबरोबर ओसाड तालुक्यासह लातूर जिल्हा व मराठवाड्यात सारखीच परिस्थिती झाली आहे. त्यामुळेऔसा तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात तात्काळ 'अधिकृत दुष्काळ' जाहीर करावा. देवस्थान इनाम जमीन असलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून योजनेत समाविष्ठ करुन थेट त्यांच्या खात्यावर मदत रक्कम जमा करुन शासनाच्या इतर योजनांचाही लाभ देण्यात यावा.बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी. शेतीकर्ज वसुलीस तात्काळ स्थगिती देऊन संपुर्ण पीक कर्ज माफ करण्यात यावे.ग्रामिण भागात पिण्याच्या पाण्याचे टँकर व जनावरांसाठी चारा छावण्या त्वरीत सुरु कराव्यात.व

विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करावी .अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. नंदकुमार देशपांडे,नवनाथ भोसले,अजीत पांडे,राजू शेख,मुनीर काद्री, बालाजी साळुंके यांच्या सह शेतकरी उपस्थित होते.

### गुरूंचा गौरव, विद्यार्थिनीला मदतीचा हात

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ८ सप्टेंबर : ज्ञानाची ज्योत तेवत ठेवणाऱ्या शिक्षकांचा सन्मान आणि आर्थिक अडचणीतील विद्यार्थिनीच्या शिक्षणाला मदतीचा हात देत जिव्हाळा ग्रुपने शिक्षक दिनानिमित्त सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यादेवी होळकर सभागृह, उदगीर येथे आयोजित *'जिव्हाळा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार'* सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पाच शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विठ्ठलराव फुलसे यांनी स्वागतगीत सादर केले.

यावेळी श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. म. ई. तंगावार,* केंद्रप्रमुख *श्री. रमेश जाधव,* सहशिक्षिका *सौ. कल्पना कुलकर्णी, सौ. वर्षाताई पाटील आणि सहशिक्षक ईश्र्वर कुंभार यांना 'जिव्हाळा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार'* प्रदान करून सन्मानित करण्यात आले. तसेच *दीक्षा भुताळे* या विद्यार्थिनीच्या शिक्षणासाठी मदतनिधी देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त श्री. विश्र्वनाथ मुडपे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अंबरखाने, योगगुरू डॉ. संग्राम पटवारी, माजी विस्तार शिक्षण संचालक प्रा डॉ अनिल भिकाने व जिव्हाळा ग्रुपचे उपाधक्ष मोहनराव खिंडीवाले उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आ. संजय बनसोडे

## नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ८ सप्टेंबर : पाऊस नसल्याकारणामुळे आणि हवामानामुळे उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघातील विविध भागांत शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्र्वभूमीवर माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी उदगीर मतदार संघातील लोहारा , करडखेल , डिग्रस आदी भागातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या थेट बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली .



पावसामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यासह विविध खरीप पिकांचे नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांनी आमदार संजय बनसोडे यांच्या निदर्शनास आणून दिले. अनेक ठिकाणी शेतात पाणी नसल्यामुळे पिकेवाळून गेली आहेत तर काही ठिकाणी पिकांच्या पानाला कीड लागून ती खराब झाली असून, काही भागांत उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

यावेळी आमदार संजय बनसोडे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेतल्या. नुकसानग्रस्त एकही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

तसेच नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने आणि वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर करावा, पंचनाम्याच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब होऊ नये, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असल्यास शासनाच्या मदतीपासून कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही. प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळवून द्यावा, असे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले.

दरम्यान, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केल्याबद्दल शेतकऱ्यांनी आमदार बनसोडे यांचे आभार मानले आहेत . प्रशासनाने पंचनाम्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळवून द्यावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, जिल्हा परिषदेचे गटनेते प्रा . दिलीप मटके, लोहारा गटाचे जि . प . सदस्य मुकेश भालेराव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील , शशिकांत बनसोडे ,बाळासाहेब मरलापल्ले,विकी भोसले , शिवकुमार कांबळे , संदीप बिरादार,ज्ञानेश्र्वर पाटील रावणगावकर, बबन धनबा, शुभम केंद्रे,आदीसह परिसरातील शेतकरी, सरपंच , उपसरपंच उपस्थित होते .

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करा : शिवसेना ठाकरे गटाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ सप्टेंबर -**

वाशी तालुका प्रतिनिधी : पावसाने ओढ दिल्याने धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी संकटात सापडला असून खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धाराशिव जिल्हा तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा, या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सोमवारी (दि. ७) वाशी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.



पावसाची स्थिती आणि पिकांचे नुकसान लक्षात घेऊन शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करावा, तसेच संकटग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत व आवश्यक दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी तालुकाप्रमुख तात्यासाहेब गायकवाड, तात्यासाहेब बहिर, दशरथ नाळपे, दत्ता चौधरी, गणेश पाटील, अनिल क्षीरसागर, बाळासाहेब मुळवणे, रणजीत रसाळ, रवींद्र चव्हाण, विकास गायकवाड, लक्ष्मण राऊत यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### श्री शिवशंभू महादेव श्रावण मास उत्सवाची भक्तिमय वातावरणात सांगता

**परंडा, दि.८ सप्टेंबर -**

परंडा शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ला परिसरात श्री शिवशंभू महादेव श्रावण मासानिमित्त आयोजित विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांची सोमवारी (दि. ७ सप्टेंबर) भक्तिमय वातावरणात सांगता झाली. यानिमित्त महाअभिषेक, कीर्तन, भव्य मिरवणूक, रक्तदान शिबिर व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. रविवारी परंडा पंचक्रोशीतील विविध गावांतील भजन मंडळे, गायक व वादकांच्या सहभागातून हरिजागराचा कार्यक्रम झाला. रात्री उशिरापर्यंत भजन, कीर्तन व हरिनामाचा गजर सुरू असल्याने किल्ला परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. सोमवारी सकाळी श्री शिवशंभू महादेव मंदिरात विधिवत महाअभिषेक करण्यात आला. यावेळी भाविकांनी मोठी गर्दी करून दर्शन घेतले. त्यानंतर हभप. बालाजी महाराज चौरे (परंडा) यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम झाला. कीर्तनातून धार्मिक परंपरा, सामाजिक बांधिलकी व मानवसेवेचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



### तेरणा विद्यार्थिनीचा 'हर्बल पेन रिलीफ पॅच' प्रकल्प चर्चेत

**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या फार्मसी विभागातील विद्यार्थिनी सायली साळुंके हिने 'हर्बल पेन रिलीफ पॅच' हा अभिनव प्रकल्प साकारला असून, तिच्या प्रोटोटाइपची डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड इंटरनशिप कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. ३ सप्टेंबर रोजी प्रोटोटाइप सादरीकरणावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सायलीच्या आठ औषधी वनस्पतींचा वापर केलेल्या पॉलीहर्बल पॅचची पाहणी करून तिच्या कल्पकतेचे कौतुक केले. भविष्यात अशा आरोग्योपयोगी पॅचेसचे उत्पादन करणारे स्टार्टअप उभारण्यासाठी त्यांनी तिला शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, प्रा. डॉ. जी. बी. चिवटे, प्रा. सायली पवार आदी उपस्थित होते. सायलीच्या यशाबद्दल तेरणा ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांसह प्राध्यापकवृंदाने तिचे अभिनंदन केले.



### विद्यार्थ्यांची ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्रास क्षेत्रभेट

**लोहारा, दि.८ सप्टेंबर -**

सलगरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्रास क्षेत्रभेट देत विद्युत वितरणाची प्रत्यक्ष माहिती घेतली. यावेळी विद्यार्थ्यांना वीज निर्मिती केंद्रापासून उपकेंद्रामार्फत ग्राहकांपर्यंत वीज पोहोचण्याची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. विद्यार्थ्यांनी ३३ केव्ही व ११ केव्ही प्रणाली, ट्रान्सफॉर्मर, सर्किट ब्रेकर, आयसोलेटर, सीटी/पीटी, बसबार, फ्यूज, रिले, अर्थिंग आदी उपकरणांची प्रत्यक्ष माहिती घेतली. तसेच विद्युत बिघाडावेळी घ्यावयाची काळजी, सुरक्षा उपाययोजना आणि विद्युत क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन मिळाले. यावेळी सहाय्यक अभियंता विशाल कांबळे, वरिष्ठ मशीन ऑपरेटर वेदपाठक, तोहीत पटेल, प्रविण कोरेकर, आदेश शिंदे व अजय कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. क्षेत्रभेटीस मुख्याध्यापक सनगुंदी, जमादार, कांबळे, प्रशिक्षक शेख व समन्वयक किरण पतंगे यांनी सहकार्य केले.

### पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांची पाहणी

**नायगांव, दि.८ सप्टेंबर -**

जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार खरीप हंगाम २०२६ मध्ये पर्जन्यमानातील अनिश्चितता व पावसाच्या खंडामुळे नायगाव परिसरातील पिकांची वस्तुनिष्ठ व शास्त्रीय पद्धतीने पाहणी करण्यात आली. यावेळी पिकांची वाढीची अवस्था, पावसाच्या खंडाचा परिणाम, रोग-किडीचा प्रादुर्भाव, जमिनीतील ओलावा तसेच संभाव्य उत्पादनातील घट याची पाहणी करण्यात आली. पाहणी पथकात उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे, प्राजक्ता पाटील, राजाभाऊ पाटील, राजश्री वर्पे, डॉ. अरुण गुट्टे, कमलाकर जनार्दन पाटील, मंडळ अधिकारी वर्षा ढेकरे, ग्राम महसूल अधिकारी संजय माळी, सहायक कृषी अधिकारी काकडे, अनिल माळी, यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'तुमसे ना हो पायेगा' आंदोलनातून सरकारवर शिवसेनेचा हल्लाबोल

## दुष्काळ जाहीर न केल्यास मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही : आ. कैलास पाटील






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

रझाकारांच्या विरोधात लढून मराठवाडा स्वतंत्र झाला; मात्र आता शिवसेना-भाजपरूपी रझाकारांच्या विरोधात रस्त्यावर उतरली आहे, असा गर्भित इशारा माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी धाराशिव येथे दिला. शिवसेनेच्या वतीने आयोजित 'तुमसे ना हो पायेगा' आंदोलनात ते बोलत होते.

आ. दानवे म्हणाले की, मराठवाड्याच्या विकासासाठी १७ सप्टेंबर २०२३ रोजी तब्बल ४४ हजार कोटी रुपयांच्या घोषणा करण्यात आल्या; मात्र त्या हवेतच विरल्या आहेत. सरकार केवळ घोषणा करू शकते, विकास करणे त्यांच्याकडून शक्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे संपूर्ण मराठवाड्यात 'तुमसे ना हो पायेगा' हे जनआंदोलन उभारून सरकारला जाब विचारत असल्याचे त्यांनी सांगितले.

धाराशिव जिल्ह्याच्या विकासावरही त्यांनी सरकारवर टीका केली. कृष्णा-मराठवाडा प्रकल्पातील २३.६६ टीएमसी पाण्यापैकी २००४ पासून अद्याप सात टीएमसी पाणीदेखील जिल्ह्यात आलेले नाही. अनेक कामांच्या निविदा केवळ टक्केवारीसाठी काढल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला. तुळजाभवानी मंदिर विकासासाठी १,८०० कोटी रुपयांचा प्रकल्प असून वर्षाला केवळ २२ कोटी रुपये निधी दिल्यास विकासासाठी पन्नास वर्षे लागतील, असेही दानवे म्हणाले. विकास करताना स्थानिक व्यापाऱ्यांच्या हिताचाही विचार झाला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

### जिल्ह्याचा विकासदर अडीच टक्क्यांवर : आ. प्रविण स्वामी



आमदार प्रवीण स्वामी यांनी माकणी प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्यांच्या पुनर्बांधणीसह ३७ भूकंपग्रस्त गावांच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. धाराशिव जिल्ह्याचा जीडीपी दर केवळ दोन ते अडीच टक्के असल्याचे सांगत जिल्ह्याच्या विकासाकडे सरकारने गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

### दुष्काळ जाहीर करा, अन्यथा रस्त्यावर उतरू' : आ. कैलास पाटील



जिल्हाप्रमुख तथा आमदार कैलास पाटील यांनीही सरकारवर जोरदार टीका केली. दुष्काळ जाहीर न केल्यास मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश अद्याप देण्यात आलेले नाहीत. सरकार कोणते पंचांग पाहत आहे, असा सवाल त्यांनी केला.

शेतकऱ्यांची पिके वाळत असताना वीज नसल्याने उपलब्ध पाणीदेखील पिकांना देता येत नाही. 'देव देव पाऊस पडेना, तर देवा भाऊ वीज देईना; अशावेळी शेतकऱ्याने करावे तरी काय?' असा सवाल आ. पाटील यांनी केला. पीकविमा, महागाई, पेपरफुटी, लाडकी बहीण योजनेतील अपात्रता तसेच निराधार, अपंग व बालसंगोपन योजनांच्या थकीत निधीचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

लातूर जिल्ह्यात बॅरेजेस उभारण्यात आले असून धाराशिव जिल्ह्यातही बॅरेजेस उभारण्याची मागणी त्यांनी केली. पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी माजलगावमार्गे तेरणा व मांजरा नदीत आणल्याशिवाय जिल्ह्याला त्याचा अपेक्षित फायदा होणार नाही, असे त्यांनी सांगितले. १७ सप्टेंबरपर्यंत दुष्काळ जाहीर न केल्यास मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी जिल्हाप्रमुख कैलास पाटील, संपर्कप्रमुख सुनील काटमोरे, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाप्रमुख रणजीत पाटील, सहसंपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर, ज्येष्ठ नेते संजय निंबाळकर, माजी जिल्हाप्रमुख भारत इंगळे, युवा सेना जिल्हाप्रमुख रवी वाघमारे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख शामल वडणे आदी उपस्थित होते.

आमदार कैलास पाटील यांनी मराठवाडा ही संतांची तसेच सहनशील लोकांची भूमी असल्याचे सांगत, निजामाचा दीर्घकाळ अन्याय सहन केला; आता सरकारचा अन्याय व भेदभावही सहन केला जात आहे. मात्र, आता सरकारला प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे, असे मत व्यक्त केले.

## दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत द्या : बलवडकर

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ सप्टेंबर -**

पेरणीनंतर दोन महिन्यांपासून पावसाने ओढ दिल्याने शेतातील उभी पिके पाण्याअभावी करपून गेली आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, बळीराजाला सावरण्यासाठी शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून मदत करावी, अशी मागणी स्वाभिमानी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. बलवडकर यांनी केली.

सोमवारी (दि.७) त्यांनी परंडा तालुक्यातील कंडारी येथे शेतकऱ्यांशी संवाद साधून पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अमर कदम यांनीही मार्गदर्शन केले. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर व धाराशिव जिल्ह्यांतील विविध तालुक्यांचा दौरा करून बलवडकर शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत आहेत.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानाजी पाटील, माजी जि.प. सदस्य धनंजय मोरे, बाबासाहेब तिंबोळे, तालुकाध्यक्ष शंकर घोगरे यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

## नाभिक समाजाच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील : नगराध्यक्ष गंगणे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ सप्टेंबर -**

नाभिक समाज हा परंपरेने सेवाभाव जपणारा समाज असून, समाजाच्या विविध प्रश्नांसाठी आपण सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहू. श्री क्षेत्र तुळजापूर येथील नाभिक समाजाच्या जागेचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावत समाजमंदिर उभारणीचा दिलेला शब्द आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून पूर्ण केला आहे.



समाजाच्या विकासासाठी आणखी काही कामे बाकी असून, तीदेखील पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी दिली.

तुळजापूर शहरातील नाभिक समाजाच्या वतीने संत सेना महाराज पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हभप. प्रकाश महाराज गवळी यांच्या काल्याच्या कीर्तनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. या वेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घेतला.

कार्यक्रमास सचिन रोचकरी, गटनेते औदुंबर कदम, नगरसेवक आबा कंदले, नरेश अमृतराव, अमोल कुतवळ, अक्षय परमेश्वर, विशाल रोचकरी, नगरसेविका प्रियंका गंगणे, आनंद कंदले यांच्यासह नाभिक समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शहरातील नागरिक उपस्थित होते.

## गरजूंच्या ताटात अन्नाचा घास; ३८ लाखांहून अधिक शिवभोजन थाळ्यांचे वितरण

### अन्नसुरक्षा योजनांतून लाखो नागरिकांना आधार; अंत्योदय कुटुंबांना मोफत साडीचाही लाभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ सप्टेंबर -**

वाढत्या महागाईच्या काळात गरीब व गरजू कुटुंबांच्या घरातील चूल नियमित पेटावी, प्रत्येकाच्या ताटात अन्नाचा घास पोहोचावा आणि आर्थिक परिस्थितीमुळे कोणालाही उपाशी राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जिल्ह्यात शिवभोजन योजना, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना आदींच्या माध्यमातून लाखो नागरिकांना अन्नसुरक्षेचे कवच मिळत आहे. त्यासोबतच अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना मोफत साडी वाटपातूनही आधार दिला जात आहे.

राज्य शासनाची शिवभोजन योजना गरीब, गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी मोठा आधार ठरली आहे. जिल्ह्यात सध्या १६ शिवभोजन केंद्रे कार्यरत असून, योजना सुरू झाल्यापासून ३१ जुलै २०२६ अखेरपर्यंत ३८ लाख ४२ हजार ७३० थाळ्यांचे वितरण करण्यात आले आहे. अत्यल्प दरात पोटभर भोजन उपलब्ध होत असल्याने गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.



राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम-२०१३ अंतर्गतही गरजू लाभार्थ्यांना अन्नसुरक्षेचा लाभ दिला जात आहे. राज्यातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाच्या कक्षेत न आलेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना जानेवारी २०२३ पासून अन्नधान्याऐवजी प्रतिमाह, प्रतिलाभार्थी १५० रुपये थेट रोख हस्तांतरण केले जात आहे. धाराशिव जिल्ह्यातील १ लाख ३७ हजार ५१२ लाभार्थ्यांना जून २०२५ अखेरपर्यंत ६६ कोटी ६६ लाख ९२ हजार २२० रुपयांचे अनुदान डीबीटीद्वारे त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ३७ हजार ७८६ अंत्योदय अन्न योजनेच्या कुटुंबांना प्रतिकुटुंब दरमहा ३५ किलो धान्य दिले जाते. तसेच १ लाख ३ हजार १९३ प्राधान्य कुटुंब योजनेच्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत प्रतिलाभार्थी पाच किलो धान्य दरमहा मोफत वितरित केले जाते.

त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील अन्नधान्याचा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होत आहे.

### अंत्योदय कुटुंबांना मोफत साडी

अन्नधान्यासोबतच अंत्योदय कुटुंबांच्या इतर गरजांचाही विचार करण्यात आला आहे. कॅप्टिव्ह योजनेंतर्गत अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना कापडी पिशवीसहित एक साडी मोफत देण्यात येत आहे. जिल्ह्यास या योजनेंतर्गत ३७ हजार १६८ साड्या प्राप्त झाल्या असून, त्यापैकी २६ हजार ३७४ कुटुंबांना साड्यांचे वितरण करण्यात आले आहे.

### अन्नसुरक्षेसोबत सामाजिक सुरक्षेचा आधार

सार्वजनिक वितरण व्यवस्था ही केवळ स्वस्त धान्य दुकानातून धान्य पुरविणारी यंत्रणा न राहता गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या दैनंदिन जगण्याला आधार देणारी सामाजिक सुरक्षा व्यवस्था ठरत आहे. एका बाजूला शिवभोजन केंद्रातून गरजू व्यक्तीला तयार भोजन मिळत आहे, तर दुसरीकडे विविध अन्नसुरक्षा योजनांमधून कुटुंबांना नियमित धान्य आणि आर्थिक सहाय्य मिळत आहे. अंत्योदय कुटुंबांना मोफत साडीच्या माध्यमातूनही मदतीचा हात दिला जात आहे. 'गरजूच्या ताटात अन्नाचा घास आणि कुटुंबाला जगण्याचा आधार' देण्याचे काम या योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यात व्यापक स्वरूपात सुरू आहे.

## संत सेना महाराजांच्या विचारांचा आदर्श घेऊन कार्य करा : नगराध्यक्ष धरणे



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ सप्टेंबर -**

संत शिरोमणी संत सेना महाराज यांनी मानव कल्याणासाठी केलेले कार्य महान असून, आज समाजाला त्यांच्या विचारांची खरी गरज आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन प्रत्येकाने समाजहितासाठी काम करावे, असे प्रतिपादन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केले.

नळदुर्ग येथे श्री संत सेना नाभिक समाज मंडळाच्या वतीने ८ सप्टेंबर रोजी संत सेना महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा लोकमान्य वाचनालयाच्या सभागृहात झाला. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अ‍ॅड. धीरज पाटील, नगरसेवक आकाश कुलकर्णी, नगरसेविका मिनाक्षीताई काळे व काँग्रेस तालुकाध्यक्ष अ‍ॅड. अरविंद बेडगे उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी, संत सेना महाराज व वीर शिवा काशीद यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी अ‍ॅड. धीरज पाटील व अ‍ॅड. अरविंद बेडगे यांनी मनोगत व्यक्त केले. ह.भ.प. सत्यवान महाराज कराळीकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर गुलालाचा कार्यक्रम व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास नाभिक समाजातील पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार विनायक अहंकारी यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष संदीप सुरवसे, सचिन सूर्यवंशी यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महापालिकेने घेतली गणेश मंडळांची बैठक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ सप्टेंबर : आगामी गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या विविध परवानग्यांसह विसर्जन मिरवणुका विनाअडथळा पार पडण्यासाठी महापालिका प्रशासनाने तत्पर राहावे, मंडळांच्या पसिरात नियमित स्वच्छता करावी, अशी मागणी शहरातील गणेश मंडळांच्यावतीने केली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात बैठक झाली. यावेळी महापौर जयश्री भालचंद्र सोनकांबळे, आयुक्त राहुल कुलकर्णी, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, काँग्रेसचे गटनेते विजयकुमार साबदे, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, वसुधा फड यांची उपस्थिती होती.

यावेळी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी उघड्या गटारींवर झाकणे टाकण्यासह रस्त्यातील खड्डे बुजवावेत, बंद पथदिवे त्वरित सुरू करावेत अशा मागण्या केल्या.



## विविध वृत्त.....

### लाल बहादूर शास्त्री विद्यालयात शिक्षक दिन व दहीहंडी उत्सव उत्साहात संपन्न



तभा वृत्तसेवा

उदगीर : येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन व गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव अत्यंत उत्साहपूर्ण आणि आनंदमय वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शंकरराव लासुणे तर प्रमुख पाहुणे रमाकांत बनशेळकीकर , ज्योती शिंदे ,व्यंकटराव गुरमे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक वसंत वाघमारे, रमाकांत क्षीरसागर पर्यवेक्षक कृष्णा मारावार किरण नेमट, तानाजी खोकले माधव मठवाले, माजी शिक्षक उमाकांत बुधे उमाकांत कोणाळे,गोपाळ जोशी लालासाहेब गुळभिले दुर्गा बनशेळकीकर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पुष्प व दैनंदिनी देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी शिक्षकांचे कर्तव्य विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकाची भूमिका आणि शिक्षकांचे ध्येय याविषयी मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे रमाकांत बनशेळकीकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील दृढ होत जाणाऱ्या नात्याचे महत्त्व अधोरेखित केले. तर ज्योती शिंदे यांनी आपल्या मनोगतातून गोपालकाल्याचे महत्त्व पटवून दिले.

याप्रसंगी गोपाळकाल्यानिमित्त विद्यार्थ्यांनी नृत्य तसेच दहीहंडी फोडून आनंद उत्सव साजरा केला. विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक समरसता भाव रुजावा यासाठी गोपालकाल्याच्या माध्यमातून सहभोजनाचे आयोजन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभ्यास पूरक मंडळ प्रमुख लक्ष्मी चव्हाण सहप्रमुख निलेश मांडवकर सुरेखा शिंदे अनिता मुळखेडे यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर परिश्रम घेतले.

### कोरडा दुष्काळ जाहीर करून आपत्कालीन परिस्थितीची अंमलबजावणी करावी किसान काँग्रेस सेल यांची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर : दि. ८ सप्टेंबर : लातूर तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून आपत्कालीन परिस्थितीची अंमलबजावणी करावी, अशी मागणी तहसिलदारांकडे किसान काँग्रेस सेल लातूर तालुका च्या वतीने माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांच्या सूचनेनुसार, पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदनाद्वारे करण्यात आली.

लातूर तालुक्यात यावर्षी पावसाने मोठ्या प्रमाणात दडी मारल्यामुळे दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी शेतातील पिके धोक्यात आली असून, अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना पिकांवर नांगर फिरवण्याची वेळ आली आहे.

तालुक्यातील ओढे, नाले व तलाव कोरडे पडले असून विहिरी व बोअरवेलच्या पाण्याची पातळीही कमी झाली आहे. परतीच्या पावसानेही दडी दिल्यास शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. या गंभीर परिस्थितीची शासनाने तातडीने दखल घेऊन लातूर तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून आपत्कालीन परिस्थितीची अंमलबजावणी करावी, अशी मागणी किसान काँग्रेस सेलचे तालुकाध्यक्ष रामानंद जाधव यांच्या तर्फे करण्यात आली. यासंदर्भात तहसीलदार, लातूर यांना निवेदन देण्यात आले.

## लातूर– धाराशिव मार्गे कोकणासाठी गणपती विशेष रेल्वेगाडी मंजूर

## खा. डॉ. शिवाजी काळगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ८ सप्टेंबर : गणपती उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर मराठवाड्यातून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची मोठी संख्या लक्षात घेऊन नांदेड - लातूर - धाराशिव मार्गे कोकणसाठी गणपती विशेष रेल्वेगाडी सुरू करण्याची मागणी लातूर लोकसभा मतदारसंघाचे खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून दक्षिण मध्य रेल्वेने या विशेष रेल्वेगाडीला मंजुरी दिली आहे. या गाडीमुळे लातूरहून पहाटे पुणे व पनवेलला जाण्यासाठी व पुणे येथून रात्री लातूरला येण्यासाठी गाडी उपलब्ध होणार आहे.

यासंदर्भात खासदार डॉ. काळगे यांनी दक्षिण मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांकडे विशेष रेल्वे सुरू करण्याची मागणी केली होती. तसेच या रेल्वेसेवेसाठी आवश्यक असलेल्या समन्वयाच्या दृष्टीने मध्य रेल्वे व कोकण रेल्वेच्या महाव्यवस्थापकांशीही त्यांनी वैयक्तिकरित्या चर्चा करून आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली होती. प्रस्तावित रेल्वेसेवेमुळे लातूर, धाराशिवसह मराठवाड्यातील प्रवाशांना चिपळूण, रत्नागिरी, सावंतवाडी रोड तसेच कोकणातील इतर भागात जाण्यास थेट व अधिक सोयीची रेल्वे कनेक्टिव्हिटी उपलब्ध होणार आहे. गणपती उत्सवाच्या काळात नियमित रेल्वेगाड्यांवरील वाढता प्रवासी भार आणि प्रवाशांना करावे लागणारे रेल्वे बदल लक्षात घेता ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या विशेष रेल्वेसेवेला मंजुरी देण्यासाठी आणि तिच्या संचालनासाठी सहकार्य केल्याबद्दल खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी दक्षिण मध्य रेल्वे, मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वेच्या महाव्यवस्थापकांचे तसेच संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. .मराठवाड्यातील नागरिकांना गणपती उत्सवाच्या काळात आपल्या गावी कोकणात जाण्यासाठी अधिक सोयीची आणि थेट रेल्वे सुविधा उपलब्ध व्हावी, हा या मागणीमागील मुख्य उद्देश होता. रेल्वे प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन विशेष रेल्वेगाडी मंजूर केल्याबद्दल मी तिन्ही रेल्वे विभागांचे आभार मानतो. नागरिकांच्या रेल्वेशी संबंधित मागण्यांसाठी यापुढेही सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असे खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी सांगितले.

## महापुरुषांचे विचार आणि कार्यापासून नव्या पिढीने प्रेरणा घ्यावी: बाबासाहेब पाटील



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ८ सप्टेंबर : महापुरुषांचे पुतळे आणि स्मारके ही आपल्या सर्वांना सतत उर्जा व प्रेरणा देतात. नव्या पिढीने महापुरुषांचे विचार आणि कार्य यांचा आदर्श आपल्या जीवनात घेतला पाहिजे. स्वातंत्र्यवीर सावरकर हे एक प्रखर राष्ट्रभक्त होते, तसेच त्यांचे लेखक म्हणून साहित्य क्षेत्रातही अत्यंत मोलाचे योगदान आहे. त्यांचे विचार आणि कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे उद्गार सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी काढले.

अहमदपूर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकाच्या सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन सहकारमंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी नगराध्यक्ष ड. स्वप्निल व्हत्ते, जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती उत्तमराव माने, जिल्हा परिषद सदस्य अश्र्विन नागराळे, माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक केंद्रे, नगरसेवक निलेश मजगे, अमित रेड्डी, निखिल कासनाळे, प्रशांत भोसले, आशिष तोगरे, अजिंक्य चामे, किशोर कोरे, राहुल शिवपुजे, मुजम्मिल सय्यद, सदामा शेख, युसुफ सय्यद, अभियंता दहिफळे, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर स्मारकाचे अध्यक्ष धनंजय जोशी, सचिव मेजर मधुसूदन चेरेकर यांच्यासह पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

गेल्या काही दिवसांपासून स्वातंत्र्यवीर सावरकर चौक सुशोभीकरणाची मागणी होत होती. याची दखल घेत सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी त्यांच्या स्थानिक विकास निधीतून २० लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला आहे. तरुणांना स्वातंत्र्यवीर सावरकरांची देशनिष्ठा व विचार कायम स्मरणात राहावेत, यासाठीच या चौकाचे सुशोभीकरण करण्यात येत असल्याचे सहकारमंत्री श्री. पाटील यांनी सांगितले. तसेच, सध्या पुरेसा पाऊस नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असले तरी त्यांनी खचून जाऊ नये, राज्य सरकार पूर्ण ताकदीने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमात नगराध्यक्ष स्वप्निल व्हत्ते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर स्मारकाचे अध्यक्ष धनंजय जोशी, सचिव मेजर मधुसूदन चेरेकर, मधुकर धडे, दिलीप शास्त्री, अनिकेत काशीकर, शरद जोशी, सुभाष पाटील, यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक मारुती बुद्रुक पाटील यांनी केले.

## बाळासाहेब खैरे, डॉ. नेताजी शिंगटे यांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ सप्टेंबर : रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे व सचिव डॉ. नेताजी शिंगटे यांचा त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल रोटरी परिवाराच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलला रोटरी वर्ष २०२५ - २६ मध्ये डिस्ट्रिक्टकडून तब्बल ११ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. समाजसेवा, आरोग्य, शिक्षण व विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून केलेल्या अतुलनीय कार्याची दखल घेऊन बाळासाहेब खैरे आणि डॉ. शिंगटे यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी रोटरीचे भावी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सतीश लोणीकर, चार्टर प्रेसिडेन्ट संजय बोरा, असिस्टंट गव्हर्नर डॉ. राजगोपाल तापडिया, , डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे , नागेश स्वामी, इंजि. सुदर्शन कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. क्लबच्या या यशामागे रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या सर्व सदस्यांचे अमूल्य योगदान असल्याची भावना बाळासाहेब खैरे, डॉ. नेताजी शिंगटे यांनी व्यक्त केली.

### भाजीपाल्याचा टेम्पो उलटला

तभा वृत्तसेवा

लातूर : औसा येथून लातूरकडे भाजीपाला घेऊन निघालेला एक टेम्पो टायर फुटल्याने सोमवारी (दि.७) रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास पलटी झाल्याची घटना वासनगाव पाटीजवळ घडली. या अपघातात सुदैवाने कोणीही गंभीर जखमी झाले नसल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

## नवीन पिढी घडविण्यात अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची जबाबदारी महत्वाची : बाबासाहेब पाटील

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.८ सप्टेंबर : नवीन पिढी घडविण्यात अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची जबाबदारी अतिशय महत्वाची असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शिरूर ताजबंद येथे केले. एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अहमदपूर यांच्या वतीने अहमदपूर तालुक्यातील ४ अंगणवाडी सेविका व १५ मदतीस यांना सहकारमंत्री पाटील यांच्या हस्ते नियुक्ती आदेश वितरीत करण्यात आले.




यावेळी व्यासपीठावर जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती उत्तमराव माने, अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील, उपसभापती आयोध्या केंद्रे, उपनगराध्यक्ष अय्याज शेख, जिल्हा परिषद सदस्य प्रफुलचंद्र गुंडरे, अश्र्विन नागराळे, गटविकास अधिकारी पंकज शेळके, सहाय्यक गटविकास अधिकारी अस्मिता गायकवाड, बाल प्रकल्प विकास अधिकारी राजेश गझलवाड, महिला बाल प्रकल्प विकास अधिकारी विद्या लोमटे, ग्राम विकास अधिकारी प्रशांत घुगे, पंचायत समिती सदस्य रविंद्र बोडके, माधव सरवदे, सुरेखा मुंडे, आशिष तोगरे सह विविध मान्यवर उपस्थित होते.

अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचं काम हे भविष्यातील विद्यार्थी घडवण्याचा असून, हे काम अत्यंत महत्वाचे आहे. आईचं ममत्व सुद्धा आपल्याला या विद्यार्थ्यांना द्यावं लागतं आपण सर्वांनी या सर्व बालकांना शिस्त, संस्कार देवून देशाची एक सुसंस्कृत पिढी घडवावी, असे सहकारमंत्री. पाटील म्हणाले.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लाडक्या बहिणींचे भावाला साकडे

## जिल्हा परिषद सदस्या दीपाली भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली महिलांचे आंदोलन



तभा वृत्तसेवा

ओसा दि. ८ सप्टेंबर - कोरडवाहू शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख व बागायतदारांना दीड लाख रूपये मदत द्यावी.गेल्या व चालू हंगामातील पीक विमा तात्काळ द्यावा.नुकसानग्रस्त पीकांचे पंचनामे करावेत.रोहियो अंतर्गत वैयक्तिक कामे तातडीने सुरू करावी.जनावरांना चारा द्यावा. पिण्याच्या पाण्यासाठी अधिग्रहण सुरू करावे.या प्रमुख मागण्या घेऊन जिल्हा परिषद सदस्या दीपाली शाम भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली महिलांनी ओशात आंदोलन केले.आणि शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्र्नावर लाडक्या बहिणींनी भावाकडे निवेदनाद्वारे मागणी करत साकडे घातले.

गेल्या तीन महिन्यांपासून पावसाने पाठ फिरवल्याने ओसा तालुक्यासह लातूर जिल्ह्यातील शेतकरी संकटात सापडला आहे.केवळ पावसाअभावी उडीद,मुग व सोयाबीन पीक जाग्यावर वाळत आहेत.तर पाणी उपलब्ध नसल्यामुळे उभा ऊस व फळबागा होरपळत आहेत.पावसाअभावी हजारो हेक्टरावरील नगदी पीक सोयाबीन मातीमोल झाले आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.खरिपाच्या एकाच हंगामात कोरडवाहू,ऊस उत्पादक, फळबागायतदार शेतकरी उध्दवस्त झाले आहेत. शेतर्क.यासह त्यांचे कुटुंबाचा भार शेतीवरच अवलंबून असल्याने मोठे आर्थिक संकट उभा आहे.अशा नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जिल्हा परिषद सदस्या दीपाली भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली असंख्य महिलांनी वाळलेले सोयाबीन घेऊन तहसील कार्यालयावर धडक दिली.

### अन्यथा १५ सप्टेंबर रोजी हलगी नाद आंदोलनाचा इशारा

शासनाने या मागण्यांवर लवकरात लवकर कार्यवाही करावी, अन्यथा १५ सप्टेंबर २०२६ रोजी औसा तहसील कार्यालयासमोर हलगी नाद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे. मागण्या तातडीने मान्य करून शेतकरी आणि ग्रामीण जनतेला दिलासा द्यावा. अशी मागणी यावेळी महिलांनी केली आहे.

### दुष्काळाच्या प्रश्नांवर महिलांचा आक्रमक

पावसाअभावी शेतीचे झालेले नुकसान, चाऱ्याची टंचाई आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्र्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे .शासनाने केवळ कागदीपत्री उपाययोजना न राबवता प्रत्यक्ष मदत करावी, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. औसा तालुक्यासह संपूर्ण लातूर जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करावा.शेतकरी व ग्रामीण जनतेला आवश्यक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

निसर्गाच्या सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा.यासाठी शासनाने औसा तालुक्यासह लातूर जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा.शासनाने तहसील कार्यालयाला तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत.नुकसानग्रस्त कोरडवाहू शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये तर बागायतदार शेतकऱ्यांना दीड लाख रुपये मदत तातडीने वाटप करावी.सन २०२५-२६ चा व चालू हंगामातील २०२६ चा खरीप पीक विमा तातडीने द्यावा.रोहयोअंतर्गत वैयक्तिक लाभाची कामे तातडीने सुरू करावीत.जनावरांसाठी चारा उपलब्ध करून द्यावा.पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करून आवश्यक ठिकाणी पाणी अधिग्रहन सुरु करावे अशा मागण्या प्रशासानामार्फत शासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.सरपंच सुजाता बनसोडे,पद्मिनी काकासाहेब पवार, सोनाली चव्हाण,जयनबी शेख, अन्नपूर्णा कांबळे,रेखा कोव्हाळे,निर्मला कोव्हाळे,अंजना मंगरूळे,अनुसया वाघमारे मातोळा व परिसरासह तालुक्यातील महिलांनी या आंदोलनात सहभाग घेतला.

## गरजवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांना समाजाने दिशा देऊन प्रोत्साहन द्यावे : कराड

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ सप्टेंबर : समाजातील गरीब, गरजवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असूनही अनेकदा आर्थिक परिस्थितीमुळे आणि योग्य दिशा नसल्याने त्यांच्या शिक्षण व करिअरच्या वाटचालीत अडथळे निर्माण होतात. अशा विद्यार्थ्यांना समाजातील सक्षम व्यक्तींनी आधार देऊन योग्य दिशा आणि प्रोत्साहन देण्याचे काम करावे, असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर तालुक्यातील मौजे बामणी येथील भूमिपुत्र नितीन चिटपल्ले एसटीआय, अमोल जानवळकर आरोग्य विभाग जिप लातूर आणि शुभम बंडापल्ले लिपिक जिल्हा बँक लातूर हे शासकीय सेवेत कार्यरत झाल्याबद्दल त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जिपच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, लातूर ग्रामीण पाणंद व शेतरस्ते समिती सहअध्यक्ष सुरज शिंदे, पंस सदस्य पांडुरंग बालवाड, युवा मोर्चाचे संजय ठाकूर, अमर चव्हाण, प्रा. मनोज गवरे, सरपंच भागवत दिवटे, चेअरमन बालाजी बंडापल्ले, भानुदास बुच्चे, कमलाकर बाचपल्ले, कचरूलाल कांबळे, राम बंडापल्ले यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये जिद्द, मेहनत आणि गुणवत्ता असूनही योग्य मार्गदर्शनाअभावी स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण तसेच विविध क्षेत्रांमध्ये मागे राहतात. त्यामुळे समाजातील सुशिक्षित व यशस्वी व्यक्तींनी पुढाकार घेऊन अशा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, आवश्यक शैक्षणिक मदत आणि आत्मविश्र्वास देणे गरजेचे आहे. ज्यांना शासकीय सेवेत काम करण्याची संधी मिळाली त्यांनी केवळ आपल्या नोकरीपुरते मर्यादित न राहता आपल्या गावात आणि परिसराकडे लक्ष द्यावे. आपण ज्या गावातून घडलो, त्या गावातील तरुणांना आपल्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा फायदा करून द्यावा. योग्य मार्गदर्शन केल्यास अनेक तरुणांना त्याचा निश्र्चितच फायदा होईल, असेही त्यांनी सांगितले.